अंधार पाहिलेला माणूस /

तीन अंकी सामाजिक नाटक

# अंधार पाहिलेला माणूस

## लोकसंत गाडगेबाबा

डॉ. सतीश पावडे

पायगुण
प्रकाशन
अमरावती.
Email-paaygunprakashan22@gmail.com

या नाटकाचा व्यावसायिक किंवा हौशी प्रयोग करण्यासाठी अथवा कुठलाही भाग उदधृत करण्यासाठी अथवा पुर्नमुद्रित करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

**अंधार पाहिलेला माणूस**
(लोकसंत गाडगेबाबा)
डॉ. सतीश पावडे
'गाथा',९५, आशा कॉलनी, तपोवन रोड,
अमरावती -४४४६०२ (महा.)
भ्रमणध्वनी- ९३७२१५०१५८
९४२२५३५१५८

**प्रकाशिका**
संध्या राजेश बाहे
पायगुण प्रकाशन
सराफ ले-आऊट, कलोतीनगर,
अमरावती-४४४६०६
भ्रमणध्वनी - ९२२६२३३८००

**मुद्रक**
राजेश एन. बाहे
शशी प्रिंटर्स, अमरावती -४४४६०६
भ्रमणध्वनी -९२२५२२३८००

**अक्षरजुळवणी**
शशी कम्प्युटर्स, अमरावती-४४४६०६
भ्रमणध्वनी -९२२५३२३८००

**मुखपृष्ठ**
विकास सातपुते, अमरावती.

**© डॉ.सतीश पावडे**

**प्रथमावृत्ती-** जुलै २०१७

**Andhar Pahilela Manus**
(Marathi Drama)
Dr. Satish Pawade
ISBN: 978-81-89839-

**मूल्य** -

**समर्पण**

माझी आई
मनोरमाबाई पावडे
आणि माझे बाबा
'स्मृतिशेष'-बाबारावजी पावडे
यांना......



# प्रस्तावना

# पहिल्या प्रयोगाचे मानकरी....

'अंधार पाहिलेला माणूस' या नाटकाचा पहिला प्रयोग टाऊन हॉल, अमरावती येथे दि. २० डिसेंबर १९१३ रोजी सादर करण्यात आला.

| | |
|---|---|
| लेखक- दिग्दर्शक- | डॉ. सतीश पावडे |
| निर्माता- | दिलीप खत्री |
| मार्गदर्शक- | डॉ. बबन बेलसरे |
| निर्मिती सूत्रधार- | रत्नाकर सिरसाठ |
| प्रकाश योजना- | रमेश लखमापुरे, आनंद वानखेडे |
| नेपथ्य- | ॲड. सतीश उपाध्याय, भरत बाहेकर |
| संगीत- | स्नेहशील गणवीर |
| प्रसिद्धी- | आशिष यावले |
| निर्मिती व्यवस्था- | नितीन बोबडे |
| प्रयोग व्यवस्था- | बंडू कथिलकर |
| ग्राफिक डिझायनर- | विकास सातपुते |
| वेशभूषा- | गणेश भोयर, |
| रंगभूषा- | विलास पकडे, नाना अंबुलकर, अण्णासाहेब खोडपे |
| ध्वनि संयोजन- | लतिफ भाई, |

कलावंत- दिलीप खत्री, मृणाल ढोले, विलास पकडे, सतीश उपाध्याय, पुष्पा साखरे, सुशीलदत्त बागडे, अक्षय गवई, डॉ. मंदा नांदूरकर, प्रा. दिपक वानखेडे, रवी घुले, गणेश भोयर, मंगेश महात्मे, गौरव काळे, भूषण पराड, आनंद देशमुख, पंकज राठोड, पंकज तिवारी, प्रकाश चक्रनारायण, जय पानेकर, शुभम गिऱ्हे, मयुर मेश्राम, उमेश गजभिये, अंकुश गवळी, नितीन बोबडे, संजीवनी सलामे, प्रतीक्षा शेंडे, कोमल नागदिवे, डॉली गुप्ता, मोनाली कुलसंगे, शितल, प्रदीप घडेकर, नितेश तिवारी, प्रसाद देशमुख, ॲड. प्रतिभा नागपूरे (तेटू), रत्नाकर सिरसाठ.

# अंधार पाहिलेला माणूस

लोकसंत गाडगेबाबा

## अंक पहिला: प्रवेश पहिला

(**स्थळ:** शेंडगांव, झिंगराजी जानोरकरांचे घर. प्रारंभी उजव्या प्रकाश झोतात, भारूड गायन. मधल्या झोतात झिंगराजीच्या मृत्यूचे दृश्य. डावीकडे लाला हरदयालचे दृश्य. पडदा उघडण्यापूर्वी भारूड सुरू होते. हळू हळू पडदा दूर होतो. भारूडाचे दृश्य नजरेत येते.)

**भारूडकरी:** रोडगा वाहीन तुला भवानी आई, रोडगा वाहीन तुला ।।
लेकरू होऊ दे हिला भवानी आई, रोडगा वाहीन तुला ।।

(भारूडाचे पूर्ण सादरीकरण झाल्यावर भारूड संपते. उजव्या कोपऱ्यातील प्रकाश मावळतो. मधली जागा प्रकाशमान होते. झिंगराजी झोपलेला आहे. सखुबाई जवळ बसली आहे. झिंगराजीला खोकल्याची उबळ येते. सखुबाई झिंगराजीला सावरते. पदराने त्याचे तोंड पुसते.)

**सखुबाई:** लय तरास होते का जी? काय हाल करून घेतला माय ! थांबा.... जरासा काढा आणून देऊ काय? बरं वाटन तुम्हाले.

**झिंगराजी:** राहु देवं माय माजे, आता काढ्याचा काई उपेग नाई. सखु, आवं आता वाचत नाई म्या. माहे दिवस भरले हाये. (पुन्हा खोकल्याची उबळ येते. सखुबाई पुन्हा सावरते.)

**सखुबाई:** जिवाले कायले तरास करून घेता बाप्पा? काई होनार नाई तुमाले. देवाले नवस करीन, उपास-तापास करीन, कंदुरी करीन बाप्पा. पन तुम्हाले काई होऊ देनार नाई म्या.

**झिंगराजी:** माय, मायं मरन दिसते ना मले डोयानं. दारूनं मायी जिनगानी नासोली, आतोडे सडून गेले माये. जिवाले घर घर लागली हाये. पर मले डेब्याची लई फिकर वाटते... तुई फिकर वाटते.

**सखुबाई:** कायजी करू नोका. मायी पुन्याई हाये. कधी कोनाले दुखोलं नाई, का कोनाचं नुसकान केलं नाई आपुन. तुमी त् साऱ्यायचंच भलं केलं. लोकायसाठी घर दार गहान टाकलं, त्याईच्यासाठी जीव धोक्यात घातला. देवाले हे काय समजत नाई काजी?

**झिंगराजी:** अवं माय, बुरा वखत आला, म्हणजे कोनी होत नाई कोनाचं ! दारू प्याले किती सोबती होते मले. पर आता येते का कोनी ईचारपूस कराले? तुमी उपासी-तापासी रायले तवा आलं कोनी भाकर तुकडा घेऊन? मतलबी असतत माय लोकं.... आता मेल्यावर येतीन ना पंगत उडवाले, दारू ढोसाले. अन माया मरनाची कंदुरी खाले.



**सखुबाई:** तुम्ही बोलू नकानाजी आता. तरास होते तुमाले. छाती केवडी धडधडून रायली. धाप लागून रायली तुमाले. अवं हिंमत हारू नोका. काई होनार नाई तुमाले.

**झिंगराजी:** अवं, तो काय यमराज दाङ्ग्यावर उभा हाये मगापासून. अन् त्याचा तो हल्या पायनं कसा पायते, मायाकडे डोये लाल करून. (खोकल्याची उबळ येते. सखुबाई पुन्हा सावरते.)

**सखुबाई:** येऊ तं दया त्याले. मी सतवानाची सावितरी हाये मना. कसा नेते तुमाले त् मी पायतो ना.

**झिंगराजी:** नाई माय माजे, मायं मरन टयत नाई आता. डेब्या... डेब्या... कुठीसा हाये बाप्पा. डेब्या ऽऽ बोलवनं त्याले. आखरचं पाहून घेतो त्याले.

**सखुबाई:** वैदुबुवाच्या घरी धाडलं त्याले म्या. औषधी आनाले. येतच असीन थो. (झिंगराजीची घर घर वाढते. खोकल्याची उबळ येते.)

**झिंगराजी:** सखु, आता नाई सहन होतवं माय, हे दुखनं, लई तरास होवून रायला जिवाले. मरतो माय, आता....मी मरतो ऽ ऽ ऽ.(लाला हरदयालचा प्रवेश.)

**लाला:** गोविंद! गोविंद ! गोविंद ! हरे हरे ! असा कसा मरतं बा झिंगऱ्या ? मायं रिन फेडल्या बिगर? इसकु तो निमक हरामी बोलते ना जी, गोविंदजी की किरपासे. अबे, पैसे नाई फेडले त् नरकात जासीन ना लेका.

**सखुबाई:** लालाजी, असं काऊन बोलताजी माया धन्याले ? त्यायची हालत बरी नाई.

**लाला:** मंग कसं बोलू सुनबाई, तुईच बताना मेरेकु. याले दुसरी भासा समजत नाई. कित्ता समझाया बाप्पा याले, दारू नोको पिऊ रे बाबा, नोको रे पिऊ, पर सुना मेरा? केवढा हुशार गडी, मरद मानूस, पर दारूनं सत्यानास कर दिया इसका.आता मंग काय याच्या पायी मी माया सत्यानास करून घेऊ बाप्पा? गोविंद! गोविंद .

**झिंगराजी:** लालाजी, लय चुकलंजी मायं, म्याच माया घात केला. दारूच्या यसनानं

मले मसानात धाडलं.

**लाला:** झिंगराजी शेठ ! अब क्या मेरेकु बी भेजता मसानखुटी में, मराच्या आंधी माया हिसाब चुकता कर, अन मंग खुशाल मर. म्या रोखनार नाई तुले. वाटलं तर सुखानं मराले उलिशिक दारूई पाजतो तुले.

**झिंगराजी:**(खोकल्याची उबळ येते. घर घर वाढते) लाला, मराच्या आंधी दोन थेंब, बस दोन थेंब दारूचे टाका माया नड्ड्यात. आता नाई सहीन होत जी, नाई सहीन होत मले !

**लाला:** पयले कागूद करून दे माया नावाचा. बाप्पा, बाप्पा, गोविंदजीकी किरपासे मेरेसे कित्ता कर्जा लिया तुने. नवस काय? जत्रा काय? कंदुरी काय? पंगता काय उठोल्या. लोकायले हंड्यानं दारू काय पाजली. कित्ती मिजास दाखवली झिंगराजी पाटील? हे सारं काय फुकटात झालं बा? हैबत्या, ला बाबा कागुद पत्तर. मराच्या आंधी घे याचा अंगुठा.

**सखुबाई:** लालाजी, माया मालकाचं असं झालं. काय करताजी बाप्पा? माया डेबू उघड्यावर पडनं ना!. जिमिनीचा तितलाच तुकडा हाये, तो राहु दयानं जी. देव भलं करन तुमचं.

**लाला:** झिंगराजी, लगाते हो अंगुठा, गोविंदजीकी किरपासे, का घेऊ जबरीनं ?

**झिंगराजी:**लाला, माया अंगुठा घ्या, मायी जिनगानी घ्या. पर दोन घोट टाकाजी माया तोंडात. मराचं हाये मले. आता काहासाठी जगू? बायको पोराले नरकात धाडू मी? काहाले जीत्ता राहू? (खाटेवरून उठत घुसत लालाकडे जातो. विनवण्या करतो.) उलिशिक... उलिशिक दया मले, मंग नाई मांगनार, कवाच नाई मांगणार... दया... दया...न जी, लई आगाग होते जी आंगाची. नल्डा कोल्डा ठान झाला हाये. जीव गयात अटकला हाये. एक घोट दया ना मले... ऐ घोट... फकस्त....

**लाला:** पयले अंगुठा, मंगच दारूचा घोट. हैबत्या ! (हैबती कागद पुढं करतो, लहानग्या डेबूचा प्रवेश. शाईच्या शिशीतून शाई त्याच्या अंगठ्याला लावतो. कागदावर अंगठा लावून घेतो.) हैबती अब पिला इसको दारू गोविंदजीकी किरपासे. पोटभर पाज अन हौ, मांडून ठेवजो दारूचे पैसे याच्यां पोराच्या खात्यावरं. (हैबती शिशी लालाला देतो. लाला वरून दारूची धार सोडतो. झिंगराजी ओंजळीनं गटागटा पितो आणि तिथेच कलंडतो.) डेबू.... सखू... त्याची शुद्ध हरवते.



**सखुबाई:** मालक...... (डेबू सखुबाईला बिलगतो.)

**लाला:** अरे झिंगऱ्या, बावा दारूने तेरा नास किया, तेरेकु भिकारी बनाया. मराले टेकला. पर अक्कल नाई आली तुले. मर लेका आता तूच तुया मौतीनं, अन यायलेई मारून टाक ! कुत्र्यापरीस जिन्यापेक्सा ! सुनबाई झिंगऱ्या मेला का, हे घर मले खाली करून पायजे. कागुद करून देल्ला हाये त्यानं, गोविंदजीच्या किरपेनं !

**सखुबाई:** लालाजी, पोरगा लहान हाये, डोक्शावरचं छप्पर नका हिसकावूजी. मोलमजुरी करीन पर तुमचं रिन म्या फेडीन. आन हाये मले डेब्याची.

**लाला:** सुनबाई, झिंगऱ्यानतं नाई फेडलं बाप्पा. मंग तू कसी फेडसीन? जलम जाईन तुया अन् तुया पोराचा. गोविंदजी की किरपासे, अन हौ, म्या काई ठेका नाई घेतला. आखर माहाई पोट हाये, घरदार हाये, बायको पोरं हायेत. मग काय आम्हाले उपासी मारानं का, फकीर बनवानं? गोविंदजीच्या किरपाने?

**सखुबाई:** लालाजी, दया करा ना जी. आभायच कोसयन आमच्यावर. दया करा बाप्पा, आमच्यावर दया करा.

**लाला:** सुनबाई, दया तो गोविंदजी करतत. और वे बैठे है मथुरा-कासीमें. त्यायले नवस बोल, त्यायचे उपास तापास कर. त्याची कंदुरी कर. मले कायले, पाप लावतं बाप्पा. गोविंदजीच्या किरपेनं. चाल रे हैबत्या. गोविंद...! गोविंद ! गोविंद ! हरे ... हरे...! (दोघेही जातात. सखुबाई त्यांच्या मागे धावते.)

**सखुबाई:** अजी आमच्यावर दया कराजी, दया करा. आमाले कोनाचा आसरा नाईजी, अजी आयकानं बाप्पा.... माया डेब्याचा त् ईचार करा बाप्पा... (कोसळते... रडते. डेबू जाऊन तिला बिलगतो. तेवढ्यात झिंगरीजीचा कण्हण्याचा आवाज येतो.)

**झिंगराजी:**सखु... सखु ऽ ऽ डेब्या, डेब्या रे !(सखुबाई, डेबू धावत झिंगराजी कडे जातात.)

**सखुबाई:** हावोजी, हावोत, आम्ही अथिसाच हावोत, डेब्याई हाये.

**झिंगराजी:**आवं माय, आता कोनत्या तोंडानं तुमाले माफी मांगू. मराच्या दाङ्त्यात दारूनं पिच्छा नाई सोडला माया. मोठ्या नवसानं डेब्या झाला. त्याची वज नाई राखली म्या. देवाले कोंबडे- बकरी कापले, कंदूरी केल्या. दारूचं तिरथ पाजलं, पर माया जलमाचा अंधार काई सरला नाई. तुमालेई

अंधाराच्या खाईत लोटलं. आता देवाले तरी कसं तोंड दाखवू?

(घर घर वाटते. उचक्या येतात. खोकल्याची उबळ वाढत जाते)

**सखुबाई:** बाप्पा, आता नोका बोलूजी, उलिसक चुप रायना बाप्पा. बोलले का तरास वाढते तुमचा.

**झिंगराजी:** बोलू दे माय, बोलू दे ! आखरचं बोलू दे...

**सखुबाई:** अजी, आता बोलूनशानं काई उपेग हाये. डोक्शावरचं छप्पर गेलं. जिमीन-जुमला गेला. आता डेब्या मोठा झाल्यावर त्याले काय जबाब देईन.... बाप्पा !

**झिंगराजी:** खरं हाये बाप्पा, तुयं सारं खरं हाये, पर आता येळ निंघून गेली माया हातातून. लय पापी हावो म्या. सडून-सडून मरन म्या. नरकातई जागा नाई भेटन मले. म्या तुमच्यावर जहर खाची येळ आनली. देवा उचल रे मले, उचल. आता नाई सहीन होत बाप्पा.... सखु ह्या दारूनच माया जिनगानीचा नरक केला. ह्या दारूपासून, दारुड्या, देवायपासून डेब्याले दूर ठिवजो. नवस, कंदुरी, उपास तापासात काई ठिवलं नाई माय. मानसाले नरकात धाडते ते. रिन घेऊन शानं आपलं मरनई म्याच आनलं. माया मनात, डोक्शात अंधार भरला होता. म्या घरादाराची राख केली. संसाराची वाट लावली. मले माफ कर बाप्पा माफ कर. देवा, पांडुरंगा, ईठ्ठला ऽऽ, सखु ऽऽ, डेब्या ऽऽ

(दुखणे वाढत जाते. श्वास अडकतो. घरघर वाढते. झिंगराजी आचके देत गतप्राण होतो.)

**सखुबाई:** मालक ऽ ऽ (किंकाळी)

**डेबू:** माय ऽ ऽ ऽ (रडतो. पार्श्वभागातून गाणे सुरू होते.)

दारूपायी बुडाला धंदापानी, ना ये बलुतही हाती
सखु- डेबुच्या सुखाले, आली शनि-साडे साती ।।

**अंधार**



## अंक पहिला - प्रवेश दुसरा

(**स्थळ:** दापुरा. चंद्रभान कोळसकर यांचे घर, पहाटेची वेळ. वासुदेवाचा आवाज कानावर पडतो. 'वासुदेव आला हो वासुदेव आला.' दान पावलं हो ऽऽ ! डेबू आता थोडा मोठा झालेला.)

**वासुदेव:** वासुदेव आला हो वासुदेव आला. दान पावलं ऽ ऽ ऽ हो ऽ ऽऽ (डेबू ताटात ज्वारी आणून देतो.) डेबू दादा होये का? सखु माऊली दिसत नाई कुठीसा?

**डेबू:** वासुदेव महाराज, कामात हाये मायी माय. काऊन बाप्पा? माया हातचं चालत नाई का तुले दान ?

**वासुदेव:** काईई बोलतं बाप्पा. अरे सखु माऊलीच्या हातची आदत झाली हाये मले. तिचं तोंड पायलं का लय ऽऽ दान भेटते मले. (शांतता) मावलीनं लय भोगलं हाये डेबुदादा. पर हिंमत नाई हारली कधी, का... रडगानं नाई गायलं कधी. लई धीराची, हिंमतीची हाये तुई माय !

**डेबू:** वासुदेव महाराज, तिनंच जागोलं मले,मोठं केलं. तिच्या धिरानचं त् मले लय शिकोलं. आताई कितलं काम करत रायते. रात असो का दीस, तिले कामापासून फुरसतच भेटत नाई. म्हतलं, त् मलेच म्हनते, डेब्या कामानं मानूस मरत नाई कधी... मग कामाले काऊन भ्याचं?

**वासुदेव:** सखु माऊली खरंच बोलते डेबू दादा.... दे जरा तिले आवाज. माऊलीले भेटल्या बिगर माया दिस नाई चांगला जानार. दे बरं आवाज तिले....

**डेबू:** मां अव मां. येतं का भाईर जराशीक? ह्या वासुदेव महाराज आला हाये तुले भेटाले. जात नाई म्हनते तुले भेटल्याबिगर.

(हातात सूप घेऊन सखुबाई येते.)

**सखुबाई:** काय झालं वासुदेवा. भेटलं नाई का तुले दान? डेब्या वाढलं नाई कारे बाप्पा?

**डेबू:** अवं मां, हे वासुदेव महाराज लय लालची हाये. दान त् घेतलं, पर संगत सखुमाऊलीचं...

**वासुदेव:** मावले तुया दर्शनाबिगर दान पावत नाई मले. (सखुबाईच्या पाया पडते.)

**सखुबाई:** काय होय रे बाप्पा हे तुयं. अरे वासुदेव हाये तू. तु आमच्या पाया पडला त् आमालेच लागन ना पाप !

**वासुदेव:** अन म्या तुमच्या पाया नाई पडलो त् मावले मले लागन ना पाप. पावलं दर्सन आता जातो म्या. 'ओ ऽऽ दान पावलं, वासुदेव आला हो वासुदेव आला....' (वासुदेव जातो.सखुबाई दळायला बसते. जात्यावरचे गाणे गाते. डेबू तिच्या जवळ जाऊन बसतो.)

**सखुबाई :** दान्या सरीखी जिंदगी भरडली जाये,
तवा पिठ पडे असे पिल चोचीतून खाये
माय मायेची भाकर, माया माहेरचं देनं
अथि सुखाचा संसार, जसं फळफळे बेनं ।।
(डेबूही गाणे गाऊ लागतो. सखुबाईला दळण दळू लागतो.)
सासरं माहेर कसा सासांचा बाई खेय
माया डेब्याच्या जिवाले असा लावू नको घोर...

**डेबू:** बुरा जो देखन मै चला, बुरा ना मिलिया कोय
जो मन खोजा आपना, मुझसे बुरा ना कोय

**डेबू:** माय, कितला गोड आवाज हाये तुया. किर्तीदा आयका पर मन नाई भरत मायं.

**सखुबाई:** आला मोठा गानं आयकनारा. जाय अन् काम कर पयले, सारे जागे व्हाच्या आंधी.

**डेबू:** अव माय, काई काम ठिवलं नाई तुयासाठी बाकी, पाय गोठा सफा केला. शेनोडा मुतोडा उकंड्यावर टाकला. गाई म्हशीले कडबा-कुटार टाकलं. बैलाचा खराटाई झाला. आंगन परस झाडून सफा केला. बरं, आता तुयं काम झालं का शिदोरी दे. निंघतो मंग गोठानावर गोधन घिवून.
(डेबूची मामी - कौतिका, आणखी एक टोपलं ज्वारी आणून ठेवते. कुत्सित, नजरेने त्यांच्याकडे बघते. सखुबाई डेबूही बघतात. ती जाते. डेबू उठतो. जायला निघतो.)

**सखुबाई:** बाबू, थांबनं जरासाक. देतोनं शिदोरी बांधून (ती आत जाते.)
(डेबू भजन गुणगुणतो. ''चदरिया झिनी रे झिनी रे... पाच तत्व की चादर बनाई, कोनसे तार से बिनी चदरिया झिनी रे झिनी...'' मुंडासं आणि काठी घेतो. सखुबाई शिदोरी आणून देते.)

**सखुबाई:** हे घे. वख्तावर खाजो. नाही त् बससीनं तथीसा समाधी लावून. नाही त् भजन म्हनत. भुलून जाशीन.



**डेबू:** किर्तीदा सांगशीन व् माय. मायं काम भुलतो काव मी कंधी? कायजी ठिवली का मामाजीले काई गुराढोरायची? पाय बरं कसे आंगात भरले हायेत. आवं, मुके जनावर हायेत. मायं पिरम हाये त्यायच्यावर. अन् माय, मायावरई लय पिरम हाये त्यायचं...मले पायलं का लय हंबरते थे.

**सखुबाई:** बाबू रे, आता तू मोठा झाला हाये. कवापातूर गाई ढोरंचं चारत बससीन? आता मामाचं वावराचं काम आंगावर घे. बळीले सांभाय. त्यालेई शिकव काम. औत धर आन होथ आता धुरकरी. मामाले आराम करू दे आता. थे होते, म्हनुंशाने निभलं आपलं.

**डेबू:** मले काय म्हाईत नाई मा? बापाचा आसरा गेल्यावर मामानंच छप्पर देल्लं. भाकर देल्ली, आंगावर धडुते देल्ले. पर मामीजीले नाई पसंद आलं. जवा तवा आपला दुस्वासच करते मामीजी.

**सखुबाई:** कवतिका आखर मामी होय रे बाबू तूयी, दुस्मन नाई. कवतिकीले आदतच हाये तसं बोलाची पर मनानं चांगली हाये तुयी मामी. तू काई लक्ष नोको देत जाऊ तिच्याकडं. तोंडानंच गेली मायबाई. पर तुयावर लय माया हाये रे तिची.

**डेबू:** कायची माया हाये? मले टोमने मारत रायते. नाई त तुयावर फनफनत रायते. तिले वाटते का तिचा जमीन जुमलाच हडप कराले आलो आपून. बळीचे कान फुकत रायते. पर मी ध्यानच देत नाई. कबीरजीचं वचन हाये.

'जाके जिभ्या बंधन नाही, हृदय नही है साच
वाके संग ना लगीये, जो हो अपनी बाट'

**सखुबाई:** लय शायना हायेस तू अन् तुया बळीई समजदार हाये. मायासाठी त् तू राम अन् थो लक्षीमनच हाये. पायलं नाई कवतिकेले कसा फटकारत रायते थो. त्याले कदर हाये तुही अन् मायी.

**डेबू:** मलेई लय हिंमत हाये त्याची. मामाजी, आबुजी, अन बळी याईच्या इकळे पाहून जीव लागते माया अथिसा. नाई त् निंघून गेलो असतो कुठीसाई. अन् संगत तुले घेऊन गेलो असतो.

**सखुबाई:** इचवाचं बिराड पाठीवर. बाबु रे, जीव लहान नोको करू. आपुन इमानदारीनं आपलं काम कराचं. कष्ट कराचे. आयतं खाचं नाई. ढोरावानी

राबाचं, आपुन गरीब हावोत रे बाबू. आपल्या पाशी जमीन जुमला नाई, का सोताचं छप्पर नाई. तुया बापानं दारूत, रिनात सारं गमावलं. अन् लाला सावकारानं आपल्याले रस्त्यावर आनलं.

**डेबू:** आठोते माय मले, आठोते सारं. इसरलो नाई म्या काईच. माया मनात घर करून हायेत त्या आठोनी. पयलांदा अंधार पायला त्या दिसी. दारूसाठी बाचं लाचार होनं, सावकाराचं आपल्याले रस्त्यावर आननं. कसं इसरू माय, कसं इसरू? माया मनात लय अंदर पातूर घुसलं हाये ते सारं.

**सखुबाई:** आता पायटीच्या पारी मन कायले आंबट करून घेतं? जाय कामाले जाय बरं. अन् हौव मेहनतीनं मानसाची इज्जत वाढते अन् हिंमतई.

**डेबू:** मेहनतीले नाई व् भेत तुया हा डेब्या, मा... तु काई फिकीर करू नोको. मंग जाऊ आता म्या?

**सखुबाई:** जाय नां बाप्पा, जायनं... कोनं रोखलं हाय तुले?

(तेवढ्यात बबन्याचा आवाज येतो.)

**बबन्या:** डेब्या, ओय डेब्या, हाय का रे सरदारा घरात? हर्ऽऽ हर् ऽऽ. आरं हात् तिच्या बहीन. लमचीच्या आईकनरे बाप्पा. थांब दुसमाना येसनच ओढतो तुयी. का टोचू तुले आरू? (आत येतो.)

**डेबू:** काय होय रे बबन्या? कायले टेंभलून रायला मगांनपावतूर?

**बबन्या:** पायनं या लमीचीच्याले ! आयकतच नाई. असा फुफाट्या सारखा पयते काय ऽऽ, ढुशा काय ऽऽ मारते, कितलं डामटलं बाप्पा मले. पायनं....

**डेबू:** कावून बाप्पा? चाल बरं पायतो मी.(दोघेही जातात. कौतिकाबाईचा प्रवेश. डोक्याला फडकं बांधलं आहे. दात घासते आहे. सखुबाईची तिची नजरानजर होते. सखू संकोचते. ती आणखी जोराजोरात जाते फिरवू लागते. पडद्या मागून बबन्याचा आवाज येतो.)

**बबन्या:** आरं व्वा ! डेब्या काय कमाल केली तुवा. बैलाच्या आंगावर हात फिरवला काय? अन् बैल लोन्याचा गोया झाला. मुकाट्यानं खाचराले जुतला तुवा. व्वा. मानलं गड्या तुले. (आत येतात.)

**डेबू:** आरं बबन्या, तुले कोनी निरा हिडीस फिडीस केलं त् चालते का?



(कौतिकाबाई कडे पाहात) तुले आवडत नाई, मग तुया बैलाले कसं आवडीन? निरा त्याले कामाले जुतत रायतं. आरूनं टोचत रायतं. बबन्या, आरं कंधी मंधी पिरमानई हात फिरोत जाय. मुकं हाये म्हून काय जीव नाई त्याले? पोटभर खाऊ घालत जाय. तू कसा खात पोट फुटस्तवर. आता तू असा वागतं मंग त्यायचं डोकसं नाई सटकन का? बबन्या, कसाबा सरीखं वागनं सोड, मंग पाय, तुये बैलई तुले कसे जीव लावतंत थे. (हंबीररावाचा प्रवेश)

**हंबीरराव:** आरं बाबू, कामाच्या बैलाचं ठिक हाये पर खट्या बैलाचं का कराचं? का फुकटाचंच खाऊ घालत राहाचं? पायनं गोठ्यात बांधून ठिवला हाये थ्या खट्या बैलाले. कसाबाले दिऊन टाक म्हतलं त् मायावरच डाफरते.

**डेबू:** आबूजी, बैल खट्या झाला म्हून का त्याले जीव नाई ? तुमच्या सरीखे लोग बुढे होते त् मंग काय त्याईले दिऊन टाकावं कसाबाले? असं बोललो म्हनजी राग येते तुमाले.

**हंबीरराव:** पाय व सखू. कसं बोलते तुयं पोट्टं ! सांडा सारखा चरते इथंसा फुकटच अन् मले कसाबाले देतो म्हनते.

**डेबू:** आबूजी, तुमाले नाई म्हतलं म्या. ढोरायले जीव असते का नाई? इतके वरीस तो बैलई राबला नाई तुमच्यासाठी? इसरता तुमी. लोकांच पायना, पानी पाजतात पनं जू मानेवर ठिवून. तोंडाले फेस येई पावतर माल भरतत खाचरात. आरूनं टोचून टोचून रक्तबंबाय करतत. पोटभर खाले देत नाई. मुक्या जीवाले गांजोतत नाई लोकं? (हंबीरराव गप्प)

**कौतिका:** बाप्पा बाप्पा कितलं तोंड फुटलं रे तूले, वडा वरच्या मुंज्या? मंगा पासून पाहुन रायली. नुसता चरक चरक करून रायला. भादऱ्या वांग्या वानी.

**बळी:** (आतून येतो) काय होय वं मां. सकाय सकायच्या पारी भन-भन करून राह्यली. दादा बरोबर त् बोलून रायला.

**हंबीरराव:** हा आला तुवा चेला. तुयी बालीस्टरी कराले.

**बळी:** आबुजी, हावो, हावो बालीस्टरच हावो. दादाचा. मंग करू का केस तुमच्यावर?

**कौतिका:** आबूजीची अशी मजाक करू नोये बाबू.

**बळी:** चाल रे दादा मी येतो संगं. आतीबाई मले कावून नाई उठोलं. दादा

एकलाच काम करत रायते. दादा, हो तू पुढं गोठानावर. मी आनतो गाई तथिसा.

**कौतिका:** अरे बाबू, शिदोरीतं घिऊन जाय, का उपासी रायशीन? थांब भाकर देतोना बांधून.

**बळी:** तुच खाजो माया वाटनीची. दादाले इचारलं का तुवा कधी? नाही त् आतीबाई पाय. दादाच्या आंधी मायी शिदोरी बांधून देते. जातो मी. (हंबीरराव कडे जातो.) आबूजी नाराज झाले का जी? नातू नोये का म्या तुमचा? आबुजी म्या गंमत केली ना जी.

**हंबीरराव:** डेब्या जाते ना ढोरं घिऊन? तू कायले जातं बाप्पा ! तुलेई बिघडवन ना थो. जाय झोपून राय चांगला.

**कौतिका:** आबूजी बरुबर तं बोलून रायले ना रे बाबू. तुहे काय हे काम कराचे दिस हाये?

**बळी:** मंग काय देवबैला सरीखं फुकटचं खाऊ? गावभर उंडारू. त्या परिस कामच बेस हाये. तितकीच दादाची संगत भेटते. लय सिकोते मले थो, नया नया गोठी, भजनं, नदीत पोयनं, ढोरायची सेवा करनं, आयतं खान्यापरीस हे बरं हाये का नाई?

**हंबीरराव:** थांब! मग मीई येतो ना. नाई तं उद्या मलेच म्हनान, बुढा फुकटचं खाते म्हून.

**डेबू:** (परत येत) बळी असं बोलू नये मोठ्या मानसायशी. आबुजी तुमी कायले मनाले लावून घेता. लहान हाय थो.

**हंबीरराव:** त्याचं जाऊ दे, पर तुया काई भरोसा हाये का? आता करता-सवरता झालात तू, आता शिंग फुटलेना तुले? मंग उद्या त्यालेई फुटन.....

**कौतिका:** नाई तं काय? माया बळीलेई बिघडवून रायला या. मले तं बाप्पा, लय कायजी वाटते. पन काय करू ! 'नशीबी पडलं अन् वाजोनं घळलं.'

**बळी:** बाप्पा! मोठ्ठी आली वं मा कायजीची, सोताची कायजी कर. दिस भर डोक्शाले फडकं बांधून,डेबू दादा अन् आतीबाईले साटीसराप करत राह्यतं.

**डेबू:** मायले असं बोलते काय रें कोनी? हेच शिकोलं काय म्या तुले? चुप रायनं. चाल लवकर.... ढोरं गेले पुढं. घुसन नाई त् कोनाच्या वावरात.

**बळी:** चाल दादा. (दोघेही जातात. ते गेल्यावर चंद्रभान मामा घरातून येतात. सखुबाई पाणी आणून देते. कौतिकाचे दात घासने सुरुच.)



**चंद्रभान:** गेले वाटते राम-लक्षुमन ढोरं घेऊन गोठानावर. कौतिके, किती येळ दात घासत रायशीन. पडतीन ना दात तुये. नाई तं बोटं गयून जातीन.

**कौतिका:** बाप्पा! पोट्ट तं पोट्टं ! बापई गम्मत करते मायी. मी काय दुस्मन आहो तुमची?

**चंद्रभान:** कौतिके, बळी मोठा झाला हाये, त्याले समजाले लागलं हाये आता दुनियादारी. तू त्याच्या वाटी गेली तवाच उलटं बोलते थो. तुया तोंडाले आवर घालत जा नां. तू. अन बा, तुम्ही कायले पडताजी माय-लेकाच्या भांडनात. (चंद्रभाना... अरे चंद्रभाना... अशा भटजीच्या हाका ऐकू येतात.)

**भटजी:** अरे आहेस का बाबा घरी?

**चंद्रभान:** भटजीबुवा, या...या... अज भुदेवाचे पाय, माया दाड्याले कसे काय लागले जी?

**भटजी:** शिंच्या, तो डेब्या कुठं गेला?

**हंबीरराव:** काय झालंजी भटजी बुवा? आता काय केलं डेब्यानं?

**भटजी:** कुठे आहे तो डेब्या?

**चंद्रभान:** गोठानावर गेला हाये जी तो. काऊन? काय काम आहे जी डेब्याशी. आता डेब्यानं काय केलं हाये?

**भटजी:** चंद्रभाना... चंद्रभाना... हे विचार काय नाही केलं त्यांनं?

**हंबीर:** म्हनजे?

**भटजी:** अरे आपला धर्म बाटवतो आहे तो.

**कौतिका:** आरं देवा, पांडुरंगा... ईठ्ठला...

**चंद्रभान:** कौतिके, चुप रायनं माय. काय केलं डेब्यानं?

**भटजी:** काय ऽऽ केलं? अरे चिचोन्याच्या महादेवाच्या पिंडीला हात लावला त्यानं. म्हणजे शिवाशिव केली त्यानं.

**चंद्रभान:** पर तथिसा त् कोनीच जात नाई जी, काट्या-कुट्यात, झुडपात दडली हाये म्हने महादेवाची पिंड. तुमी कधी गेलते का जी तथीसा?

**भटजी:** अरे चंद्रभाना.... आम्ही भुदेव आहोत. सारे देव, त्यांच्या मूर्ती आमच्या अखत्यारीत असतात. आम्हाला तिथे जान्याची गरजच काय म्हणावी?

**हंबीरराव:** भटजीबुवा आखर डेब्यानं केलं काय हे पयले सांगा !

**भटजी:** अरे त्यानं म्हणे गुराख्यांची टोळी जमा केली. महार, मांग, तेल्या, तांबोळ्यांना सोबत घेतले. महादेवाची पिंड स्वच्छ केली. म्हणजे स्वत:च्या हातांनी धुतली. तात्पर्य काय? विटाळच केला ना शिंच्यानं. पुजा काय? आरत्या काय? प्रसाद काय? प्रवचन काय? कीर्तन काय? भंडारा काय? काय; काय नाही केलं त्यानं? आम्ही असतांना पुजा, अर्चा करण्याचा अधिकार कोणी दिला रे त्याला? वङ्गी आहेस म्हणावं वङ्ग्यासारखा वागायला शिकवा त्यास, नाहीतर प्रलय होईल, प्रलय. सांगून ठेवतो. शिव.... शिव...शिव...

**चंद्रभान:** माफ करजा भटजी बुवा. गावाची , धरमाची रीतभात नाई माईत त्याले. लहानच हाये डेब्या अजून. पर सांच्याले घरी आला, का डटावतो मी त्याले. तुमी फीकर करू नोका. भटजीबुवाचा धरम बाटवते म्हणजे काय? झाडा झुडपात, आडगयीत पडलेल्या पिंडीले सोच्छ करते म्हनजी काय? अन् ते ही म्हारमांगा संगत. येऊ द्या त्याले घरी.

**कौतिका:** म्हनत होती ना म्या, पर मायं आयकते का कोनी? 'चोराचं गाणं अन लोळाचं गरानं' बळीलेही बिघडवलं त्यानं. अन् तुमी मलेच बोलताजी.

**हंबीरराव:** आता कसं कराचं बा या डेब्याचं?

**चंद्रभान:** बा. आता तुमी कायले बोटं मोडता त्याच्या नावानं? काय गलत केलं त्यानं? भटजीबुवा गेल्ते का कधी तथिसा काट्या-गोठ्यात महादेवाची पिंड सफा कराले? त्यायनं केली का कधी पुंजा अर्चा तथिसा? यायची दक्षिना बुडाली त् मंग यायले पिंड आठोली.

**कौतिका:** देव कोपन म्हनजी? बामनाच्या कामात हा कायले खोडा घाल्ते? बामन भुदेव हायेत. त्यायची बरूबरी हा कायले करते? पाप लागन पाप. कुळाले बट्टा लागन ना!. कायलेच आनलीजी हे अवदसा आपल्या घरामंधी. अन् त्याची माय पायना, कसी तोंडाले ताला लावून बसली हाये. तिले आपला नवरा सांभायता आला नाई, आता हे पोट्ट सांभायता येत नाई. सखुबाई, डोये फुटले काय तुमचे? का कान बैरे झाले. पोट्ट्याले अगुटा, नाई तं आनन आफत माया घरावर. घ्या लागननं बहरम बोवाचे टोले.

**चंद्रभान:** कौतिके, लय बोलून रायली वं . जित्ता हावो म्या अजून. माया नावाचं कुकू पुसल्यावर बोलजो. चुप्प राय आता. चाल होय घरात. पन्नावीन



नाई तं......

**हंबीरराव:** चंद्रभाना,अरे कोना कोनाच्या तोंडावर झाकन ठिवशीन बाप्पा. डेब्यासाठी कोना कोनाशी वैर घेसीन? आन सखुबाई तुयाई मोकाट बैलासारखं काऊन सोळलं त्याले? आवर माय आवर त्याले. मले कायजी वाटते त्याची.

**सखुबाई:** बा, त्याले रीतभात कयत नाही. पर म्या समजावन त्याले. बिना बापाचा वाढला हाये थो, देवा धरमाले लागला, भलं वाटलं मले. तुम्हाले. घोर लावासाठी नाई केलं असीन त्यानं. बा, लहानच हाये अजून थो, आयकीन मायं तो.

**हंबीरराव:** लहान हाये? अजून लहानच हाये? मिसरूड फुटली, अगडबंब वाढला हाये. पायलीच्या भाकऱ्या रिचोते, तरी लहान हाये म्हनते? सखु आता का पायन्यात टाकते त्याले?

**चंद्रभान:** बा, खरं हाय तुमचं. डेबू आता लय मोठा झाला नाई? त्याले येसन तं घातलीच पाह्यजे. बाई वं आता चूप नाई बसनार म्या. सांगून ठिवतो तुले. मंग म्हनू नोको मले.

**सखुबाई:** भाऊ....

**चंद्रभान:** बोलू नोको आता काई. मामा हावो म्या त्याचा. पोरग हाताभाईर गेलं त् कसं हुईन ? जातवाले काय म्हनतीन, मामानं ध्यान नाई देल्लं म्हून. जातीसाठी माती खा लागते. समजलं.

**कौतिका:** म्या म्हनतो त् मलेच डटावता. कयल ना व आता तुमालेई ? मामी हावो मी त्याची दुस्मन नाई. आता आलाना घरी का कराचं त्याची खटीया खडी. अन् थ्या बळीलेई पन्नावा. थोई लय चरक चरक कराले लागला हाये डेब्याचा संगतीनं.

**चंद्रभान:** आता, तू आपली चरक चरक थांबव पयले, मले इचार करू देतं का जरासाक. कायले आपलंच घोडं दामटतं?

**हंबीरराव:** बाबू, जवान पोरगं हाये. जरा पिरमानं घेजो. लय गरम दिमाखाचा हाय डेब्या, सखु माय संभाऊन घेजो त्याले. तुयच आयकते माय तो.

**कौतिक:** त्याईच्याच लाडानं तं वाया गेला डेब्या. त्या काय संभायतीन?मोकाट सुटला हाय सांडावानी. पयलेच दाबा लागते.

**चंद्रभान:** अन तू काऊन हडळी सारखी त्याच्या अन् बळीच्या मांग लागतंवं?

**हंबीरराव:** चंद्रभान बरूबर बोलते सुनबाई. परके नाई ते. आपल्याच रक्ताचे हाईत. अन् कावं तुले काई बोलते का डेब्या? काहून त्याले बदनाम करतं?

**कौतिका:** बाप्पा. साधु महाराज हाये ना तुमचा डेबुजी. डोक्शावर बसून झिंज्या उपटन ना तवाच बलावजा मले. जवा तवा सारे मलेच बोलता बाप्पा. जसी काय मीच काया तोंडाची हावो. निऊन घाला मले माहेरी. आन राहा मंग सुखानं अथिसा. नाई त् मीच जातो घर सोडून. (भोकांड पसरून खोटं खोटं रडते.)

**सखुबाई:** कौतिके रडू नोको माय. पदरात घे तू या माया पोराले. अन् तू कायले जातं माय घर सोडून. आमीच जातो ना! तुमाले कायले तरास? कुठंसाई दोन घास मियन. काम करू, माया डेब्याची हिंमत हाय मले. बापाच्या सावली बिगर लायनाचा मोठा झाला हाये थो. बेसहारा असला तरी ठसनीचा हाये, बानीचा हाये माया डेबू.

**हंबीरराव:** खबरदार असं काई बोलसीनत् त् ! मी जित्ता हाय अजून. कोनीच कुठीसा जानार नाई. अन् कौतिके तू कायले माय तमाशा करतं? चंद्रभान हाय न् डेब्याले समजावाले.

**चंद्रभान:** बा, काई कायजी करू नोका. सांजच्याले सोक्षमोक्षच लावतो. माया कवतिकेले बोलते नाई! देवधरम बुडवते नाई? धरम बाटवते नाई? म्हारामांगाले पंगतीत बसवत नाई? अरे डेब्या, नाई अशी येसन घातली तुले त् नावाचा दापुऱ्याचा चंद्रभान कोळसकर पाटील नाई मी !

**कौतिका:** तुमी कायले वज्जर मनांले लावून घेताजी? आमी असंच बोलून रायलो. मजाक मजाकीत !

**हंबीरराव:** चंद्रभान काऊन गा असं बोलतं? लहान लेकरूच हाये थो. कवतिका नाई म्हनली का आता. मजाक करते म्हून.... मग मी ई मजाकच करून रायलो ना बाबू, लय चांगला हाये आमचा डेब्या. कितलं काम करते. दिसरात राबतच रायते गडी.

**चंद्रभान:** बा, कवतिके, पर मी नाई करून रायलो मजाक. अशी घालतो त्याले येसन, का जिनगानी भर इसरनार नाई थो.

**सखुबाई:** भाऊ! माफ कर डेब्याले!

**हंबीरराव:** चंद्रभाना झालं असन ना आता? शांत होय बाप्पा. चूप राय बरं आता.



**कौतिका:** (कांगावा करीत) म्या नाई काई केले रं बाप्पा, काई नाई म्हनलं म्या कोनाले. नाई त् मायाच नावानं बोटं मोडान. घालाची हायेना येसन तुमाले त् घाला बाप्पा. मामा जानो न मामाचा भासा जानो. मले नाई काई कराचं लोकाचं ? 'ज्याचं करावं बरं तो म्हणते मायचं खरं,' आपले कानावर हात हाये रे बाप्पा. सांगून ठिवतो. (तरातरा निघून जाते.)

**अंधार.....**

## अंक पहिला- प्रवेश तिसरा

(डेबू, बबन्या, सोनाजी, बळी घराच्या अंगणात बसलेले आहेत. त्यांच्यात चर्चा सुरू आहे . इतर मित्रही दाखविता येतील.)

**बबन्या:** डेब्या, अरे खरी आग त्या भटजी बोवानं लावली हाये राजा. त्याची दक्सीना बुडवली ना तुवा. येदाचाय अपमान केला म्हने तुवा.

**बळी:** दादा, बा चे, आबुजीचे अन् मायचेय लय कान भरवले त्यानं.

**डेबू:** भटजी बोवानं त्याईचं काम केलं राजेहो, करू द्या. आपलं काम आपून करावं. आपुन काई पाप नाई केलं. काट्या कुट्यात, झाडीत अटकेल पिंड मोकई केली. तथची जागा सफा केली हे काय धरमाचं काम नाई?

**बबन्या:** पर भटजीन म्हतलं म्हने का, म्हार-मांगाले, तेल्या-तांबोयाले डेब्यानं संगत ठेवलं. त्यायनई पिंडीले सिवासिव केली.

**डेबू:** बाप्पा इतके दिवस झाडाझुडपात, काट्या कुट्यात पिंड होती पडून तवा भटजीबोवा काऊन नाई आले तथिसा, बामनायले घिऊन महादेवाची पिंड सफा कराले? बामनायचे असेच डाव रायते राजा. कबीरजी म्हनतत....

बामन रुप छले बलीराजा, बामन किन्हो कौन से काजा?
बामन ही किन्ही सबऊ चोरी, बामन ही को लागत खोरी ।।
बामन किन्हो वेद पुराना, कैसे कोई मनुष्य जाना ।।
वेद हमारा भेद है भाई, साचा वेद हम हू जाने, और ना जाने कोई ।।

**बळी:** दादा, कष्टाचं काम कराचं लय जीवावर येते ना त्यायच्या, आयतं पायजे त्यायले देवाच्या नावावर, दोन मंतर म्हतले, उलीशिक पूजा केली का, मियते ना फुकटची दक्सीना. कोन जाईन मंग कस्टाले?

**डेबू:** गडे हो, सिवासिव, जातपात लय वाईट हाये. म्हार-मांग, तेली-तांबोळी काय मानस नाईत? देव सांगते का असी सिवासिव कराले, अन् जातपात मानाले! अरे आपून सारी मानंस हावोत. हाडामासाची, एकाच रगताची. म्हून म्या ठरोल हाये, चार -पाच म्हारं-मांग गुराखीच काय? गावातल्या साऱ्याच जातीवाल्यायले बलावून चिचोऱ्यात भंडारा करू. एकाच पंगतीत बसवाचं हाये मले साऱ्यायले.



**सोनाजी:** व्वा डेबू! हे तं लयच बेस होईन. पर सारे येतीन का बा?

**बळी:** येतीन सोनाजी भाऊ, तू कायले कायजी करतं. ज्यायले याच असीन ते येतीन. आपन देवा धरमाचं काम करून रायलो ना?

**डेबू:** भंडारात होईनच गडे हो! पर नुसती पुजा-गिजा नाई कराची, त्या परीस लुल्या,लंगड्या, आंधया-पांगयाले जेऊ घालाच. साऱ्या धडधाकटायन त्या दिसी गाव झाडाचं, मोऱ्या सफा कराच्या, शेनोडे, मुतोडे, उकंडे सफा कराचे. सारं गांव सफा झालं पाहिजे.

**बबन्या:** असाई भंडारा असते का रे डेब्या?

**बळी:** दादा, लोकायले आदत नाई, अशा कामाची. आपलंच आंगन झाडत नाईत, मोऱ्या तुंबून रायते, मंग हे लोक गावाची सफाई कसी करतीन?

**डेबू:** बळी, हेच पटवाचं हाये लोकायले. असोच्छते पायी रोगराई पसरते, बिमाऱ्या होतत. लोकं किड्या-मुंग्यावानी मरतत. म्हूनशानं गावाची सफाई, सोच्छता करनं देवा-धरमाचच काम हाये.

**सोनाजी:** पर डेब्या, गावाची सफाई कराले, इतलं सामान कुठीसा हायगा आपल्यापासी?

**डेबू:** सामान कायले पायजे बाप्पा. हे काय सरकारी काम आहे. गावात तुराट्या काय कमी हायेत. त्यायचे खराटे बनवू. फुटल्या मडक्यायचे घमेले बनवू, बास्स !

**बबन्या:** आरं व्वा.... हे तं माया खोपडीतच आलं नाई बा. लय बज्जड हाये काय मायी खोपडी? का खकानाच भरला हाये निरा?

**डेबू:** ह्या खकानाच साफ कराचा आहे बबन्या. डोक्शातला, मनातला, आंगावरचा, गावावरचा, देवावरचा, धर्मावरचा, अन् मानूसकीचा खरा धरम सांगाचा हाये लोकायले.

**सोनाजी:** त्यानंच लोकायले जितता येईन. हाय न रे डेबू?

**डेबू:** गडे हो, ह्या कष्टाचा धरम आहे. मेहनतीचा धरम हाये. निसता टाय कुटत अन् ढोलकी बडवत देवाची पूजा नाई होत. मंतरा-तंतरानं कोनाचंच भलं नाई होत. खरा देव तं लुल्या, लंगड्यात, आंधया-पांगयात दिसते मले. बाटवेगीरी सांगनारा धरम अन् जातपात सांगनारा देव नाई पटत मले. मानसाचा, मानूसकीचा धरम आपून लोकायले सांगू, कबीरजी

म्हनतत...

'सत्य धरम की ये महताबे, साहिब के दरबारा
कहत कबीरा सुन भई साधो, सत्य धरम है सबसे न्यारा'
सत्य धरमच आपून लोकायले सांगू. ठिक हाय मंग?

**बबन्या:** चला त् मंग आताच कामाले लागू. कल करे सो आज कर, आज करे सो अब. पयले पुर्नामायच्या पात्रात आंघुय करू अन् मंग चिंचोन्याचा महादेवाले भंडाऱ्याचा अभिषेक करू. चाला रे चाला, लवकर चाला गडे हो ! (कौतिकी येते.)

**डेबू:** बबन्या अन् बळी तुमी जा म्होहरं, आवंतन द्या साऱ्यायले. मी अन सोनाजी निघतो पुढं चिचोन्या कडं

**बळी:** हौव. दादा, निंघ तू. बबन्या संगत आलोच मी मागून. चाल गा बबन्या. (सर्व जातात थोड्या वेळाने चंद्रभान येतो.)

**चंद्रभान:** कुठीसा हाये डेब्या ? (सखुबाई येते.)

**कौतिकी:** गेला बाहीर. बळी लेय नेलं संगत.

**चंद्रभान:** आवं पन कुठीसा गेला? थे सांगसीन का मले मायमाजे?

**कौतिकी:** गेला चिचवनात पासला पडाले. म्हार-मांगाच्या पोरासोराईले घिऊन. भंडारा कराचा हाये म्हने.

**चंद्रभान:** हूँ ऽऽ! अन आबूजी?

**कौतिकी:** सावकारानं बलावनं धाडलं होतं, तथीसा गेले अस्तीन.

**चंद्रभान:** बळी दिसत नाई?

**कौतिकी:** मले काई ठाऊक नाई. मले का कोनी सांगून जाते? म्या तं नकटी कारभारीन हाये या घरची. फकस्त कान,डोये उघडे ठिवतो मगच काय ते दिसते मले, काय उजागरी हाये का मले? घेनं नं देनं, कंदिल लावून येनं.

**चंद्रभान:** बरं, बरं, ठिक हाये. भाकरी खाऊन गेले का, उपासीच धाडलं पोरायले?

**कौतिकी:** माया हातचं खाते का थो? तुमच्या बहिनीच्या हातचच गोड लागते ना त्याले.

**चंद्रभान:** तीचं काय चुकते? पिरमानं कधी करून खाऊ घातलं तू त्यायले? सारं काम बाईचं करते. अन् तू...देशमुख-पाटलाच्या बायकोवानी बसून



अथिसा आड्डर देत रायतं. अव ते माय लेक हाये म्हून या घराची सान हाये.

**कौतिका:** बाप्पा! (सखुबाई येते)

**सखुबाई:** कवा आला गा भाऊ?

**चंद्रभान:** कुठीसा व्हतीवं बाई तू. चार खेप इचारलं इले म्या!

**सखुबाई:** अरे भाऊ मडके टिचकले हायेत घरातले. कुंभाराच्या घरी गेलती.

**चंद्रभान:** बरं... बरं... डेब्या कवा येनार हाये?

**सखुबाई:** सांच्यालेच येत असते बाप्पा तो ढोरं घेऊन. काऊन रे भाऊ, काई काम हाये का त्याच्याशी? का काई....(हंबीरराव येतात)

**हंबीरराव:** अरे चंद्रभाना कुठीसा होता गा? थ्या तिडके सावकाराचं बलावनं होतं तुले. तू न्हाई म्हून म्याच जाऊन आलो. वखत भेटला, का भेटजो त्यायले बर. लई घुश्शात होता थो.

**चंद्रभान:** जाईन...जाईन... उद्याच जाईन भेटाले. काई बोलला का थो?

**हंबीरराव:** लय टोमने मारत होता बाप्पा. म्हने कसा, हंबीरराव, फुरसत नाई का बा. चंद्रभान शेटजीले गावगाड्यातून. मायी इनंती कळवजा त्याले. सावकाऱ्याच्या दाङ्याले पाय लावा म्हून. बाप्पा, बाप्पा. साकरेचे कितले गोड गोड टोले हानले त्यानं.

**चंद्रभान:** बा, सावकाराची रित असते तसी. मनानं दिलानं चांगला हाये सावकार. मले तं आपला लहान भाऊच समजते थो. येळच भेटला नाई इतल्यात, म्हूनशानं गुस्सा आला असन त्यायले. कायजी नोका करू. उद्या पायटीच जाईन भेटीले.

**हंबीरराव:** बरं, बाप्पा. अन् चंद्रभाना, डेब्याले, तुवा काई समजावलं नाई वाटते? आता म्हार मांगाईले घिऊन भंडारा करनार हाय म्हने. गांव झाडनार हाय म्हने थो. भटजीबी त् लयच चिडला हाये त्याच्यावर.....

**सखुबाई:** (गुळपाणी आणून देते.)

**चंद्रभान:** (कौतिकाकडे बघत) बा, इसरलो नाई मी काईच. आजच त्याचा बंदोबस्त लावतो. येऊ तं द्या त्याले. (सखुबाईकडे बघत स्मित करीत हलकेच) बाई, तू मनावर नोको घेऊ. यायची जराशीक मजाक करूनं रायलो म्या.

**हंबीरराव:** कायची मजाक होयरें बाप्पा? मजाक तं डेब्या आमच्याशी करून रायला

हाये. समाजवाले शेन घालतीन न् आमच्या तोंडात?

**कौतिका:** नाई त् काय? पुरनपोयी घालतीन काय तोंडात?

**चंद्रभान:** आता लय झालं, बास्स! त्याच्या नाका-तोंडात, काय जिनगानीवरच एसन घालाची एवस्था केली हाय म्या?

**हंबीरराव:** फकस्त, बोलतच रायतं बाबू, मांगच्या येळले कसा वाघासारखा गुर्रावत होता. थो आला समोर का मेंढरा सारखा वागला, अरे मामा होय तू त्याचा, का गुलाम?

**कौतिका:** आबूजी खरं बोलतत. त्याच्या मांग नुसता आगीवानी थैयथैय करता अन् त्याच्या मोहरं निरा मुसक्या बांधता.

**चंद्रभान:** कवतिके, हे घे एसन त्याची (तिला पानाचा विडा देतो)

**कौतिका:** पानाचा इडा?

**चंद्रभान:** अन बा, ह्या रेशमाचा शेला.

**हंबीरराव:** शेला?

**चंद्रभान:** अन् बाई हा घे लाडू. लय गोड हाये.

**सखुबाई:** लाडू? कायचा होय रे बाप्पा?

**चंद्रभान:** आवं डेब्याचा बंदोबस्त होये हा. म्हनजी त्याची एसन होय.

**हंबीरराव:** काय बाप्पा, कोड्यात बोलतं.

**कौतिका:** अजी, हर वखताले अशी मजाक बरी नाई.

**सखुबाई:** काय झालं रे भाऊ? खरं खरं सांगनं.

**चंद्रभान:** मजाक नाई करून रायलो बाप्पा. डेब्याचं लगीन पक्क करून आलो म्या.

**सखुबाई:** भाऊ !

**कौतिका:** अवं माय!

**हंबीरराव:** अरे बाबू, कितला भेलो होतो मी, म्हतलं भासा त हायेच पागल, मामालेय लावलं का बा येड? पर चंद्रभाना लय बेस केलं तुवा.

**कौतिका:** अजी पर खर्च पान्याचं काय? का काढानं अखिन रिन गिन. बळीसाठी ठेवजा काईतरी. नाई तं ठिवान घरावर तुयशी पत्तर.

**सखुबाई:** भाऊ, कोनं देल्ली रे बाप्पा पोरगी माया डेब्याले? आमच्यापासी ना घर, ना दार, ना जीमीन ना जुमला. पदराले दोन पैके नाई. बेआसरा गरीब



हावोत आमी...(रडते.)

**चंद्रभान:** बाई, मामा हावो मी त्याच्या, सग्गा. सावतर नाई. कोन लमचीचे तुले अन् डेब्याले बेआसरा म्हनतत, त्यायची नावं सांगच मले. माया मोठा लेक हाये थो. मले जसा बळी तसा डेबू.

**हंबीरराव:** सखू, चंद्रभानचं खरं हाये. आमी कधी अंतर देल्लं काय तुमाले? माया नातू हाय डेब्या. मायं खून हाये थो.

**कौतिका:** म्या काई म्हतलं का जी कधी? अंतर देल्लं काय तुमाले? माया भासा हाय डेब्या.

**हंबीरराव:** अशीच बोलत जा ना माय माजे. कितलं अमरीत सांडून रायलं बा. (सर्व हसतात.) चंद्रभाना आर... पर मोहरं काई सांगसीन का? कोनाची सोयरीक हाये तं?

**चंद्रभान:** बा, कमालपूरच्या धनाजी खल्लारकराची पोरगी हाये कुंता. अन् हौव, त्यायलेई पसंद हाये आपला डेब्या जावाई म्हून.

**कौतिका:** पर का जी, आपल्या ढोरक्याले,(सावरते) न्हाई म्हनजी डेब्याले पोरगी द्याले ते कसे तयार झाले? (स्वत:शीच) आपल्या पोट्टीची जिनगानी त्यायले प्यारी नाई वाटते.

**चंद्रभान:** कवतिके, ढोरक्या असला ना डेबू, तरी मर्द गडी हाये थो. बिरादरीचं काम करते, देवा-धरमाचं काम करते. अडल्या-नडल्याले मदत करते. तमाशाले जाऊन नाई बसत, का दारू पिऊनशान गटारामंधी नाई लोयत.

**कौतिका:** तसं नाईजी. ढोरक्याले पोरी द्याले कचरते माय बाप. म्हून म्हनलं होतं.

**चंद्रभान:** डेब्या, आता ढोरक्या नाई रायला, अज पासून केला म्या त्याले धुरकरी. उद्याच पायटीच पाठोवतो त्याले औत धराले.

**हंबीरराव:** हे गड्या लय बेस केलं. माया तोंडचा सबुद हिसकला तुवा. गडी हाय मोठा कामाचा आपला डेब्या. कस्टाले त् हात नाई धरत त्याचा कोनी गावात. हौव, गरम डोक्शाचा हाय तसा तो, पर दिलानं लई लोन्यावानी हाये. लगन झाल्यावर डोकसई थंड हुईन त्याचं? नाई का सखु?

**सखुबाई:** बा, भाऊ, लय उपकार झाले तुमचे. आमाले आसरा देल्ला, भाकर देल्ली. आंगावर धडुते देल्ले. आमी इसरनार नाई कधी.

**कौतिका:** करा बाप्पा करा, तुमाले जे बेस वाटन ते करा. मी कोन हावो टवळी

सव्वासीन. फकस्त डोक्शावर नोको बसू मना बाप्पा. अन् सखूबाई डेब्याले सांगजा. त्याले फकस्त धुरकरी केलं, मालक नाई? नाई त बसन आयत्या बियावर. (तरातरा आत जाते.)

**चंद्रभान:** पायलं बा, ह्या कौतिकीले त हारलो बा आपन. सुधं बोलताच येत नाई तिले कंधी. जवा -तवा हे असंच बोलते. येळ नाई का काळ नाई.

**हंबीरराव:** बाबू, पयलेपासून आगुठून ठिवाची होती ना! आता काई उपेग हाये का? डेब्यावरय पडली हाये तिची सावली. जसी मामी तसा भासा.

**सखुबाई:** बा, थो बोलते खरा, पन दिलाचा साफ हाये. त्याले अन्याव नाई सहीन होत. कोनं गलती केली का मंग भडीकते थ्यो.

**चंद्रभान:** बा, म्हूनच नाव कमावल ना त्यानं गावात, अन पंचकोरशीतही. अथिसा आल्या पासून एकाय कामाले त्यानं हात नाई लावू देल्ला मले. रात-दिन खपत रायते. दोन ढोरायचे खंडीभर ढोरं केले. घराच्या पडक्या भीती उभ्या केल्या. मले अभिमान हाये डेब्याचा.

**सखुबाई:** बा, तुमी त्याचं बोलनं मनावर नोका घेत जाऊ. लय जीव हाये तुमच्यावर त्याचा. लहान लेकरू म्हून माफ करत जा त्याले.

**हंबीरराव:** राहू देनं व मायमाजे, लहान लहान म्हूनशान का काखेत घिऊन फिराचं त्याले? आता त्याचं लगीन हुयीन, पोरं-बाय हुईन, तरी त्याले लहानच म्हनशीन काय?

**चंद्रभान:** बा, लेकरू कितीई मोठं झालं ना तरीई मायले लहानच असते थे, नाई कावं बाई? बरं जाऊ दे ते. चाला आता कामाले लागा. डेब्याच्या लगनाची तयारी कराची हाये. सासू होनार हाये तू आता. कवतिके ओ कवतिके बाहीर ये जरासिक (कौतिका बाहेर येते. पुन्हा डोक्याला फडकं बांधलं आहे.)

**कौतिका:** काय होय जी? कायले वरडून रायले? बयरी हाये काय मी? का कान फुटले हायेत माये.

**चंद्रभान:** अवं माय माजे, बाई आता सासू होनार हाय म्हने.

**हंबीरराव:** हौव, अन् कवतिके तू होसीन मामेसासू, कितला थाट असीन बा तुया नाई? (कौतिका लाजते. सर्वजण हसतात. वाजंत्रीचा आवाज, मंगलाष्टकांचे आवाज ऐकू येतो. शॅडोमध्ये डेबू- कुतांच्या गळ्यात, कुंता डेबूच्या गळ्यात माळ टाकते. वाजंत्री वाजते.)



उदे ऽ ऽ ऽ आई भवानीचा उदे ऽ ऽ ऽ
उदे गं.... अंबा देवी हाकेला माझ्या धाव.
गोंधळ मांडला अंबे गोंधळाला यावे
तूच भवानी. तूच शिवानी, तुच महिषासूर मर्दिनी
उदो ऽ ऽ उदो ऽ ऽ ऽ
गोंधळ मांडिला. गोंधळ मांडिला......
(गोंधळ सादर केला जातो. गोंधळ संपतो.)

**अंधार....**

# अंक पहिला: प्रवेश चौथा

(लग्न झाल्यावर तीन-चार वर्षांचा काळ उलटला आहे. सकाळची वेळ आहे. डेबू नारळाच्या दोरींचा दोर करतो आहे. सखुबाई कापसाच्या वाती वळते आहे. कौतिका पानाचा डबा घेऊन वीडा बनवते आहे. चंद्रभान घरात झोपला आहे. मागील रस्त्यावरून मातामायचा नवस बोलणाऱ्या स्त्रिया गाणी गात जातात.)

मायचा नवस बोलतो व बाई, मायची पुंजा करतो व बाई
बोकडं वाहीन, कोंबडं कापीन, आंगात आनीन जोखाई व बाई ।।
उपास-तापास करीन व बाई, निवद कंदुरीचा घालीन व बाई
माताले नेतो हेलं. हेलाई मधी फुलं, माता सभायं आपलं मुलं व माय...
हो माय माता मायऽऽऽ.
मायले नवस कोंबड्या-बकऱ्याचा, सुखी ठेवजो आवं लेकरीचा
ओ मायी माता माय, (वाजंत्री, बोकडाचा जीवघेणा बॅऽ ऽ ऽ बॅ ऽ ऽ ऽअसा आवाज. कुंता लगबगीनं पदर सावरत घरातून बाहेर येते. त्या स्त्रियांना बघण्यासाठी लगबगीने कुंपणाजवळ जाते. तिला आनंद होतो. ती सखूबाई कडे बघते. डेबू प्रथम त्या स्त्रियांकडे मंग कुंताकडे रागाने बघतो. सखुबाई खाली मान घालते. तर कुंता संकोचते. कौतिकाबाई हे सारं न्याहाळते आणि उपरोधिक स्वरात....)

**कौतिका:** मरिमाय, सुखाचं ठेव बाप्पा आमाले. अन माया बळीलेई. यायची तब्येत बरी नाई रायत. त्यायले बरं करजो माय, मंग नवस करीन तुले चांगला, अन् कंदुरीई करीन बाप्पा. (डेबू मामीकडे रागाने बघतो. कुंता सखुजवळ येऊन बसते, कानात काही तरी कुजबूजते.)

**कुंता:** मामीजी सांगा ना जी यायले. मरिमायचा कोप झाला हाये आमच्यावर. पयल्या दोनी पोरी मेल्या माया. बोनं द्या लागन, नवस करा लागन, अन कंदुरीई.... माया आलोकीचा जीव टांगनीवर लागला ना जी !

**सखुबाई:** कुंते, मायात हिंमत नाई बाप्पा. अन् त्याले पटत नाई ना हे नवस-गिवस आन कंदुरी न फंदुरी.

**कुंता:** पन तुमाले त् पटते नाजी, लहान मामीजीले पटते, मलेई पटते, मंग काऊन नाई कराची? रितभात हायेना आपली. देवा- धरमाचच त् कराचं लागते. लहान मामीजीई मामाजीच्या नावानं करीन म्हनतेना कंदुरी, आताचं तं बोलून राहयल्या होत्या थ्या. आपनई करू आलोकी साठी अन् गोईंदा साठी.



**सखुबाई:** मंग तूच बोलनं माय. मले कायले फुफाट्यात पाडतं.

**कुंता:** बेस हाय मंग, मी सांगतो त्यायले. मले काई डर नाई कोनाचा. माया आलोकी अन् गोईंदाच्या जिनगानी साठी बोलने खा लागन त्यायचे त् खाईन मुकाट्यानं. पर देवाधरमाले त् जागाच लागन ना? अजी आईकता का जरासक.....

**डेबू:** बोल नं, काय म्हनतं?

**कुंता:** आपल्या दोनी पोरी देवाले प्याऱ्या, झाल्या आलोकीची तब्येत अशी. गोईंदाई वायत चालला, मले लय फिकर वाटते जी त्यायची.

**डेबू:** बरं, मंग? वैदापाशी घिऊन जाऊ. तुले वाटतं अशीन तं गोऱ्या डागदराकडं जाऊ.

**कुंता:** तसं नाई म्हनत जी मी....

**डेबू:** मंग कसं म्हनतं ते सांग....

**कुंता:** मले का नाई... म्हनजी... मामीजी म्हनत होत्या.

**डेबू:** अवं बोलनं सरकी. यायचं त्यायचं नाव कायले घेतं?

**कुंता:** मरिमायचा कोप झाला हाये आपल्यावर, ते निस्तरासाठी....

**डेबू:** ते निस्तरासाठी? काय? (शांतता) आवं दातखई बसली का तुई? बोल ना?

**कुंता:** मरिमायची कंदुरी कराची हाय मले. मामीजी अन् लहान मामीलेई कराची हाये.

**डेबू:** अस्सं....बरं... त्यायचं सोड. तू तूयं सांग पह्यले.

**सखुबाई:** म्या काई नाई म्हनलं रे बाबू, तुया बायकोलेच इचार....

**कौतिका:** करीन म्हतलं म्हनजे, आताच कराची हाये असं नाई म्हनलं म्या. कुंताचाच ईचार हाये म्हनून म्हनत होती.

**डेबू:** आयकलं ना. हॅं! बोल आता काय म्हनंत?

**कुंता:** माया पोरायसाठी त् मले नवसय बोलाचा हाये अन् कंदुरीई कराची हाये.

**डेबू:** अरे व्वा. तुई जीभ लय चटावली का वं? गरीब, मुकं कोंबडं-बकरं मसाल्यात सिजवून खाचं हाय वाटते तुले? नाई? आन मंग दारूचं काय करसीन?

**कुंता:** कसं वंगाय बोलता जी! आमी नसतो खात मटन-गिटन. अन बाया

काय दारू पेतत?

**डेबू:** मंग कोनाले खाऊ घालाचं हाये तुले? आन कोनाले दारू पाजाची हाये?

**कुंता:** बाप्पा, रिस्तेदार नाई का गनगोत नाई? गाववाले, अडोशी-पडोशी.

**डेबू:** बाप्पा.... बाप्पा.... मंग तू लय कोंबडे- बकरे कापा लागन बा. अन लय ऽऽ दारू गाया लागन....

**कुंता:** रितभात हाये, करातं लागन ना !

**डेबू:** कुंते, कायले एवढ्या कोंबड्या-बकऱ्याचा जीव घ्याचा. असं कर त्या परिस मलेच कापनं माय, मी एकला मरन पर किती कोंबड्या-बकऱ्यायचा जीव वाचन. तेई पुन्न पडन ना तुयाच पदरात.

**कुंता:** आव ऽ ऽ ऽ माय! काई बोलता का जी? माया कुकाचे धनी हाय तुमी. माया आलोकी- गोईंदाचे बा....

**सखुबाई:** अरे, बाबू आसं बोलू नाई बाप्पा.

**कौतिका:** मोठा आलागा शायना. अरे कंदुरी साठी कोंबडे-बकरे कापतत, मानसं नाई.

**डेबू:** काऊन बा? त्यायच्या जीव नाई का ? मुके हाये ना? बिचारे. कापा... मसाले वाटा, शिजवा.... अन् खा. पोट फुटेस्तोवर. ओरपा रस्सा..... फुरके मारत. पर मामीजी कोंबड्या -बकऱ्या परिस मानसाचं मटन लय चांगलं असतं म्हने.

**कौतिका:** तोंड फुट्या वानाचा. तुया तोंडाले कोन लागन बाप्पा, जाय.

**कुंता:** अजी कंदुरी कराचा देव धरम हाये. रीतभात हाये ते.

**डेबू:** कोनत्या धरमात हाय बाप्पा लिवलं. अन् कोनत्या देवानं सांगतलं व तुले? अन माय रीतभात कोन पाडली? मानसानच ना? पंडे, पुजारी, भगत याईनच ना? तेच तं तोडाची हाये मले, देवाच्या नावानं कोंबडे बकरे कापाचे, दारू प्याची मंग नंगा नाच कराचा. अवं हा धरम नाई, पाप हाये हे पाप. अंधार होये बाप्पा हा, अंधार होये.

**सखुबाई:** बाबू, तुयं सारं खरं हाये...पर...

**डेबू:** माय, इसरली कावं तू? माया बा चं मरन. टाचा घासून घासून मेला. माया बा. आपल्या जिनगानीची दयना केली. माय, मले अजुनई आठोते ते दिसं. सावकाराचं सैतानी थोबाड, बाजीवरचा खंगून खंगून खोका



झालेला बा.... दारूसाठी लाचारी.... सावकारानं वावर हिसकलं, आपल्याले घरातून बाहीर काढून फेकलं माय. काऊन माय, काऊन झालं असं, सांगनं मले?

**कुंता:** मले पोरायची फिकर वाटते. जीव तुटत रायते माया. भाकर जात नाई नलड्यात. जीवाले घोर लागून रायला हाये. लय भेव वाटते मले. बस एक डावच करू द्या न जी, मंग नाई म्हननार कधीई. तुमची आन हाये मले.

**कौतिका:** बाबु रे, एक डाव केलं तं काई नाई होत. तिले वाटते तं करू दे नं एक डाव कंदुरी. आमी दोघीई मियून आखरची कंदुरी एक डाव करून टाकू. तुया मामाजीची तब्येत बरी नाई रे बाबू. तुले नाई वाटत काय ते लवकर सुदे झाले पायजे म्हून.

**डेबू:** 'गध्या पुढं वाचली गीता' हे वचन लय पटते मले. जीव तोडून सांगतलं, तरी पटलं नाई तुमाले. आता काय जीव दिऊन सांगू बाप्पा. तुमी का नवस केला, कंदुरी केली का, मी मेलोच म्हून समजा तुमच्यासाठी. मी मेल्यावर, माया मुडद्याची करजा कंदुरी. आरं व्वा, काय बाया व्हा, का राक्ससीनी व्हा? चालल्या मोठ्या कंदुरी कराले. करून पहा तुमी कंदुरी अन् फंदुरी. (शांतता. बजरंग्याच्या हाका ऐकू येतात.कुंता, कौतिकी आत जातात.)

**बजरंगा:** आरं चंद्रभान, हाय का गा घरी? ओ चंद्रभान पाटील.

**डेबू:** काय होय बे बजरंग्या? काऊन बोंबलत? ये...ये... आत मधी ये ना !

**बजरंगा:** रामराम काकी, आरं काय म्हनता डेबूजी महाराज ? काय म्हंते तुया भंडारा, तुयं भजनी मंडय? कंधी-मंधी आमालेई आवतन देत जाना !

**डेबू:** बजरंग्या, तुले नाई कोनं म्हतलं रे बा? पर तुले सावकाराच्या चाकरीतून फूरसत भेटत नाई त्याले मी काय करू?

**बजरंगा:** बरं जाऊ दे थे. तुये मामाजी नाई का घरी? बनाजी तिडके सावकाराचा निरूप हाये.

**डेबू:** झोपून हाईत थे. एक हप्ता झाला तब्येत नाई बरी त्यायची.

**बजरंगा:** बाप्पा. बेजाचं हाये, रिन काढाचं रायते तवा बरी रायते तब्येत त्यायची. अन फेडाचं रायलं का तब्येत बिघडते त्यायची. चंद्रभानाची नियत काई खरी दिसत नाई. सावकाराचा दट्ट्या पडला म्हनजी...

**डेबू:** बजरंग्या, तोंड संभायून बोल. माया मामा चोर हाये काय?

**बजरंगा:** चोर नाई तं् का साव हाये? सावकारानं कितींदा बलावलं. पर येत नाई वाड्यावर हंबीर बुढ्यायलेई निरूप देल्ते. पर चंद्रभान आपलं तोंडई दाखोत नाई, मग आमी काय समजावं बा? सावकार दयावान हाये, लागन तसं रिन देल्लं चंद्रभानाले. पर त्यायले काई कदरच नाई सावकाराची. रिन फेडायची नियत नसनारे चोर नाई तं का साव असतत, सांग बरं मले?

**डेबू:** बजरंग्या, लय बोलला. चालता हो अथून. मी येतो सावकारापाशी,चाल निंघ अथिसा. भन भन करून मायं डोक्स तापवू नोको.

**बजरंगा:** आरं व्वा रं वा. मामात् मामा, भासाही डफरतं. सावकाराचं डोस्क तापलं म्हनजी मंग काय करसान?

**डेबू:** आता निंघत का?

(चंद्रभान आतून येतो. डोक्याला दुपट्टा बांधला आहे. आजारी आहे.)

**चंद्रभान:** डेब्या, अरे त्याच्यावर कायले डाफरत? सावकाराचा गुलाम हाये तो. बोल, काय म्हन रे बजरंग्या?

**बजरंगा:** चंद्रभान समजौ तुया डेब्याले... माया अंगावर हात उचलते थो.... म्या काई बांगड्या नाई भरल्या हातात.

**चंद्रभान:** कायले बोंबलतं एवढ्या जोरानं? आग लागली हाये अथिसा, का मुडदा पडला हाये माया. अन् माया डेब्या कोनाच्याच आंगावर हात नाई उचलत. तूच बोल्ला अस्सीन काई अव्वाच्या सव्वा. बोंबलू नको आता अथिसा.

**बजरंगा:** बाप्पा, बोंबलू नाई तं काय करू? तुमी जात नाई सावकाराकडं तं् थे माया नावानं बोंबा मारते ना. चंद्रभानाले बलाऊन आन, चंद्रभानाले बलाऊन आन. अन् तू अतिथा बाच्छा सारखा घरात झोपून रायतं ढाराडूर. अन् वरून खोटई बोलता. अरे... मी हुकुमाचा गुलाम हावो राजेहो.

**चंद्रभान:** आरे बेमार हावो मी राजा. कायले खोटा बोलू. रिनच घेतलं हायेना, का दरोडा टाकला म्या? बरं जाय तू येतो मी.

**बजरंगा:** सावकाराचा हुकूम आहे. जसा अस्सन तसा धरून आना म्हून. माया संग चला लागन तुले.



**कौतिका:** अरे भौ, आंगात सन्न ताप भरला हाये त्यांच्या. अन् भाऊ मानतं ना तू त्यायले इतला इस्वास नाई का त्यायचेवर?

**चंद्रभान:** बरं चाल. जसी तुई अन् त्यायची मर्जी, मेलो नाई मी अजुन.

**सखुबाई:** बजरंग्या, काकी म्हनतं ना मले, मंग आईक जरासा. कवतिका बरूबर बोलून रायली. पायबरं कितला कितला फनफन ताप हाये चंद्रभान भाऊच्या आंगात.

**डेबू:** मामाजी तुमी आराम करा. मी जातो तिडके सावकाराकडं.

**चंद्रभान:** नाई रे डेब्या. मलेच जा लागन. माया बिगर गमनार नाई त्याले.

(खोकला येतो. ढास लागते. सगळे सांभाळतात.)

**डेबू:** मामाजी, आयका मायं. आता नाई गेले तुमी तं् सावकार मरन का तुमची वाट पाहून?

**चंद्रभान:** आरं डेब्या, काई जीव जात नाई त्या डुकऱ्याचा. पर माया जीव जरूर घेईन थो. तोंड दाखवून येतो ना त्यायले. जीत्ता हाओ म्हून म्या. 'जैसी करनी वैसी भरनी', जातो म्या.

**बजरंगा:** चंद्रभाना चाल लवकर. लय कामं पडले हायत माये, का बसू इथं ठान मांडून. चाल लवकर. निंघतो म्या पुढं. खबर देतो सावकाराले. चाल निंघ लवकर. (बजरंगा जातो.)

**डेबू:** मामाजी आभाय कोसयलं, का धरनीकंप झाला? अन् काजी तुमी कायले कोड्यात बोलून रायले? इतला बोलून गेला बजरंग्या. पर तुमी रायले गुमसूम. चुपचाप आईकलं सारं. काऊन जी?

**चंद्रभान:** डेब्या, काई नाई रे ! त्याची आदतच हाये तसी. पहिलवान मानूस. हुकमाचा ताबेदार हाय थो. तुमी कायले बाप्पा सारेई जन इस्त्या सारखे गरम होता?

**कौतिका:** मंग थो कुत्र्यावानी कायले भुकत होता तं ?

**डेबू:** मामाजी, आन हाये मायी. तुमी काई लपवून तं् नाई रायले ना? तुमचं तोंड काऊन खाडकन उतरल जी बजरंग्याले पाहून?

**सखुबाई:** भाऊ, सावकार चांगला मानूस नाई, त्याले मानसाची बेमारीई नाई का समजत?

**कौतिका:** नाई त काय बाप्पा?

**चंद्रभान:** अरे, बस कराना राजेहो.... झालं असीन ना तुमचं? जगू द्यान का सुखानं मले? नाई तं मरू तरी द्या. काऊन डोक्स खाता मायं. गेलो सावकाराकडं तं मरनार हावो का मी? आताच मेल्यावानी बोलून रायले.

(ताडताड निघून जातो. वातावरण सुन्न, शांतता, बळीचा प्रवेश.)

**बळी:** डेबूदादा, औ डेबू दादा. आपलं लय काम फत्ते झालं. गड जितला आपुन. (शांतता) बाप्पा, सारे काऊन गुमसूम बा? माय, औ माय ऽ ऽ ऽ

**कौतिका:** काय होय रे बाबू? काय झालं?

**बळी:** पानी पाज पयले मले. पायी फिरू फिरू तंगड्या तुटल्या माया. वयनी जेवाले हाय का काई? (कौतिका पानी देते)

**कुंता:** चाला. हात पाय धुवा. वाढते तुमाले.

**कौतिका:** कुठीसा गेल्ता होता बाप्पा. पाहयटी पासून, ढोरायच्या मांग गेल्ता होता का? का वावरात गड्डे खनाले गेला होता?

**बळी:** हौव, ढोरायच्याच मांग गेलो होतो, त्यायचा जीव वाचवाले अन् राक्ससाईनं पाडले रक्ताचे गड्डे बुजवायले.

**सखुबाई:** आवं, कुंते देवं माय त्याले पह्यले खाले. कितला थकला हाय माया बाबू.

**कौतिका:** बाप्पा! तुमच्या अन् डेब्याच्याच लाडानं बिघडून रायलं मायं पोरगं.

**बळी:** बिघडलो नाई माय, सुधरलो म्हन. डेबूदादाच्याच कामानं गेलो होतो. दादा, ओ ऽ ऽ दादा.... उमरीच्या शार्दुल बाबाच्या जत्रीत जाऊन आलो. मस्त दवंडी पिटून आलो.

**कौतिका:** आता तुवा काय दवंडी पिटाचं काम घेतलं म्हार मांगावानी. आरं खालताट्या, वट्टी होय ना तू खानदानी.

**बळी:** तुले खालताट्या-वरताट्या परीस दुसरं काई सुचत नाई कावं? जत्रीत कोंबडे-बकरे कापाचे नाई अशी दवंडी पिटोली म्या. आमच्या भजनी मंड्याकडून. पहले तं लोकायनं लई विरोध केला. मग म्या त्यायले म्हतलं, 'डेबूदास वठ्ठ्याचा सांगावा हाये तवा आयकावं लागन.' दादा तुय नाव सांगल्यावर मातर मानले लेकाचे, दादा कितला मान हायगा तुवा.

**कौतिका:** व्वा. मोठा झेंडाच लावून आला गा तू. फुशारक्या मारून रायला तं !



**सखुबाई:** कवतिके पाह्यनं, कसा शायना झाला पोरगा. अन माय तु त्यालेच टोमने मारतं. त्याचीच वरात काढतं?

**कौतिका:** फुक्कटच काम कराले सांगा ना त्याले.

**बळी:** डेबू दादा, पाह्यरे माय काय म्हनते तं.

**डेबू:** बळीराजा, कबीरजीचं वचन हाये.....
'निंदक नियरे राखिए, आंगन कुटी छवाय
बिन पानी साबूनबिना, निर्मल करे सोभाय.'

**कौतिका:** काय म्हनते रे डेब्या? बळी काय म्हनते रे हा?

**बळी:** अव माय, कबीरजीची वानी हाये, तुले नाई समजनार. जाय न तू. नाई त मी जातो भाईर.

**कुंता:** बळी भौ, आंधी भाकर खाऊन घ्या. (कौतिकाबाईकडे बघत) कटुल्या वाग्यांचं भरीत केलं हाये तुमच्यासाठी.

**कौतिकी:** चांगला कोंबू कोंबू घाल त्याच्या नलड्यात, आन तुय रिचव रे चांगला फुक्कट खाया. फुक्कटचं खाय त्याले सस्त महाग काय?

**बळी:** बोलून घे माय बोलून घे. पर आज मी लय खुशीत हाये. डेबूदादाच्या नावानं मले लई मानमरातब भेटला. आता तुये टोमने नाई लागत माया आंगाले, समजली काय?

**डेबू:** बळी, शार्दुलबाबाच्या जत्री मांग आपल्याले रिनमोचनच्या जत्रीतही गेलं पाह्यजे. लय मोठी जत्रा हाये ना. येळ कमी हाय आपल्याजवय.

**कुंता:** रिनमोचन आमालेई न्यानं जी, रिनमोचनच्या जत्रीले. माया नवस फेडीन मी तथीसा.(जीभ चाचते.)

**सखुबाई:** आवं माय निघन ना तुईच जत्रा. तुया जिभेले काई हाड? कशी व माय कुंते? काऊन चिडोतं डेब्याले.

**बळी:** आवं वयनी, जत्रात लागू दे. मंग जाऊ आपन सारे. आबुजी बा, आतीबाई, गोईंदा आलोकी, बबन्या, सोनाजी अन् का वं माय, तू येसीन का? नाई तुया पायात गोये जमून राह्यते. नाई तं तुयं डोस्क दुखत राह्यते ना, म्हून पुसतो तुले.

**कौतिका:** आता मायले टोमने मारून राह्यला का रे तू? पाह्यना, कसा खिजोते मले. ह्या डेब्याचं शिकोवनं असन त्याले, असं बोलाले, नाई?

**बळी:** आवं, तुया पोटात राहून शिकलो म्या. डेबू दादा तू मले भजन शिकोते... चांगल्या गोटी शिकोते.

**सखुबाई:** काहून मायशी मुजोरी करत रे बाबू. माय होये ना तुई?

**बळी:** काई नाई वं. मायची मजाक करून राह्यलो. आतीबाई, माया मायले लय चांगला वयखतो म्या. नाई का वं माय? (रागात ती आत जाते. चंद्रभानचा सुन्न अवस्थेत प्रवेश. खोकल्याची उबळ येते. धाप लागते. बळी, डेबू सांभाळतात.)

**डेबू:** मामाजी. मामाजी !

**बळी:** बा !

**सखुबाई:** काय झालं रे भाऊ?

**कुंताबाई:** आतीबाई काय झालं जी मामाजीले?

**डेबू:** मामाजी.... मामाजी..... मामाजी... बोलानं काई तरी.

**चंद्रभान:** आर डेब्या, सावकारानं लुटलं रे बाप्पा... आपल्याले. माया अंगुठा घेतला कागुदावर. आपलं वावर करून घेतलं त्यानं त्याच्या नावावर.

**डेबू:** काय?

**बळी:** बा, पन काऊन, असं केलं सावकारानं?

**डेबू:** मोगलाई हाये काय? पर तुमी अंगुठा देल्लाच कसा मामाजी?

**चंद्रभान:** रिन घेतलं होतं म्या सावकाराकडून.

**डेबू:** तुमी रिन काढलं होतं? पर तुमी तू कवाच सांगतलं नाई आमाले. पर मी म्हणतो रिन घ्याची गरजच का होती मामाजी?

**चंद्रभान:** आरे डोक्सं फिरलं होतं माय. पाटील, देसमुकीचा लय माज चढला होता मले वछी असुनई.

**डेबू:** मंग.... मले काऊन नाही सांगतलं कंधी? म्या परका होतो काय? म्यां फिटोलं आसतं त्याईचं रिन.

**चंद्रभान:** अरे घेतलं म्या रिन. सारेच घेतत. पर फिटोले होते त्याचे सारे पयसे.

**डेबू:** मंग, तरी अंगुठा कसा का घेतला बा? बरं पावती तू घेतली असीन ना?(हंबीरराव येतात.)

**हंबीरराव:** काय झाले रे बाप्पा. चंद्रभाना.... लोक सांगत होते तुयी तब्येत बिघडली म्हून. रस्त्यांतच चक्कर येऊन पडला म्हने तू. काय झालं रे पोरा तुले.



काय झालं?

**बळी:** आबुजी, सावकारानं फसोल बाले. अंगुठा घेतला कागुदावर वावरई घेतलं आपलं.

**हंबीरराव:** ईठ्ठला, पांडुरंगा... कसी करनी केली बाप्पा सावकारानं?

**डेबू:** हाव, करनीच केली मामाजीवर, म्हून त्यायनं पावत्या नाई घेतल्या. नाई? हा इस्वासघात हाये इस्वास घात.

**चंद्रभान:** हो रे बाप्पा, लय इस्वास होता त्याच्यावर म्हून पावत्या नाई घेतल्या म्या. मले आपला लहान भाऊच माने. म्हने चंद्रभाना तुया या भावावर इस्वास नाई का तुले ? घेऊन जाजो कवाय तुले वाटन तवा. पर देल्ल्या नाई कधी, आता म्हने चंद्रभान तुवा फेडलं रिन पर ते व्याज हाये. मुद्दल कवा देसीन? रिन फेडल्यावरई त्या राक्ससानं अंगुठा घेतला माया.

**डेबू:** सावकाराचा फंदा अन् त्याची फितूरी लय जालीम असते मामाजी. माया बापयं याच फंद्यात लटकून मेला. म्हूनच मीच सांगतो साऱ्यायले. बाप्पा रिन काढू नोका. बरबादी होते.

**चंद्रभान:** आपूनही बरबाद झालो रे.... डेबू, आपूनई बरबाद झालो गा. आता मायं काई खरं नाई.आता जगत नाई रे म्या डेब्या. तुमाले साऱ्यायले बरबाद केलं म्या. आबुजी माफ करा मले. डेब्या....., माफ कर मले.

**बळी:** बा !

**कौतिका:** (आतून येत) बाप्पा, काय झालं तुमाले? डोये काऊन पांढरे करता जी?

**चंद्रभान:** कवतिके, सावकारानं दगा केला माय. दगा केला. आपल्याले फसोलं त्यानं माया अंगुठा घेतला. अन् वावरई घेतलं.

**कौतिका:** आत्ता व माय. काय केलंजी त्यानं?

**हंबीरराव:** चंद्रभाना..... अरे बाबू.

**चंद्रभान:** (डोळे पांढरे करतो, आचके देतो) डेब्या, सांभायजो रे बाबू सगयायले. माया बळीवर लक्ष ठिवजो.... आबूजी.... सखुबाई.... जातो म्या....

**सखुबाई:** भाऊ, असा काऊन बोलत गा? काई होनार नाई तुले.

**कौतिका:** कोप हाये, ह्या कोप हाये मरिमायचा. माय जाखाई, जोखाई, भैरोबा, मसोबा वाचवा. माया धन्याले वाचवा. घ्या भरा तुमचं पाप. देव नाई, देवस्की नाई. नवस नाई का कंदुरी नाई. आरं डेब्या तुया पाईच होऊन

राह्यलं हे बाप्पा. असं कसं झालं रं बाप्पा ऽ ऽ ऽ

**बळी:** आव माय, चुप राह्यनं, कायले बोंबा मारून राह्यली. बा ची तब्येत अजून बिघडवतं काय?

**हंबीरराव:** चंद्रभाना, काई कायजी करू नोको पोरा. तुया बाप जित्ता हाये अजून.

**डेबू:** मामाजी, आमी हावोत ना. काई फिकीर करू नोका. तुमी फकस्त तुमची तब्येत सांभाया. सावकाराले मी सांभायतो. पाह्यतोच त्याले, कस्या पावत्या देत नाई अन् कसा अंगुठे घेते थो. वावर काय? गजभर जमीन नाई जाऊ देत त्याच्या नलड्यात.

**बळी:** डेबूदादाच आयकाना बा. मीई नाई सोडन सावकाराले जित्ता, सांगून ठिवतो.

**चंद्रभान:** नाई रे बाबू, आता काई उपेग नाई त्याचा. म्या अंगुठा लाऊन आलो. कायदा कानुनई त्याच्याच बाजुनं हाये. बरबाद केलं. बाप्पा म्या बरबाद केलं तुमाले. डेब्या ऽ ऽ ऽ बळी ऽ ऽ इठ्ठला ऽ ऽ ऽ पांडुरंगा ऽ ऽ ऽ

(आचके देत गतप्राण होतो.)

**डेबू:** मामाजी ऽ ऽ ऽ !

**बळी:** बा ऽ ऽ !

**कौतिका:** मालक ऽ ऽ !

**सखुबाई:** भाऊ ऽ ऽ ऽ !

**हंबीरराव:** बाबू रे !

**कौतिका:** मले सोडून जाऊ नका न जी. मायं कुकू पूसू नोका ना जी, मले चाला घेऊन संगत. एकली राहून काय करू जी.

(जोराने रडते.सारेच शोकविव्हळ.तिला सांभाळतात. मागील भागी, कट लाईट मध्ये 'महादेवा जातो गा, माया शंकर राजा.' गाणी गात काही जण जातात.)

**अंधार**

**अंक पहिला: समाप्त**



# अंक दुसरा: प्रवेश पहिला

(पडदा वर जाण्यापूर्वी कवी पुंडलिकाच्या भजनाचे स्वर कानी पडतात. हळू हळू पडदा उघडतो.)

बाता बातातून पेरे अल्लादी साखर
खात्यापेत्या घरावर तो फिरवते नागर ।।
लाही लावते जिवाले, कसा गुतोते गोत्यात
किती आंगोठे कापले त्याच्या गहान खात्यात
कसा कसाबी सुरा, कसं कसाबी कसब..

(घरात सुतकी वातावरण, अंगणात दिवा लावला आहे. डेबू, बळी, हंबीर शोकाकुल अवस्थेत बसले आहेत. कौतिका विधवेच्या रूपात बसली आहे. सखुबाई, कुंता तिची सांत्वना करीत आहेत. डेबू हंबीररावांकडे जातो.)

**डेबू:** आबुजी, दुख आवरा आता. आमाले तुमची गरज हाये. तुमीच हिम्मत हारान तं आमचं कसं निभन?

**हंबीरराव:** डेब्या, माया चंद्रभान गेला रे बाबू गेला... चंद्रभान ऽ ऽ ऽ

**डेबू:** आबुजी, गेला मानूस वापस नाई येत. तुमी तरास करून घेऊ नोका. या घराचा मी संभाय करीन, सावकाराचं रिन फेडीन, हक्काचं वावर वापस घीन, तुमी कायजी करू नोका.

**बळी:** आबुजी, मीई हावो दादासंगत. मेहनत करू, कष्ट करू अन् रिनाचा पैका नं पैका घालू सावकाराच्या मढ्यावर.

**कौतिका:** आर थे करान तवा करान बाप्पा. पयले त्याईची तेरस करा साजरी. त्यायच्या आत्म्याले मोकयं करा आंधी. का नरकातच ठिवता त्यायले? नातलगाले बोलवा, गावगाड्याले बोलवा न बाप्पा....

**हंबीरराव:** ईठ्ठलाच्या मरजी पुढं कोनाचं काई चालतं नाई बाप्पा. आता चंद्रभानाची तेरस करा अन् मोकय करा त्याले.

**डेबू:** करू आबुजी करू, मामाजीची तेरसई करू ! पर कोंबडं-बकरं कापल्या बिगर,सावकाराचं रिन न काढता.अथिसा कंदुरी-फंदुरी काईई होनार नाई.

**कौतिका:** बाप्पा ! त्याच्या बिगर का तेरस होत असते?

**हंबीरराव:** डेब्या, जातभाई काय म्हनतीन? रिवाजाचं तं करा लागनं ना?

**डेबू:** मामाजीवर संकट आलं, तवा कोन आलं होतं बा? जातवाले काय मटनाची

हड्डी तोडाले, रस्सा वरपाले अन् दारू ढोसालेच असतत काय?

**बळी:** आबुजी, बा नं कितलं केलं जातभाईसाठी. जलमापासून मरना पावतर, लोकायसाठी सोता पासचा पैकाही खर्च कराले मांग-पुढं पाह्यल नाई. पर बाले मरन आलं, तवा कोनी इचारलं आपल्याले. डेबू दादाचं म्हननं खरं हाये.

**डेबू:** त्यापरीस लुल्या- लंगड्यायले, आंधया-पांगयायले, अनाथाले जेऊ घालू. भजनी मंडयीच भजन करू, मामाजीच्या नावानं भंडारा करू....

**बळी:** मंग काय तं? ज्यायले याचं असन ते येतीन. ज्यायले याच नसीन, त्यायले येऊ नोका म्हना. पर दादा म्हनते तसी कंदुरी-फंदुरी कराची नाई.

**कौतिका:** आर बाबू..... पाप लागनं ना ? जातभाई तोंडात शेन घालतीन, जातीभाईर करतीना !

**हंबीरराव:** पाह्य डेब्या, चंद्रभान त गेला बाप्पा, आपल्याले सोडून. मेल्यावर मानसाचे हाल काऊन कराचे बा? देव नाराज होईन ना.

**डेबू:** आबुजी- कबीरजी सांगून गेले-
''ना तो कौनो किरीया करम में नाई जोग बैराग में
खोजी होय तो तुरतै मिली है पल भर की तलास में ।।''
तेरस केल्यानं, कंदुरी केल्यानं पिंड देल्ल्यानं, देव खुस नाई होत. मानसानं आपल्या सारथासाठी रचली हे परथा. आबुजी, अज्ञान हाय हे मानसाचं अज्ञान. मेल्यावर काई होत नसते मानसाचं. मामाजीच्या नावानं जित्या कोंबड्या-बकऱ्यायले मी नाई कापू देनार. अन् कंदुरीची तेरसई करू नाई देनार. ह्या माया फैसला हाये.

**हंबीरराव:** आरे मी बाप हाये त्याचा. ह्या घराचा मालक. मंग फैसला करनारा तू कोन होय रे चोनक्या?

**कौतिका:** आरं तुई माय मरन ना, तवा नोको करू तेरस. नोको करू कंदुरी. आमी नाई टोकू तुले. पन माया मालकाची तेरस कराले नोको रोकु तू. पटत नशीन तं येजो नोको.

**बळी:** माय, तुया नवरा होता बा, अन् आबुजी तुमचं पोरंग होतं बा. मायं कोनीच नवते का ते? माया बा होता तो... मी ई पाह्यतो कशे कोंबडे -



बकरे कापता, दारू पाजता अन् कंदुरी करता ते.

**हंबीरराव:** लय तोंड फुटलं रे तुले पोट्ट्या? धमकी देतं आमाले? अन् डेब्या हे शिकोतं तू पोराले. माया खानदानीले बट्टा लावतं. पटत नसन आमचं त् निंघ माया घरातून पाहून घेऊ आमचं आमी.

**सखुबाई:** बा... असं काऊन बोलता जी बाप्पा. साधुबोवा हाय माया पोरगा. देवा- संताचा रस्ता दाखवते थो. ह्या घरासाठी रक्ताचं पानी केलं त्यानं...आन तुमी त्याले घराबाईर काढता.... मंग मीई अथिसा राहून का करू? आमी दोघई निंघतो ना....

**कौतिका:** मग ह्या तेरस अन् तेरसाची कंदुरी काहून नाई करू देत? अथिसा फुकटाचं खाऊन आमालेच गुरुग्यान देते.

**सखुबाई:** फुकटाचं नाई खात माया डेब्या, मी अन माई कुंता, राब राब राबतो आमी. डेब्यानं मेहनतीनं उभा केला हाय हा डोलारा....

**हंबीरराव:** मेहनत करते, खरं हाय ना माय, मंग का उभ्यानं मुतन आमच्या डोक्शावर. बेसहारा म्हून आसरा देल्ला, भाकर देल्ली, आंग झाकाले धडुतं देल्ली, त्याले धुरकरी केला अन् त्यांच लगीनई लाऊन देल्लं.....

**कौतिका:** पर खाल्ल्या भाकरीले जागत नाई तुवा डेब्या.

**बळी:** माय, चुप्प राह्यनं आता. तवाची साठीसराप करून राह्यली. मीई निंघतो डेबूदादा संगं. करत बस तू अथिसा कंदुरी न फंदुरी..... चाल रे दादा. चाल वं आतीबाई. वैयनी बांध गठुडं...

**डेबू:** बळी, अरे तुयं घर हाये हे. तू मालक हाये. आमी काय बाप्पा मुसाफिर. मामीजीले तरी काय दोस दयाचा ? तिले अंधार अन् उजिडातलं फरकच समजत नाई. आबुजीची जिनगानी अंधारातच खपली. मामाजीले समजलं होतं. पर सावकारानं त्याईचा घात केला. अंधाराचा डाव समजलं हाये मले. त्याची शिकार म्या कसा होऊ ? अग्यान हाये, डोक्शावर कर्जाचे डोंगर हायेत, मरिआई, जाखाई, जोखाई, भैरोबा सारखे मानसाईचं रगत पेनारे देव हायेत. सारे मानसाची जिनगानी नासोतंत. ह्या धरम नोये. यानं आपलं बरं नाई होनार. माया डोक्शात लय इचार येतत. मानुसकीचा रास्ता मले दिसते. तुकोबा-कबिराचे दाखले मले शिकोतंत. म्हून बोलतो मी. तुमाले राग येत असीन माया त् माफ

करजा मले. आबुजी, मामीजी करा तुमाले वाटते तसं. मी कोन हावो तुमाले अडोनारा? पर पह्यले वावर, जिमिन-जुमला मोकया झाला पाह्यजे. बनाजी सावकाराचं रिन फिटलं पाह्यजे. मामाजीचं लय कर्ज हाये माह्यावर मले त फेडा लागन बाप्पा. 'तंगीन खाऊ पर मांग के नाई खाऊ' असं संतवचन हाये.... मी त्याच परमानं वागनार हाये. घरातून काढा भाईर, का गावातून. पर मामाजीचं कर्ज फेडल्याबिगर चैन नाई पडनार मले.... नुसता बोलाचंच नाई तं करनी करून दाखवन म्या. कबीरजी म्हनतंत-

'कथनी थोती जगत में करनी उत्तम सार

कहत कबीर करनी सबल है, कर दे भौजल पार'

रिन फिटवल्या बगैर, रिनातून तुम्हाले मुक्त केल्या बिगर, मले चैन नाई पडनार. (बनाची तिडके सावकाराचा प्रवेश.)

**बनाजी:** एकदम बरुब्बर बोलला, डेब्या तू. अरे, चंद्रभानाले हेच समजावो बाबू. 'तंग खाना पर मंग के नई खाना', पर आईकलं नाई त्यानं माह्यं. बारशाले घेतलं, मावंद्याले घेतलं, तुया लग्नासाठी घेतलं, नातलगासाठी-गणगोतासाठी घेतलं, बाप्पा... बाप्पा.... केवढं रिन घेऊन ठिवलं त्यानं माह्याकडून. माह्या भावासारखा होता, नाई कसं म्हनू त्याले. पर तसा दिलानं लय चांगला होता चंद्रभान...., साऱ्यायच्या मदतीले धावे बाप्पा. आता 'विठ्ठलाची मर्जी, अन आपलेच हात डुंडे.' काय करनार आपून. मले लय दुख हाये त्याच्या मरनाचं....

**डेबू:** आबुजी, आयका यायची, मिठी जबान अन कंबरीले तलवार. पर कबीरजीचा एक दाखला हाये-

'बानी से पहचानीये, साहू चोर की बात,

अन्दर वो करनी करे, निकले मुहँसे बात'

**हंबीरराव:** चुप राह्यनं बे डेब्या. सावकार, लय उपकार झालेजी तुमचे. गरीबाच्या दाठ्ठ्याले तुमचे पाय लागले. तुमची असीच किरपा राहू देजा बाप्पा.

**डेबू:** सावकार! खबरदार एक पाऊल टाकान पुढं तं. तुमीच जीव घेतला हाये माया मामाजीचा. जबरीनं आंगोठा लाऊन....

**बनाजी:** काईई बोलतं बाप्पा डेब्या. माह्या भावासारखा होता चंद्रभान. जबरीनं काऊन घिन बाप्पा आंगोठा, अरे बाबू लय रिन घेतलं होतं त्यानं. आखर



त्यालेच लाज आली बाप्पा मंग त्यानंच नांदा लावला मले, तो म्हने, 'बनाजी भौ मीच कागुद करून देतो वावराचा.' मंग मी नाई कसा म्हनू बाप्पा, सांग बरं !

**डेबू:** सफा खोटं हाये. मामाजी असं करूच शकत नाई. मले सांगतलं असतं त्यायनं. बरं ठिक हाये. तुम्ही म्हणता ते खरं, मंग मामाजीच्या रिनाचे आकडे दाखवा मले. त्यायनं फेडलेल्या पैशाच्या पावत्याई पाह्यजे. मले हिसाब सफा कराचा हाये तुमचा.

**बळी:** सावकार, डेबूदादा म्हतेना त् मंग दाखवा आकडे अन् पावत्या....

**हंबीरराव:** बाबू तू कायले बोलतं रे मधामंधी. चुप राह्यनं.

**बनाजी:** असा कसा रे डेब्या, पत्थरदिलाचा बाप्पा. फाटकं तोंड करून बोलतं. अरे येळ काय ? वखत काय? चंद्रभानाले जाऊन चार दिस झाले नाई. मालकावानीच बोलून राह्यला बाप्पा. चंद्रभान काई बोलला नाई, हंबीरबुढा काई बोलत नाई. अन् तू त् अंगावर वसकतं.

**डेबू:** म्हूनच फावलं ना तुमचं. ते काई बोलले नाई, बोलत नाई. म्हून काय जीव घेता आमचा? रस्त्यावर आनता, तोंडातला घास हिसकता?

'कमा रहे धन धान रोज, उठ उठ करत लबारी

झूट कपट कर जोड बने तुम हो मायाधारी ।।'

**बनाजी:** बाप्पा. लय ग्यान सिकवाले लागला तू. पर तुले काई अधिकार तरी हाय का रे डेब्या. चंद्रभानाचा घरगडी हायेस तू. सालकरी हायेस, आपल्या पायरीनं राह्यनं बे चोनक्या . तू कोन होयेस गा हिसाब मांगनारा.

**बळी:** सावकार, नाई नं कोनी डेबूदादा. मंग सोडा त्यायले. मी हाय बळीराम कोळसकर. चंद्रभान कोळसकरचा पोरगा. वावराचा, घराचा मालक. चाला टाका सारे आकडे, द्या पावत्या आन, करा हिसोब....

**कौतिका:** बाबू... मोठ्या मानसाईशी असी मुजोरी करत काय? चुप्प राह्यनं. आबुजी हाये ना तुये.

**हंबीरराव:** अबे पोट्ट्या, तू कायले मंधी-मंधी बचर-बचर करतं बे ! सावकार आन मी पाहून घिऊ आमचं. तुया आबुजी हाय न जिता. सावकार माफ करजा यायले, पगले हायेत पोट्टे. तुम्ही राग नोका मानूजी.... बसा ... बसा...ना जरासेक. कौतिके पानी देवं माय पावन्याले!

**डेबू :** पयले आकडे, पयले पावत्या.

**बळी:** पयले आमचा हिसोब पाह्यजे.

**हंबीरराव:** अरे... आईकाना रे... पोट्टे हो, सावकाराचं अधार काहून तोडता? अजून तेरस कराची हाये चंद्रभानाची.

**बनाजी:** हंबीर काका, या पोराईले काय समजन रिस्तेदारी ? चंद्रभान माह्या भावासारखा होता. करा त्याची तेरस जोरात. एक पैका कमी पडू देनार नाई. लागन तितकं रिन देईन मी तुम्हाले, कायजी करू नोका.

**डेबू:** पयले हिशोब करा. मंग पाहू रिनाचं.

**बळी:** पयले पावत्या टाका. मंगच तेरसच बोलजा. आकडे सांगा, हिसाब करा पयले अन् आबुजीले फसवान त् याद राखा.

**बनाजी:** अरे... अरे... काय दिसं आले बाप्पा. आपण उपकार कराले जा, तं मानसं आपल्यालेच धमक्या देतत. अरे चंद्रभानाची तेरस चांगली नाई केली त भूत बनुन मांग लागन ना लमचेहो. तवा नोका म्हनजा मले, का बनाजी सावकार बेईमान झाला म्हून. हंबीर काका.... जातो मी...

**डेबू:** असे कसे जाताजी? पयले हिसाब करा अथिसाच.

**बळी:** वाड्यावर येनार नाई आमी तुमच्या.

**बनाजी:** आस्सं. ठिक हाय मंग. समजा नाई केला म्या तुमचा हिसाब. नाई देल्ल्या पावत्या त् काय जीव घेसान माया? पह्यले उरलं रिन फेडा अन् मंगच नाकानं कांदे सोला. (जाऊ लागतात.)

**डेबू:** थांब, सावकारा. जातं कुठिसा? तुलेच सोलतो ना पयले. तुकोबाचं वचन हाये,'भले तरी देऊ गांडीची लंगोटी, नाठाळाच्या माथी हानु काठी'

**बळी:** डेबूदादा, धरतोच मी त्याले, ठेचू याले चांगला.... लय गब्बर झाला हाये सावकार लोकायले लुटूनशानं(बळी सावकाराला पकडतो.)

**हंबीरराव:** बळी, डेब्या, आरं पाव्हनं हाये ते आपले. त्यायचा कायले अपमान करता? बळी, चाल होय बाप्पा बाजुले, मोठा आला ठेचाले. अरे पयले मले ठेचा बाप्पा ! चंद्रभान तं गेला,आता मलेई धाडा त्याच्या पाठी मांगं. मलेच कायले जिता ठिवता?

**डेबू:** तुमाले कायले जी? यानच मारलं ना मामाजीले? (काठी काढतो) आता यालेच जीता ठिवत नाई मी.



**सखुबाई:** डेबू, आरं असं काहून करतं पोरा?

**कौतिका:** बळी, सोड रे बाबू त्यायले.

**बळी:** या इचवाले सोडू ? 'पिंडी वरी इंचू आला, देवधरम नावडे त्याला' याले का सोडला त नांगी मारनं नं ह्या? (सावकार बळीला धक्का देऊन पळतो. बळी त्याच्या मागे जातो. बनाजी कुंपनाच्या बाहेरून ओरडतो.)

**बनाजी:** मले मारता का बे लमचीचे हो. थांबा, तुमाले दाखवतोच माया इंगा? न्हाई तुमच्या घरादाराऊन नांगर फिरोला, अन् न्हाई तुमाले वेट बिगारीले लावल तं. न्हाई तं नावाचा बनाजी तिडके सावकार नाई. मरनाच्या घरी आसू काढाले आलो तं मलेच सरनावर ठिवता. जित्ता नाई ठिवनार तुमाले, समजता काय मले?(जातो.)

**बळी:** सावकारा, पयतं कावुन बायल्या सारखा. पावत्या नाई देल्या न तुबा. तं तुया वाड्यालेच आग लावतो.

**डेबू:** वाचला लेकाचा आज. आमाले सरनावर चढोतो म्हने..... पाह्यतो ना कोन जित्ता राह्यते अन् कोन मरतें थे ?(हंबीरराव बळीला ओढत आणतात)

**हंबीरराव:** अरे पोट्टे हो, सावकाराशी दुस्मनी चांगली नाई बाप्पा !

**कौतिका:** पाह्यजो डेब्या, तुया पायी माया पोराले काई झालं तं ! याद राखजो.

**हंबीरराव:** अरे लय हरामी हाये बाप्पा तो. त्याचा काई नेम नाई डूक धरन ना तो डोम्या नागासारखा.

**कौतिका:** पयले यालेच डसजो म्हना. मायं घर बरबाद करून राह्यला ह्या.

**हंबीरराव:** कौतिके तोंड आवर तुयं. वंगाय वंगाय बोलू नको त्याले आव तो हाये म्हून या घराची आब हाये. ठाकुरकी हाये. पाटलीनीवानी राह्यतं तू अथिसा, त्यायच्या जिवावर. चंद्रभानाले काई फिकर ठिवली होती का त्यानं, घरा-दाराची, का वावराची? त्याच्याच जिवावर उठतं मायमाजे?

**सखुबाई:** बा!

**कुंता:** आबुजी !

**हंबीरराव:** अवं पोरी, डेबू लेकरू हाये मायं. जसा बळी तसा डेब्या. आवं, पोरायवर राग नाई माया डोक्सगरम झालं का करतो गुस्सा मी. अडानी हावो, अग्यानी हावो म्या. माफ कर मले, माफ कर या बुढ्याले.

**डेबू:** आबुजी... मले माफी मांगून कायले नरकात धाडता बाप्पा. गुस्सा कराचा

हकच हाये तुमचा. नादान त् मी हावो. न पटाजोगतं ग्यान तुमाले सांगतो. अन्यावाले तोंड द्याले सांगतो. देव देवस्कीच्या इरोधात बोलतो. तुमचा धरम बुडोतो. पर काय करू आबुजी? या अंधाराले लाथाडल्या बगैर चैन नाई पडत मले. काय करू मी, काय करू? लय तरास होते बाप्पा. लय तरास होते. आंगाची लायी लायी होते. आंगावर चाबकाचे फटकारे मारून घ्या वाटते.

'सुखिया सब सन्सार है, खावै और सोवय,
दुखिया दास तो कबीर है जागै और रोवय,'

कबीरजी सारखी गत झाली हाये मायी !

**हंबीरराव:** डेब्या.

**बळी:** दादा

**सखुबाई:** बाबू, कायले तरास करून घेत मां?

**कुंता:** अजी, असं नोका ना बोलू. भेव वाटते मले.... तुम्हाले काई झालं तं?

**डेबू:** आवं कुंते, असे फटके खाल्याबिगर सत्य नाई समजत. हे फटकेच मानसायले शिकोतेत. घडवतेत अन् बनवतेतई. बाप्पा ! लय फटके खाल्ले हाये माय, म्या लय फटके खाल्ले हाये.

(स्पॉट मध्ये पोतराज चाबकाचे फटके मारून घेत नाचतो आहे. पार्श्वध्वनीतून कुमार गंधर्वाचे 'जोहार मायबाप जोहार' हे स्वर येतात.

'जोहार माय बाप जोहार, तुमचा महार मी महार
बहु भुकेला झालो, तुमच्या उष्ट्या आलो.'

**(अंधार)**



## अंक दुसरा : प्रवेश दुसरा

(घराबाहेरून सोनाजी आवाज देतो. डेबू भौ, ओ डेबू भौ. सखुबाई, कुंता, कौतिका, घरात आहेत.)

**सोनाजी:** (प्रवेशत) डेबू, ऐ डेबू, हायका घरामंधी?

**कुंता:** (आतून येत) सोनाजी भौ, या ना, यानाजी... पर हे तं नाईजी घरी...?

**सोनाजी:** बाप्पा, सकार-सकारच्या पारी कुठीसा गेला बा?

**सखुबाई:** सोनाजी होय का रे बाबू. बस न बाप्पा जरासाक. अरे बाबू डेब्याले नाई जेवाची सुध राह्यते ना झोपाची. पाह्यटीच वावरात जाते. नाई त् गावोगावच्या भजनी मंड्यात .

**सोनाजी:** काकी, लय नाद हाये त्याले भजनाचा. काय भजन म्हनते बाप्पा. व्वा ! समाधीच लागते मानसाची. साधुबोंवा हाय तुमचा डेब्या.

**कुंताबाई:** भौ वरून लोन्याचा गोया दिसते. अन् आतून अंगारच हायजी थे. पर साधुबोवाच हाये माये धनी. फकस्त डोक्सं सरकलं का मंग नाई ते कोनाचे.

**सखुबाई:** माय, लय दुख भोगलं हाये त्यानं. लहानपनापासून बापा बिगर वाढला पोरगा, पर कधी गाऱ्हानं नाई मांडलं त्यानं. कोल्डी खाचा पर कधी हट्ट नाई केला. ढोरावर लय पिरम करते थो. किंडा-मुंगीई मारनं नाई आवडत त्याले. अन्याव तर अजाबात सहीन नाई होत त्याले.

**सोनाजी:** ठाव हाये मले काकीबाई. अथिसा कसा ठेचला होता त्यानं सावकाराले. कसा पयाला होता बनाजी सावकार धोतराचा सोगा पकडून... आवं काकी त्या दिसी तं.... सावकाराच्या मानसायले वावरात असा लोळवला... (जीभ चावतो.)

**कुंताबाई:** सावकाराच्या मानसाले?

**बळी:** (प्रवेशत) सोनाजी भौ, सांगाना यायले. तुमी तं होते तथीसाच! मीच सांगनार होतो वैयनी अन् आतीबाईले, पर हिंमतच झाली नाई माई.

**सखुबाई:** काय झालं रे बाप्पा बळी? काय नाई सांगतलं तुवा आमाले. सावकाराच्या मानसानं पुन्नांदा काई केलं त् नाई?

**कुंता:** भौ सांगाना जी. काय झालं होतं? पर हे त् कंधीच काई बोलले नाईजी

बळी भौ. तुमीय, लपवलं मायापासून. हे तं बाप्पा सदा न कदा गुमसूमच राहयते.

**सोनाजी**: मले वाटलं तूमाले ठाव हाये सारं.

**सखुबाई:** आता सांगसीन काई आमाले का उखानेच घेत राहयशीन? ह्या बळी आमाले काईई सांगत नाई. जसा मोठा भौ तसाच लाहयना...

**बळी:** अवं आतीबाई डेबूदादानं मले मना केला होतं ना !

**कुंता:** बळी भौ, सांगानाजी, जीवाले घोर लागला हाये.

**सखुबाई:** तूच सांग रे बाप्पा सोनाजी. ह्या तू काई बोलतच नाई.

**सोनाजी:** आवं काकी, इतक्या कस्टानं डेब्या वावर कसते. गाडा-गाडा भर दाना काढते. सावकाराले खपलं नाई थे.

**कुंता:** पर ह्यायनं पयले येठबिगारी केली. मंग निम्मे बटईनं वावर केलं. अन् सावकाराचं रिन फेडून वावर सोडवलं होतं जी. बळी भौ च्या नावाच कागुदही केला होता मंग?

**बळी:** जयते सावकार डेब्यादादाच्या नावानं. त्याले खपत नाई डेबूदादाचं काम. सावकार बदला घ्याच्या फिकरीत राह्यते. त्या दिसी म्हूनच भांडन उकरून काढलं त्या राक्ससाईनं!

**सोनाजी:** बकाया रिनाचं कारन काढून जवारी, तूर कापूस न्याले पाठिवले होते सावकारानं मानसं. डेब्याय वाघासारखा डरकावला. त्यानं म्हनंल कसं- 'हात तू लाऊन दाखवा लमचे हो' घाबरले सारे डेब्याले, मंग....

**बळी:** आवं वैनी, मंग बनाजी सावकार आला घोड्याहून टाप...टाप करत. त्यायच्या मानसायले तो म्हने कसा. 'अबे भरानं खाचर, वाट कायची पाह्यता? पाहून घेईन मी ह्या डेब्याले, रोखलं त्यानं का पोलिसातच देतो त्याले. रिनाचा हिसाब हाये मायाजवळ.' मले तं लय राग आला सावकाराचा पयले. त्याच्या घोडीलेच लंगडं करनार होतो म्या. पर डेबूदादानच रोखलं मले.

**सोनाजी:** डेब्या याले म्हनते कसा? बाबू रे आपून पयले हात नाई उचलाचा कोनावर. पर दुसऱ्यानं पयले हात उचलला तू त्याचा हातच ठेऊ नये जाग्यावर. 'पिंडीवरी इचू आला त्याले पैजारीन ठोका' असाय म्हनला होता डेबू. संतवचन म्हनत उचलला डेब्यानं अन् या बळीनं लठ. मंग तं



बाप्पा... लय घाबेरे गुबरे झाले सावकाराचे मानसं... बजरंग्यानं लठ उचलला, अन् सावकारानय भेत भेत घोडी डेबूच्या आंगावर घातली.

**बळी:** मंग डेबूदादा कायचा चुप राह्यते, तुफान आलं. त्याच्या आंगात त्यानं घोड्याची लगाम पकडून लोळवला सावकाराले खाली.

**सोनाजी:** अन् या बळीनं बजरंग्याच्या टकुरात हानला लठ. लय कुथाडला त्याले. बाकी मानसं तं पयूनच गेले तथून. मंग सावकाराले धोतर सांभायालेय येळ भेटला नाई.

**बळी:** आवं वैनी, आतीबाई, सावकारतं असा पयाला टिरीले पाय लावून. त्यानं मांग वयुनई पायलं नाई. दादा बजरंग्याले म्हनला- बजरंग्या तुयं काय करू, तू हाय सावकाराचा गुलाम सोडतो तुले. पर पुन्हा माया आडवा नको येजो. मंग बजरंग्याय निघून गेला खाली मान घालून.

**सखुबाई:** मायबाई ऽऽ, इतलं महाभारत घडलं, तरी आमाले खबर नाई लागू देल्ली.

**कुंता:** तुमच्या जीवाले काई झालं असतं तं बाप्पा अन् हे तं सदाकदा राह्यते आपल्या जीवावर उदार. काई ईपरित झालं असतं तं बाप्पा?

**बळी:** मंग का वैनी तू आली असती तथी लठ घेऊनशानं ? आवं दादा एकटाच भारी पडला त्यायले? दादाले काई झालं असतं तं मी काय बांगड्या भरून बसून राह्यलो असतो तथिसा.

**सखुबाई:** डेब्याचा लक्षुमनच हाये ना बाप्पा तू (शांतता).

**बळी:** आवं वैनी मायी 'कैकयी माता' कुठीसा गेली बा? दिसून नाई राह्यली.

**कुंता:** मामीजी गेल्या हाये ईठ्ठल-रखमाईच्या देवयात. अजी त्या काय होय, येवूनच राह्यल्या (कौतिका फुलाची परडी घेऊन येते.)

**बळी:** कुठीसा गेली होती वं माय? कवाचा पुकारून राह्यलो तुले.

**कौतिकी:** काऊन गा बाप्पा? आरं सोनाजी तू कवा आला गा? डेब्यात् नाई रे बाबू घरी .(आत जाते)

**सोनाजी:** रातच्याले भजन ठिवलं हाये माया पोराच्या बारशाचं, मारुतीच्या पारावर. त्याचं आवतन द्याले आलो होतो. डेब्या बिगर रंगत नाई ना भजन. बरं, सांग जा डेब्याले अन् तुमी येजा सारेजन. जातो मी आता. लय काम पडले हायेत.

**कुंता:** हे आले का, येऊजी आमी. अन सोनाजी भौ मामीजीले नोका सांगू

आमालेय आवतन देल्लं म्हून.  नाई तं यायची अन बळी भौ ची काढनं त्या वरात.

**सोनाजी:** बाप्पा, मले का आगीत उडी घ्याची हाये? (कौतिकाबाई बाहेर येत)

**कौतिका:** कुठीसा उडी घेत गा सोनाजी? आता कामधंदा सोडून पयलवानी सुरू केली का?

**बळी:** अवं माय, काई ऽ ऽ ऽ आईकतवं का तू? अवं सोनाजी भौ न उडी नाई, बुडी म्हतलं बुडी.  पूर्नामायेत बुडी घेऊन येतो, म्हनजी आंघोय करून येतो.  असं म्हनलं त्यानं.... समजलं? हौ न रे सोनाजी भौ?

**सोनाजी:** हौ,हौ, हौ ना! बरं जातो मी.  आन मामी तुमी येजाजी परसादाले, नाई तं म्हनानं, म्या आवतनच नाई देल्लं तुमाले.

**कौतिका:** बरं बाप्पा, साऱ्यायले घेऊन येतो.  तू कायजी करू नोको. (सगळे आश्चर्यानं तिच्याकडे बघतात. हसतात.  ती असंमजसपणे त्यांच्याकडे बघते.)

**बळी:** माय, खाले देन वं काई ! लय जोरात भुक लागली हाये मले.

**कौतिका:** बाप्पा, एकटाच खासीन का? तुया दादाले येऊ दे नं.  मंग जेवजा दोघयबी पोटभर.

**बळी:** बाप्पा! दादाची इतली तुले फिकर? कवा पासून बा?

**कौतिका:** बाबू मी का दुस्मन हावो रे त्याची? बेईमाना मामी हावो ना त्याची.

**सखुबाई:** कौतुके तुया तोंडात गुय साखर पडो माय.

**कुंता:** मामीजी अज् कोन वार हाये जी?

**कौतिका:** काऊन वं कुंते?

**बळी:** काई नाई वं माय, पंचांग नाई समजत वैनीले. तिले वाटलं का अज सूर्य देवता कुठूनशान उगीवला बा?

**कौतिका:** टोमने मारतं का रे मायले तू? नाई रे बाप्पा, (भावनाविवश होते) डेब्याचे लय उपकार हायेत आपल्यावर.  तुया बा गेल्यावर राब राब राबला.कितले कस्ट केले, सावकाराच्या नलड्यातून वावर वापस घेतलं.  खंडीभर ढोरं केले.  आपल्याले सांभायल. तुया वावरासाठी पुन्नांदा आपला जीवई फुफाट्यात घातला त्यानं.

**बळी:** म्हनजी? तुले ठाव झालं सारं पुरान!

**सखुबाई:** कौतिके तुवा कंधी सांगतलं नाई माय मले?



**कौतिका:** कोनत्या तोंडानं सांगुजी तुमाले? कायतोंडी हायेना मी? पर माय मनच मले खात होतं, सावकारानं काई केलं असतं माह्या डेब्याले तं माही हये पोट्टी रांडमुंड झाली असतीना? मले आता उपरती झाली हाये.  इठ्ठला ! सुखाचा ठेव बाप्पा माया डेब्याले (डोळ्याला पदर लावतात.) अवं असा पोरगा, असा भौ, असा दादला, अन् असा भासा नसिबानच भेटते माय. माया डेब्याले सर नाई कोनाची. (पुन्हा डोळ्याला पदर लावते) आरे तुये आबुजी मरतानाय डटावून गेलते मले.  ये म्हने, ‘कौतिके, डेब्या हिरा हाय हिरा. त्याची कदर करजो.  त्याले परका करू नोको. जीव लाव त्याले, मया  दे, तुले काई कमी नाई पडनार.  सखुबाई माफ करजा मले. म्या तुमाले लय तरास देल्ला, वानावानाचं बोलली माफी द्या, मले माफी द्या.’ (ती अन् सखुबाई घरात जातात.  वातावरण सुन्न, कुंता तुळशीजवळ दिवा लावते. भजनाचे सुर कानावर पडू लागतात डेबुजीचा संथ प्रवेश गुमसूम बसतात.)

**कुंता:** बाप्पा, अज काऊन जी इतला उशीर? (शांतता) बोलत काऊन नाईजी?

**सखुबाई:** (आतून येत) आला का रे बाबू? कुंते वाढ माय त्याले जेवाले.  पोरायले झोपवतो मी तवरीक. (आत जाते.)

**कुंता:** सावकारानं अखिन तं काई केले नाई ना.!

**बळी:** आरं दादा, सोनाजी भौ आला होता मंगा, भजनाचं आवंतन द्याले.  (शांत) दादा बरं नाई का तुले? आरं हाव, दादा आज एक लय मोठा चिमत्कार घडला हाये.  कैकयी मायचं मन पालटलं बाप्पा.  कौशल्या मायसारखी बोलत होती तुयासाठी.  तिले कयलं म्हने सावकाराचं परकरनं (शांत) दादा काऊन गा गुमसूम? (कौतिका येते)

**कुंता:** आमाले काऊन नाई सांगितलंजी तुमी? जीवाले नुसता घोर लागून राह्यते माया.

**कौतिका:** आवं माय, त्याले सांस तं  घेऊ देनं.  का आल्या.... आल्याच बरसतं? काय झालं रे बाबू? तुये मामाजी गेले, आबुजी गेले, पर मामी जित्ती हाय तुयी.

**बळी:** दादा, आयकलं का, कौशल्या माय काय म्हनते तं?(सखुबाई येते.)

**कुंता:** बोला ना जी काई तरी.  तुमी गुमसूम राह्यले का मले भेवच वाटते बाप्पा.

**बळी:** राग आला कारे दादा तुले? सपथ घिऊनशान सांगतो. सावकार परकरनाचं

म्या नाई बोललो काई. गलतीनं सोनाजी भौ च्या तोंडातून निंघून गेलं.

**कौतिका:** डेब्या, जाय बरं, हात पाय धून घे. कुंते तू त्याले वाढ माय पयले. सकार पासून उपासी हाये, मायं पोरगं... अन् तुमी अथिसा बाता मारून राह्यले. जाय रे बळी, जेवा बर दोघं मियून.

**डेबू:** मामी मले भूक न्हाई.

**कुंता:** बरं नसन वाटत, तं् काढा घ्यानाजी उलिसाक. दिऊ का करून?

**सखुबाई:** अवं नाई म्हनते ना थो. कायले त्याच्या मांग लागता. खाईन थोड्या येळानं.

**कौतिका:** कुंते बोलतच राह्यशीन का बाप्पा. जाय चुल पेटव आंधी. गरम गरम खाऊ घालजो. त्याले. (सखुबाई, कौतिका जातात.)

**बळी:** दादा, तू आराम कर घरीच. मी जातो भजनाले. दोघंई नाई दिसलो त् सोनाजी भौले राग येईन. तिकून आल्यावर जेवीन म्या. वाटलं तुले त् जेवून घेजो, वाट नोको पाह्यजो म्हाई. येतोवं वैनी अन् पाह्य भन भन नोको लावू त्याच्या मांग, करू दे आराम त्याले. (जातो, शांतता.)

**कुंता:** लय बरं केलं जी तुमी? त्या नागाले ठेचलं. राक्सस हाये राक्सस थ्यो सावकार. पयले गोड गोड बोलूनशान रिन देते. अन मंग वावर हडपते. त्याले हिसका दाऊन साऱ्या गावाची हिंमत वाढवली हाये तुमी... (शांतता) काऊनजी उदास बाप्पा? काई तं् बोला. मंगापासून मीच एकलीच बोलून राह्यली.

**डेबू:** कुंते, आता मन नाई रमत मायं संसारात. बा गेला, मामाजी गेले, आबुजी गेले. एखाद्या दिसी मीई जाईन असाच....

**कुंता:** असं नोका ना बोलू जी. माया कपायाच्या कुकवाले काऊन दिठ लावता बा? आमाले गरज हाये तुमची.

**डेबू:** तुलेच काऊन साऱ्या जगाले गरज हाये माई. लय अंधाराचं रान वखवखलं हाये. मले दिसते लोकाचं अग्यान, मानुसकिले नख लावनाऱ्या रितीभाती, यसनानं कंगाल झालेला मानूस, कर्जाच्या कचाट्यात सापडलेले लोक, सावकारीचा फितुरी-फंदा, मातामाय, मरीमाय, सटव्यायनं हैदोस मांडला हाये. गरीबी हाये, लाचारी हाये जिकडे तिकडे... ग्यानेश्वर महाराज म्हनतत-



'का घराचिये उजेड करावा, अन् परकिया अंधार पाडावा?'
सारा अंधार पसरला हाये अन उघड्या डोयानं मी फकस्त पाहून राह्यलो. हे पाहून माया मनाले दुख होते. मंग काय करू मी सांग बर! मायं मन थाऱ्यावर नाई बाप्पा.

**कुंता:** म्या अनपढ, गवार बाई हाये. मले नाई समजत बा तुमचं ते तत्वग्यान. तुमी हायना लय मनाले लावून घेता. आता आपल्याले चांगले दिस आले हायेत. अजून लय कष्ट करू. कष्टाले नाई भेत म्या. पर तुमी असे वागले, बोलले का भेव वाटते मले. असं बोलते का जी कोनी?

**डेबू:** कुंते, भेव कायचा वं? साऱ्या सवालाचा जबाब देता आला पाह्यजे. लोकाच्या सवालाचा, तसा मनाच्याय सवालाचा. जिनगानी लय जवयून पायली माय म्या. तरास, अपमान भोगला, अन्याव सहीन केला. माया जीवाची भावाची मानसं गमावली. हानामाऱ्या केल्या. कष्ट केले. फकिरी पायली, पैकाय पाह्यला. पर माया मनाले जबाब भेटत नाई. जबाब ढुंढाले पाह्यजे. नामदेव बुवा म्हनतत्-
'जीवना येगळं मच्छ तळमळती, जाले मजप्रति तैसे आता
नामा म्हने माणिया चित्ती, ऐसे खंत करिती जगाचिया ।।'
साधू संतांची वचनं, अन् आपल्या संसाराचा गाडा. म्याच झगडतो मंग मायाशी. मंग मायं डोस्क गरगरते. भुलल्या सारखे वाटते. पर काई समजत नाई ना, उमजत नाई. काई तरी हारवल्या सरीखं वाटते.....

**कुंता:** तुमचं काई हारवलं का जी? मले सांगा ना, मी दिन ढूंढून.... पयले काऊन नाई सांगतलं. पर हरवलं काय जी ते तं् सागा.

**डेबू:** माया चांदीचा कलदार हारवला हाये.

**कुंता:** बस, इतलीसी बात? त्यासाठी इतलं उदास कायले व्हा लागते? कुठीसा हारवला सांगान का मले?

**डेबू:** पूर्ना मायच्या डोहात.

**कुंता:** बाप्पा... पूर्ना मायच्या डोहात ?

**डेबू:** अज सकाई वावरात गेलतो, तवाची गोठ हाये, खूप ढुंढला पर नाई सापडला. तो सोधायले म्या डोहात उडी घेतली. अंदर कितला अंधार होता बाप्पा. डोयाले काई दिसना. बसं. एखादी उनाची तिरीप आली

का जरासाक उजेड चमके. मायच परतिबिंब मले दिसे. पर जरासाक . आखर कलदार नाईच भेटला मले... अंधारानं भेटू देल्ला नाई. अंधाराचा डोह मले पह्यलांदा समजला. त्याले कापल्याबिगर माया कलदार भेटनार नाई, हे उमगलं मले... पर सास कमी पडत होते. धाप लागत होती. नाका-तोंडात पानी भरत होतं जीव वाचवाले म्या वरत आलो. पर.... पर बाहिर सारं काई सान्त होतं. पुर्ना मायनं मले धडा सिकवला होता.(शांतता) पुर्ना मायनं मले म्हतलं, डेब्या असाच अंधार लोकायच्या जिनगानीत पडला हाये, तो अंधार तू चीर, काप त्या अंधाराले, सूर्यनाराईन बन. पर कुंते म्या लहान मानूस हाये. म्या कसा बनू बाप्पा सूर्यनाराईन? कसा कापू अंधार....? मंग मले, कबीरजीचं वचन आठोलं-

'जो जानो जीव अपना करीहो जीवन को सार
जीव ऐसा पाहुना मिले ना दुजी बार.'

पर लय सवाल माया मनात, डोस्क्यात, डोयात उभे झाले. म्या अडानी, अग्यानी मानूस, अंधाराच्या राक्ससाईशी कसा झगडू मी? माया डोयापुढं आताई तोच अंधार दिसून राह्यला. मायं डोस्क गरगराले लागलं हाये.....

**कुंता:** बरं, जाऊ द्याना जी आता. लय ईचार करू नोका. डोस्कं देऊ का दाबून?

**डेबू:** कुंते, राहु दे माय, जाय काम कर तू आपलं. मी लेटतो जरासा अथिसाच.

**कुंता:** जरासक जिऊन तं घ्या.

**डेबू:** मले भूक नाई. अन् मनई होतं नाई काई खाचं. जाय तू....

**कुंता:** अजी... (शांतता..... डेबू खाटेवर लवंडतो. ते बघून दुखी मनानं कुंता आत जाते. शांतता. थोडा वेळ जातो. भजनाचा शेवटचा गजर कानी पडतो. बळी येतो. डेबूला झोपलेला बघतो.)

**बळी:** अरे व्वा. दादा जिऊन झोपला वाटते. घरातई सामसूम (ढेकर देतो. पोटावरून हात फिरवतो.) सोनाजी भौ न साऱ्यायचा परसाद मले एकट्यालेच खाऊ घातला बाप्पा. पोट लय ऽऽऽ भरलं हाये (स्वत:लाच) बळी भौ आता का जेवान रातीचे तं लय पंचाईत होईन. (ढेकर देतो....) चाला... चाला झोपाले.... सकारी लवकर उठाच हाये बाप्पा. चाला...

(जांभई देतो... आत जातो. शांतता.)

**अंधार**



(लाल प्रकाश फक्त डेबूच्या अंगावर साऊंड इफेक्ट कोलाज. लाला आणि झिंगराजी चे संवाद. कौतिकी - हंबीरचे संवाद, चंद्रभान मामा, तिडके सावकाराचे आवाज, मरिमायचे गाणे, बकऱ्याचा बॅऽऽ बॅ ऽ ऽ गोंधळ, भारूडाचा आवाज. या सर्व आवाजाचा कोलाहल ऐकू येतो. डेबू दचकून उठतो. इकडे तिकडे शोधक नजरेने बघतो. थोड्या वेळाने कबीराचा-तुकोबाचा आवाज ऐकू येतो. एक कडवे कबीराचे, एक कडवे तुकारामाचे. कबीर -तुकारामाचा प्रवेश निळ्या झोतात, दोन स्पॉट मध्ये दोघे पाठमोरे. डेबू मध्ये उभा राहतो.)

**कबीर:** तू मरजीवा समुद्र का, डुबकी मारी एक
मुठी लाया भर ज्ञान की जामे वस्तु अनेक ।।

**तुकाराम:** नको नको मना गुंतू मायाजळी काळ आला ग्रासावया,
तुका म्हने तूच सोडवीन कोन तुझिया तूच वाचूनिया ।।

**डेबू:** कबीरजी! तुकोबाराया, वाचवा मले वाचवा. भरमाच्या जंजायात फसलो हाये. तुम्हालेच याद करत होतो. काय करावं काई सूचत नाई बाप्पा, संसाराची जिम्मेदारी हाय मायावर पर जीव रमत नाई संसारात. संन्यास घेतो म्हतलं तर पटत नाई मनाले.... पर अंधार पाह्यल्यावर जीव नाई राह्यला ठिकानावर. मले काई समजत नाई, उमजत नाई. इचार करू करू डोस्कं गरगरुन राह्यलं जी मायं.

**कबीर:** क्या सोचत हो डेबूदास ? डर गये अंधेरेसे या मोहमाया, का पलडा भारी हो गया है.

'माया मरी न मन मरे, मर मर गये सरीर
आसा तृसना ना मरी कह गये दास कबीर ।।'

तुम्हे इस मोह माया से नाता तोडना होगा डेबुदास.

**तुकाराम:** डेबूजी, कबीरबुवा सत्य वचन बोलतात. तुमालाही सत्याचा साक्षात्कार झाला आहे. आता विश्वात जे रंजले-गांजले आहेत तेच गणगोत आहेत. त्यांच्या उद्धारासाठी तुला सज्ज व्हायचे आहे.
'नाई तू नोहे कोनिया गावीचा एकला ठायीचा ठायी एक
नाई तूज कोणी आपुले दुसरे रंजले-गांजले कर तू आपले
तुका म्हणे आता पहाटेची गाथा लोक उद्धारासी ठेवानिया माथा ।।'
डेबूजी, उठा अन् समाजात पसरलेल्या अंधाराला दूर सारा.

**डेबू:** तुकोबाराया, समजलं मले पर उमजत नाई. भरला संसार हाये माया. त्याची जिम्मेदारी कसी झटकू म्या? संसार सोडूशाई नाई वाटत मले.

**कबीर:** मनवा तो पंछी भया, उड चला आकाश
तू उपरसे गिर पडा मन माया के पास?
डेबीदास इसलिए माया का जंजाल छोडो. सत्य धरम की राह ढुंढो.
अरे माया पापन है.
'माया पापन ठहरी बडी, हरसू करे हलाल'
और काया भी नही तेरी, फिर क्यों तू करता मेरी मेरी.
जब हम जगमें पग धरो सब हसे हम रोये,
अब ऐसा काम कर चलो पिछे हसी ना होये।

**डेबू:** कबीरजी मंग का करावं म्या, का करावं? सांगा कबीरजी मले सांगा. तुकोबाराया सांगा मले सांगा !

**तुकोबा:** वेचुनिया चिंध्या, भरूनिया धागा, गुंडाळुनी अंगा आळवावे.
रंजल्या गांजल्याशी आपुले मानावे, दिन दुबळ्यांच्या दु:खाशी मिळावे,
तुका म्हने आता निर्वाणी लागावे....
डेबूजी, आता तुमचा मार्ग तुम्हालाच शोधायचा आहे. उजेडाचा वारकरी व्हायचं आहे.

**कबीरजी**: डेबीदास भ्रान्ति की पहाडी नदियाँ बिच में मोहमाया की है लाट
मद मत्सर मेह की बरसे और पवन बहे घन दाट
कहत कबीर सुनो भाई साधू क्या तरना है यह घाट?
बोलो डेबीदास बोलो.

**डेबू:** हाव कबीरजी हाव, हा घाट मले पार कराचा हाये, मले पल्याड जाचं हाये. पन कबीरजी तुकोबाराया मले हे जमनं ? माया जीव अजुनई अडिकला हाये अथिसा, पर मनाची तडफड वाढून राह्यली. मले लंगडे-लुले, अंधये-पांगये बलावून राह्यले. रिनाच्या फंदात अडिकलेले लोक दिसून राह्यले. अंधइस्वासाच्या गायात अडकलेले, अग्यानी मानसं दिसून राह्यले. मुकी जनावरं, कसाबाच्या सुऱ्याखालचे कोंबडे, बकरे दिसून राह्यले. रोगराई, महामारीनं किड्या मुंग्यावानी सडून राह्यलेले लोक दिसून राह्यले. भाकरीसाठी तडफडनारे जीव, इलाजा बगैर टाचा घासून मरनारे



मानसं दिसून राह्यले. कितला अंधार पसरून हाय बाप्पा. तुकोबाराया कबीरजी मले काई तरी कराच हाये. तुमी यान माया संगत.....

**कबीर:** मौको कहा ढुंढे रे बंदे, मै तो तेरे पास में,
ना मै देवल ना मै मस्जिद ना काबे, कैलास में.
डेबीदास, हम तो तुम्हारे पास है, तुम्हारे मन में है।
लाख खरच फिर हाथ ना आवे मनुष्य जनम सुहेला.
ना कोई ना संगी साथी, अरे जाता हंस अकेला।
सूनो डेबीदास,
ज्यों तिलमाही तेल है, ज्यो चकमक में आग
तेरा मालिक तुझी में हें,अरे जान सके तो जान।
मानस जनम दुर्लभ है होई न बारंबार,
जो बन फल तुट पडो, फिर से लगीयो ना डार ।
डेबूदास, मनुष्य का जनम बस एक बार होता है । इस जनम मे तुम बार बार जन्म लोगे । सत्य की राह चलना है। प्रेम की राह चलना है, दया धरम की राह चलना है। चेतना की राह चलना है। मनुष्यों को जगाना है। चलो डेबीदास चलो.

**तुकोबा:** चाला डेबूजी चाला. दु:खी कष्टी लोकाचा भवसागर तुमची वाट पाहात आहे. त्याचं जीवन सुधारा, त्यांना उपदेश द्या. आता हेच तुमचं कर्तव्य आहे. तोच तुमचा विठोबा आहे.

**डेबू:** पटलं तुकोबाराया पटलं. कबीरजी तुमी मले रस्ता दाखवला. माई तडफड सांत केली. तुकोबाराया तुमी मले हिंमत देल्ली. माये डोये उघडले. कबीरजी तुमी मोह मायाचा फंदा दूर केला. माया जलमाचं सारथक केलं. मले गुरुग्यान देल्लं. लय उपकार झाले तुमचे. निघालो, निघालो, आत्ता मी. रस्ता फुटन तिकडे अंधाराले कापत जाईन. अंधाराले चिरत जाईन. (मागे सरतात. मागे ठेवलेल्या मडक्याला धडकतात. मडके फुटते. त्याचं खापर उचलतात काठी घेतात उभे राहतात. डेबूजीवर निळा प्रकाश. पार्श्वभागातून गाणे. भला हुआ मेरी मटकी फुट गयी, तो पनिया भरन से रह गयी।। सुखिया सब संसार है खाये और सोये, दुखिया दास कबीर है, जागे और रोये ।। कहना था सो कह दिया अब कछू कहा ना जाए,डेबूजीवर निळा प्रकाश पार्श्वभागातून गाणे. एक दिया गया सो, जा रहा दरिया लहर समान ।। (कबीर- आबीदा)

**अंधार**

# अंक दुसरा: प्रवेश तिसरा

**(स्थळ:** रिनमोचन, यात्रेतले पार्श्वध्वनी, रंगमंचावर डावीकडे प्रकाशझोत. भारूड मंडळी भारूड सादर करीत आहेत.)

**भारूड:** सूर्य उगवला, प्रकाश पडला, आडवा डोंगर, आडवा डोंगर तयाला माझा नमस्कार. ग....ग.... ग...ऽ ऽ ऽ , विंचू चावला, देवा रे देवा,
विंचू चावला, काय मी करू? कोनाला सांगू?
काम क्रोधरुपी विंचू चावला, तम घाम अंगाशी आला.
ग...ग...ग...ऽ ऽ विंचू चावला, देवा रे देवा विंचू चावला.
मनुष्य इंगळी अति दारूनं, मज मारीला इंगा तिनं
ग...ग....ग...ऽ ऽ, विंचू चावला, देवा रे देवा विंचू चावला.
या विंचवाला उतारा, तमो गुण मागे सारा,
सत्व गुण लावा अंगा, इंचू उतरे भरभरा ।।
ग....ग....ग...ऽ ऽ, विंचू चावला, देवा रे देवा विंचू चावला हो...

(भारूड संपते. सर्व भारूडकरी जातात. दुसऱ्या झोतात लावणी सुरू होते. लावणी संपते. अंधार. पहाटेचा पार्श्वध्वनी. रंगमंचाच्या एका बाजुला कुंताबाई दगडाच्या चुलीवर भाकरी भाजते आहे. शेजारी सखुबाई बसली आहे. कुंताबाई शुन्यात हरवली आहे. सखुबाई बाळ गोविंदाला थोपटते आहे. अचानक कुंताबाई रडू लागते.)

**सखुबाई:** काऊन रडतं वं माय? हिंमत नोको हारू. भेटनं डेब्या आपल्याले. धीर धरनं माय.

**कुंता:** मामीजी, रिनमोचनचं सार आखर धुंडून काढलं. बळी भौ, बबन भौ, सोनाजी भौ वनवन फिरून राह्यले. मामीजी काय करू म्या? मायं मन नाई थाऱ्यावरजी!

**सखुबाई:** भेटन बाप्पा भेटन थो. देव परीक्षा पाहून राह्यला तुई. भगवानाच्या घरी देर हाये पर अंधेर नाई.

**कुंता:** कधी भेटन मामीजी, कंधी? चार पाच साल झाले. दिसले नाई माया डोयानं. आलोकीले, गोईंदाले असं बेआसरा सोडून गेले. जराई काई नाई वाटलं का जी त्यायले?

**सखुबाई:** आता काय सांगू माय. पयले माया धन्यानं साथ सोडली. आता



म्हातारपनी पोरानं किनारा केला. मी कोनाले सांगु व माय मायं दुख? पर मले तुयं लय वाईट वाटते. दोन दोन पोरं पदरात टाकून पोबारा केला त्यानं.... असं, कसं रे केलं डेब्या तुवा बाप्पा.(बळी, बबन, सोनाजी येतात)

**कुंता:** बळी भौ, थे दिसले का जी तुमाले कुठीसा ?(शांतता) बबन भौ, बोलानाजी काई.

**बबन:** वैनी ......(शांतता)

**कुंता:** सोनाजी भौ, तुमी तरी सांगाना जी....

**बळी:** आवं, वैनी आमी हारलो नाई. डेबूदादा भेटनच आपल्याले.

**कुंता:** इतल्या महिन्यापासून सारे थेच सांगून राह्यले मले. पर कोनी त्यायले आनून उभं नाई करत मायापुढं.

**बळी:** वैनी, सोनाजीनं पाह्यलं त्याले, पर वयख पटली नाई.

**सोनाजी:** हाव वैनी, एका साधुबोवानं रिनमोचनाचा घाट खोदला हाये. कोल्डी माती टाकूनशान चिकनी घसरन तो वायली करून राह्यला हाये. दुरुन मले त् तो डेब्या सरीखाच दिसला.

**बबन्या:** सोनाजी तोच आसन मंग, मायी जानकारी खोटी नाई निंघन. बजरंग्या सांगत होता मले, त्यानं डेब्याले रिनमोचनलेच पाह्यलं म्हने. हनमंत्यालेई घाटावरच दिसला होता थो.

**बळी:** आमी घाटावरच जाऊन आलो मंगा, तवा नव्हता तथिसा थो. वैनी त्याचा ठिकाना त् कयला, फकस्त खात्री कराची हाये. दुपार टयली का जातो न् आमी त्याले पाहाले. धीर धर जरासाक.

**कुंता:** बळी भौ, आता हे आयकल्यावर धीर कसा धरू म्या? त्यायले पाह्यल्या बिगर चैन नाई पडन मले. तुमी थकले असान. भाकर खा. तवरिक मी येतो पाहून....(सखुबाई कडे जाते) मामीजी येतो मी त्यायले सोधून. गोईंदाले सांभायजा.

**सखुबाई:** आव कुंते, जातीन ऽ ऽ ना पोरं दुपारच्याले. तू कायले माय वन...वन.. फिरतं. दोन दिस झाले काई खाल्लं नाई तुवा. उपासीपोटीच हाये माय!

**कुंता:** मामीजी, माया जीव टांगनीले लागला हाये. भेटनंच मी त्यायले. साधूबोवा व्हा का अजून कोनी व्हा म्हना. मलेई काय वयखता येनार नाई? अन् लपले असीन कुठीसा त् धुंडून आनन म्या त्यायले.

**सखुबाई:** जा माय, गोईंदाची फिकर नोको करू. भेटला त् आन धरून त्याले म्हनजो, त्याची मायई अथिसा त्याची वाट पाहून राह्यली. जाय माय जाय (कुंताबाई जाते. पार्श्वभागातून गाण्याचे स्वर ऐकू येतात.)

जिवं भिरभिरे वाऱ्यावरती, मन रोखू कशी मी आता
पंखातील बळही संपले, नभ शोधू कशी मी आता....

(निराश... हताश... झालेली कुंता परत येते. सखुबाईच्या गळ्यात हात टाकून रडते. सखुबाई तिला सावरते.)

**कुंताबाई:**मामीजी, चाला, बांधा बरं गठुडं. म्या इरादा केला हाये, दापुऱ्याले जा चा. मायी अलोकी, लहान मामी एकल्याच हायेत तथिसा.

**सखुबाई:** आवं पन डेब्या....? त्याले ढुंढाचं हाय ना?

**कुंता:** याचं असीन त् येतीन वापस. मामीजी लय थकली हाये जी मी. माया जीव नाई लागतजी आता अथिसा. नुसत्या हुलकावन्या देऊन राह्यले थे. अन् त्यायचा आता काई भरूसा नाई राह्यला. नाई त् इतले दिस झाले. आले पाहाले? का आपून जित्ते हावो का मेले हावोत? आसा ठिवाची, वाट पाहाची पर कवरीक मामीजी कवरीक. (रागानं गठुडं बांधते. गोविंदाला घेते.) चाला, मामीजी, (उठतात जायला निघतात. तेव्हाच बळी ओरडत येतो.)

**बळी:** वैनी... मारोती वठ्ठ्यांनं सांगतलं मले. थो चिंधेवाला साधू घाटावर दिसला म्हून. तोई म्हने, का डेब्याच होय म्हून थो. बबन्या अन् सोनाजीले धाडलं म्या तथिसा.... तुमी चाला बरं लवकर! (सखुबाई, कुंता, बळी एका विंगेतून आत जातात. रंगमंच रिकामा थोड्या वेळानं दुसऱ्या विंगेतून डेबू येतो. त्याच्या मागे बबन्या अन् सोनाजी आहे.)

**डेबू:** अरे, सांगतलंना तुमाले बाप्पा म्या. मी तुमचा डेबू नोये म्हून. वयखत नाई मी तुमाले. काहाले माया मांग लागता. करू देना मायं काम मले. दिसत नाई का, कितली घसरन आये अथिसा. जाना बाप हो जाना..... (दुसऱ्या विंगेतून कुंता, बळी, सखुबाई येतात.)

**सखुबाई:** दिसला काय वं माय माया डेबू? तो साधु झाला म्हने, माय...माय... (आसपास बघत ) अथिसा त् साऱ्याईकडेच साधूच साधू दिसून राह्यले मले...

(कुंता बाई डेबूकडे निरखून पाहाते. दाढीचे केस पिंजारलेले, धोतराची लुंगी करून बांधलेली बांडीला ठिगळं लावलेले. डोक्याला मुंडासे बांधलेले आहे.)



**सोनाजी:** डेबूजी, तू हौतं म्हन, मंग पाह्य आमीई करू लागतो तुह्या संग हये काम.

**बबन्या:** काय डेब्या? हे काय सोंग पांघरलं दोस्ता. अन् म्हनंत आमालेच वयखत नाई. पर आमी वयखलना तुले. तूच होय आमचा डेबू.

**कुंता:** मामीजी, कोनी काई म्हनो. पर हेच होय थे. दाढी मिशा वाढवल्यानं अन् चिंध्या मिंध्या पांघरल्यानं काय धन्याची वयख इसरन मी? माया कुकवाले कसी इसरन मी? मामीजी, पाह्यना हेच होय थे, हेच होये, बळी भौ चालाना जी. तुमच्या दादाले वयखलं नाई का तुमी?

**सखुबाई:** डेब्यारे माया डेब्या, बाबू रे ! कुठीसा होता मां. इतले दिवस?

**बळी:** डेबू दादा ऽ ऽ (जाऊन बिलगतो.)

**कुंता:** अजी ऽऽऽ (डेबू समोर रडू लागले.)

**बबन्या:** पाह्य, डेब्या सारे आले तुले वापस न्याले.

**सोनाजी:** आपली सारी भजन मंडई तुलेच सोधून राह्यली. आमा सगयायले तुई गरज हाये राजा. अन तू अथिसा.... (डेबू त्या गराड्याच्या बाहेर पडतो. जायला लागतो.)

**कुंता:** अजी कुठीसा निंघाले जी?

**सखुबाई:** आरं काई त् बोल बाप्पा. परक्यावानी काहून वागून राह्यला रे बाबू.

**डेबू:** परकाच समजा मले, आता मी तुमचाच नाई राह्यलो. साऱ्या जगाचा झालो हाये. संसाराचा, नात्या गोत्याचे पास तोडले हाये म्या. आता तुमी तुमच्या रस्त्यानं जा. मले माया रस्त्यानं जाऊ द्या. हा चिंध्या तुमाले काई नाई देऊ सकत आता !

**सखुबाई**: बाबु रे, घर भरलं हाये. तुया गणगोताले सोडून कुठीसा चाल्ला गा तू?

**कुंता:** तुमच्या बिगर आमचं कसं हुईनजी? चाला बरं घरी.

**बळी:** डेबू दादा, तुह्या बिगर घर सुनं सुनं झालं हाये? तुया इतली जिम्मेदारी मले नाई पेलत. चाल बरं आता तू !

**डेबू:** आरसं ? म्या मेलो असतो त् मंग काय केलं असतं बाप्पा तुम्ही? मेलो म्हूनच समजा मले. अरे हाडामासाचा गोया हाये हा. इतला जीव नोका टाकू ह्याच्यावर. ह्या जीवाचा काई भरोसा राह्यते?

**कुंता:** असं नोका ना बोलू जी. अलोकी, मामीजी तुमची वाट पाहून राह्यल्या

घरी. चाला बरं!

**डेबू:** मी कुठीसाच येत नाई. माया रास्ता येगळा अन् तुमचा रस्ता येगळा.

**बबन्या:** डेब्या, लय झालं तुयं नाटक, चाल बरं आता !

**सोनाजी:** डेबू, अरे तुले तुया मायची, वैनींची, पोरायची काई कदर नाई का रे? वाऱ्यावर सोडलं त्यायले....

**कुंता:** तुमच्या बिगर कोनी नाईजी मले, माया पोरायले. तुमी नसान तं माया संसार कसा चालन? तुमी जिते असताना का म्या रांडमुंड म्हून राहाचं? तुमच्या बगैर मी जित्ती नाई राहू सकत बाप्पा !

**डेबू:** आवं माय, आता पह्यला डेब्या नाई राह्यलो म्या. कबीरजी- तुकोबानं दाखले देल्ले. पुर्नामायनं धडा देल्ला.... मोह, मायेतून बाहिर पडलो हाये मी. माया संसार आता चार नाई, चारकोट मानसाचा झाला हाये जीवाचा काई भरोसा असते का? जीव असे पर्यंत लोकायसाठी. समाजासाठी करू द्या मले आता काई. कोनीच काई करत नाई, म्हून मी करतो बाप्पा. आता लय मोठी जिम्मेदारी हाये मायावर. मले मायं काम करू द्या. जा लागा रस्त्याले. बास,आता मले कोनालेच काई म्हनाचं नाई. कबीरजीचं वचन हाये.

'बिछुरा था तबई मिला, अब कछू कहना नाही
यह वह दौर एक भया, जब सद्‌गुरु मिले कबीर ।।'

तुकोबारायानं हुकम देल्ला हाय मले, 'रंजल्या -गांजल्याची सेवा कराचा.'आता मले पुन्नांदा फुफाट्यात ओढू नोका. माया मांग लागू नोका. तुकोबा राया म्हनतात- 'हे इस्वची माझे घर' बास, हे सारं इस्वच मायं घर हाये आन् माया ह्या खराटा आन हे खापर हेच माये नातलग. आन गणगोत हायेत. चाला, निंघा आता....

**सखुबाई:** बाबू रे ऽऽ

**बळी:** दादा आईकनं रे गड्या.

**कुंता:** ठिक हाये मंग. आमीई जात नाई अथून. तुमी जेथं जासान तथिसा येऊ. पर तुमाले सोडून जानार नाई. कितीकई हाकलसान तरीई नाई....

**डेबू:** आस्सं! ठिक हाये मंग. माया संगत राहाच असिन त् माया कायदा कानून परमानं वागा लागन. मायावानी लोकाईचे काम करा लागन.



फुकटाचं खाले भेटनार नाई. कष्ट करा लागन. गावा गावाले हिंडा लागन.... बोला हाये कबुल?

**बळी:** डेबू दादा म्याई.....

**डेबू:** बळी भौ तुले परवानगी नाई. अजून राजा तुहयं लगीन व्हाचं हाये. मामीजीले सांभायाचं हाये. तुले वापीस जा लागन.... माया हुकम हाये तुले. बबन्या, सोनाजी घेऊन जा याले दापुऱ्याले. एवढी दोस्ती निभवजा मायी. (बळी जोराने रडायला लागतो. सर्व जण रडू लागतात.) अरे रडता कायले? रडल्यानं काई नाई होत. त्या परिस भजन मना... मन हलकं होते. सोनाजी कुठीसा हाय तुयं भजनी मंडय?

**सोनाजी:** हे काय होयतं? अथिसाच हाये. डेबूजी चाल दे न जरा आमाले. मंग आमी सुरू करतो. वाजवारे गडे हो. लय दिवसानं भेटला डेब्या भजनाले... (डेबू मध्ये उभे राहतात. गोपाला गोपाला सुरू करतात.)

**डेबू:** गोपाला ऽ ऽ गोपाला ऽ ऽ देवकीनंदन गोपाला ऽ ऽ ऽ (गजर वाढत जातो. ढोलकी, मृदंगाचे स्वर आसमंतात घुमू लागतात. गजर समेपेवर असतानाच डेबू ते थांबवतात. शांतता.)

**डेबू:** बबन्या, हनमंत्या, मारुत्या, बळी हे इतले लोक अथिसा कायले आले बाऽ ऽ ऽ?

**बबन्या:** किरतन आयकाले ऽ ऽ !

**सोनाजी:** आरे बाप्पा, काय ले म्हजी तुयं भजन आयकाले, कीर्तन आयकाले...

**डेबू:** किर्तनाले, भजनाले का जत्रीत मौज मजा माराले?

**मारुत्या:** अरे बावा, मुद्‌गलाची भक्ती कराले.

**डेबू:** भक्ती कराले का तमाशातली लावनी आयकाले?

**बबन्या:** देवाची भक्ती कराले, पुंजा कराले.

**डेबू:** आस्स ! मंग रिनमोचन म्हनजी काय?

**बळी:** रिनातून मुक्त होनं. रिन फेडनं.

**डेबू:** रिन कोनाचं हाये?

**सर्वजन:** सावकाराचं.

**डेबू:** रिन काह्यले काहाडलं?

**सर्वजन:** कंदुरी कराले, दारू प्याले, लगनाले, बारशाले, तेरवीले.....

**डेबू:** का पुर्ना मायेत जीव द्याले? (शांतता)बोलाना मायबाप हो, बोलाऽ ऽ

**सर्वजन:** पुर्नामायच्या डोहात जीव द्याले. जिनगानीतून मुक्त व्हाले.

**डेबू:** जिनगानीतून मुक्ता व्हाले नाई. त्याले मुक्ती नाई म्हनत. त्याले रिनाच्या पाई जीव देनं म्हनते. म्हनजी आत्महत्या, का काय म्हनतंत?

**सर्वजन:** आत्महत्या.... म्हनतत ऽ ऽ ऽ!

**डेबू:** मंग रिन घेऊन करानं का बा आत्महत्या?

**सर्वजन:** ना ऽ ऽ ऽ ई

**डेबू:** साब्बास ! बरं आपून तिर्थाले काऊन जातो बा?

**सर्वजन:** भक्ती कराले, देवाचा असिरवाद घ्याले.

**डेबू:** असिरवाद घ्याले का नये नये पाप कराले? आपून पाप कराचं अन् देवाच्या उरावर टाकून द्याचं. देवाले धमकावाचं. बोलला नवस का कर ऽ ऽ पुरा, करतं का नाई ऽ ऽ? खरं हाय का खोटं?

**सर्वजन:** खरं हाय ऽ ऽ

**डेबू:** देवयात काऊन जाता?

**सर्वजन:** देवाची पुंजा कराले.

**डेबू:** पुंजा कराले का त्याले येठीस धराले. धरता का नाई? देवयात देव असते का गोट्याची मूर्ती?

**सर्वजन:** गोट्याची मूर्ती.....

**डेबू:** अन देवयात असते देवाचे मालक. हे पंडे, पुजारी ! दान दक्षिणा कोन घेतत?

**सर्वजन:** पंडे, पुंजारी ऽ ऽ ऽ

**डेबू:** त्यायचं पोट पाह्यलं का राजे हो? कसं असते?

**सर्वजन:** ढेर ऽ ऽ ऽ पोट !

**डेबू:** निवद कोन खाते?

**सर्वजन:** ढेर पोटे ऽ ऽ ऽ

**डेबू:** मंग या ढेरपोट्यासाठी पाप करानं का?

**सर्वजन:** नाई......

**डेबू:** कोंबडे -बकरे कापान का?

**सर्वजन:** नाई...



**डेबू:** अशा तिरथाले, जत्रीले येऊन कोनाचं भलं हुईन का?

**सर्वजन:** नाई ऽ ऽ ऽ

**डेबू:** मग बोला ऽ ऽ गोपाला..... गोपाला देवकीनंदन गोपाला (गजर)

**डेबू:** कबीरजी सांगून गेले हाये-
'जत्रामें फतरा बिठाया- तिरथ बनाया पानी
दुनिया भई दिवानी- पैसे की है धुयधानी
दुनिया कितनी बावरी- जो पत्थर पुजे जाये
घरकी चक्की कोई न पुजे- जिसका पिसा खाये'
मंग लोकहो कबीरजी खरं बोलते का नाई?

**सर्वजन:** हो ऽ ऽ ऽ खरं हाये.

**डेबू:** पैयशाची धुयधानी करू नोका, पंडे पुजारायले गब्बर बनवू नोका. देवाचं दरसनच कराच असिन तर रंजल्या गांजल्याले मदत करा. तुकोबाराया म्हनतत् का नाई - 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हने जो आपुले तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा ।' नाई त् जाता टाय कुटत पंढरपुराले, कासीले. जान का बापहो?

**सर्वजन:** नाई ऽ ऽ ऽ

**डेबू:** बोला मंग, गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला
(गजर वाढत जातो.अंधार होतो. झोत डेबूवर, कबिराचं भजन बॅक ग्राऊंडला सुरू होतं.)
'मनलागो यार फकिरी में, बुरा भला... सब को सुन लिजो....
कल गुजरा था गरिबी में, मन लागो यार, फकिरी में ।।'

**अंधार**

# अंक दुसरा: प्रवेश चौथा

(या दृश्यात गाडगेबाबांच्या चार प्रत्ययकारी दृश्यांचा कोलाज आहे. प्रथम दृश्य सुरू होते. पार्श्वध्वनी -'सुनता है गुरुग्यानी, गगन में आवाज हो रही है झिनी SSS झिनी, पहिले आए नादबिंदू से पिछे जमा है पानी.....सब घट पूरन पूर रहया है अलख गुरुकी गुरु वाणी है। झिनी... झिनी...', गाडगेबाबांची भ्रमंती सुरू आहे. भ्रमंतीचा कोलाज.)

**दृश्य- एक**

(गाडगेबाबा फिरत फिरत एका विहीरीजवळ येतात. विहिर मालकास विचारतात)

**डेबू:** का जी अथिसा महाराची इहीर कोनती हाये?

**मालक:** काऊन तू महार होये का?

**डेबू:** नाई बा, म्या त् मानूस होये!

**मालक:** बरं बरं, पे मंग पानी. (पानी पितात, अचानक विहिर मालकाला आठवते.) काय म्हतलं रे तुवा? मानूस? अबे बह्याडा, कोनत्या जातीचा होये तू? महार होये का? असं ईचारलं म्या?

**डेबू:** नाई बा म्या त् महार नाई.

**मालक:** बरं मंग जात काय हाये तूई?

**डेबू:** मांग होनाजी म्या !

**मालक:** मांग? अबे लमचीच्या चल हट, हट अथून. माई इहीर बाटवली लेका.

**डेबू:** गलती झाली जी माय बाप. धुऊन देऊ का जी तुमची इहीर गोमुतरानं.

**मालक:** इहीर कधी धूत असते का बे बह्यताडा?

**डेबू:** मंग काय इहिरीचं पानी बदलून देऊ?

**मालक:** तू काय देव होये का बे? आसं पानी बदलता येते का? देव पाठीवते पानी इहीरीत, लय झरे हाईत आतून या ईहिरीले.

**डेबू:** मालक मग इहीर तुमची कसी जी? हे तं देवाची ईहीर होये ना? देव सांगते का तुमाले त्याच्या इहिरीवर म्हार, मांगाले पानी पेऊ देऊ नोका म्हून.... पानी देल्लं देवानं अन् अथिसा मालक बनले तुमी. व्वा. ह्या कोनता न्याव हाये बाप्पा?

**मालक:** आऽ ऽ ऽ? (आश्चर्यचकित होतो)



'जाती ना पुछो साधु की पुछ लिजिए ज्ञान
मोल कर तलवार का पडा रहन दो मॅन....'

(गाणे पार्श्वभागातून ऐकू येते. प्रकाश झोत मावळतो. दुसरा प्रकाश झोत उजळतो.)

**दृश्य -दुसरे**

**डेबू:** वाढाजी मायबाप. लय भूक लागली हाये मले.

**पाटील:** अबे गयभान्या, धडधाकट हायेना तू? मंग फुक्कटचं खातं का?

**डेबू:** नाई जी, तुमी सांगाच्या अगदूरच पाह्यना तुमचं आखर झाडून टाकलं म्या. शेनोडा, मुतोडा सफा केला, मोऱ्या सपा केल्या. अखिन काई करू का जी?

**पाटील:** बरं, थांबजो, पाटलीन बाई, वाढा याले जरासाक भाकर तुकडा!
(पाटलीन भाकर वाढते.)

**डेबू:** बाप्पा, भाकरच वाढली का जी मले? आन् तेही शिळी.

**पाटील:** आबे, भिकाऱ्यायले भाकरीच देत असते कालच्या उरलेल्या.

**डेबू:** पर पाटील, तुमच्या घरात तं तुपाचा वास येवून राह्यला. पुरनपोया केल्या का जी ?

**पाटील:** हाव, काऊन? गेली का तुई वासना?

**डेबू:** मले पुरनपोयी लय आवडतेजी. पुरनपोया वाढा ना जी!

**पाटील:** बाप्पा, बाप्पा ! तू काय माया जावाई होये का, सासरा? तुले तुपाच्या पुरनपोया वाढू?

**डेबू:** हाव ! तुमी काई समजा, पर मले पुरनपोया द्या. भाकर नाई पाह्यजे मले.

**पाटील:** भिकारी त् भिकारी लेकाचा वरून सिरजोरी, जाय भाकरही नाई देत तुले, चाल निंघ अथून.

**डेबू:** भाकर तुमी खानाजी. पर मले तं तुपाची पुरनपोयीच पाह्यजे. तवरीक जात नाई म्या अथून.

**पाटील:** थांब गयभान्या, पुरनपोयाच देतो तुले अन् त्याय काट्याच्या? (काट्यांनी मारतो. पाटील आत जातो. गाडगेबाबा तेथेच बसून अंगावरील काटे काढतात. थोडा वेळाने पाटील परत येतो.)

**पाटील:** काय करून राह्यला बे अथिसा. इतला झोडपल्यावर. का देऊ अजून दट्ट्या? जाय. काय करतं अथिसा!

**डेबू:** काय करतं?. दिसत नाई काजी? पाह्यना पुरनपोया खाऊन राह्यलो म्या. द्या ना जी द्या ना! अजून चालते मले. पुरनपोया लय आवडते बाप्पा मले.

पाटील: (आश्चर्याने पाहात राहतो.) पाटलीन बाई, वाढा याले पुरनपोई, लय बेसरम दिसते. द्या !

**डेबू:** नाई पाह्यजे बाप्पा आता. पोटं भरलं मायं (ढेकर देतात.) इठोबा तुमचं भलं करो, (जातात)

'रूखा सुखा खाएके, थंडा पानी पियके देख परोंयी चोपडी, मत ललचाये जियो... मन लागो यार फकिरीमें...' ( हे गाणं पार्श्वभागातून सुरू होते. अंधार होतो. थोड्या वेळाने प्रकाश येतो.)

## दृश्य: तिसरे

**किर्तनकरी**:तर मग बोला, ज्ञानदेव तुकाराम ऽ ऽ ऽ

भक्तजनहो, ईश्वर ही शक्ती आहे. त्या शक्तीची आम्ही पुजा केली पाहिजे. पूजा-अर्चा, नैवद्यांनं ईश्वराला प्रसन्न केलं पाहिजे. ईश्वराच्या आशीर्वादानं ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, रेड्यासही बोलविते केले. ईश्वर काहीही करू शकतो. ईश्वराचं नामस्मरण करा. त्याच्या भक्तीत तल्लीन व्हा. म्हणजे पुढला जन्मही सुखाचा मिळेल. पण त्यासाठी तुमाला नाना प्रकारे ईश्वराला प्रसन्न करावे लागेल. हे ध्यानात ठेवा!

**डेबू:** भाकर वाढा हो माय बाप. लय भूक लागली हाये.

**किर्तनकरी:**(विचलित) शिंचा कोन हा, किर्तनात येऊन भाकर मागतो बरे! तर भक्तजनहो, पुण्य करा. पुण्याईची घागर भरा. गावोगावी देवळं बांधा. देवाला नवस करा. म्हणजे तो तुमच्या सकळ इच्छा पूर्ण करेल. तुम्हाला वर देईल. तुमची काळजी घेईल. तुम्हाला वेगवेगळी तिर्थे घडविल. म्हणून पुण्य करा आणि पूण्य कमवा.

**डेबू:** भाकर तुकडा वाढा वो माय बाप. भुक्याले भाकर द्या. लय पुन्याचं काम हाये.

**किर्तनकारी**:अरे कोण हा नास्तिक म्हणायचा? ईश्वराच्या किर्तनात अडचणी आणतो. देवाचा अवमान करतो. अरे ईश्वरासाठी उपास करायचा असतो. पापी कुठला; भाकर मागतो! चल चालता हो येथून! तर भक्तजन



हो आम्ही काय म्हणत होतो बरे! हां, ईश्वर चराचरात आहे. ईश्वर मना-मनात आहे. ईश्वर पूजेत आहे. अर्चेत आहे. ईश्वर नामस्मरणात आहे.

**डेबू:** महाराज! तुमचा ईश्वर भुकेत नाई का जी? भुकेलेल्यात नाई का? उपासी-तापासी मरनाऱ्यात नाई का जी तुमचा देव? म्या लय उपासी हाये, पह्यले मले भाकर द्या, मंग भेटन तुमचा ईश्वर तुमाले!

**किर्तनकरी**:अरे मुर्खा, ईश्वराच्या नामस्मरणात अडथळे आणतो. शिंच्या नरकात जाशील ना नरकात आणि वेड्या देवळात कुणी भाकर आणतो का?

**डेबू:** बाप्पा. असं काय तुमच्या पोथीत लिवलं हाये?

**किर्तनकारी**:बरेच चुणूचुणू बोलतो आहेस. तू काय साधू आहेस होय?

**डेबू:** मी कायचा साधू होय जी? म्या तर चिंध्या होये चिंध्या. कोनी मले खापऱ्या म्हनतत. कोनी गाडग्याई म्हनतत. साधू त् तुमी होय बा, इतले चांगले कपडे, गयात माया. साखरेवानी बोलनं.... महाराज कबीरजीचं एक वचन हाये-

'साधू भया तो क्या भया, माला पहनी चार
बाहर भेस बना लिया, भितर भरा भंगार.'

**किर्तनकारी**:व्वा, व्वा, हुशार दिसतोस. कोणी शिकवलं रे तुला हे?

**डेबू:** कबीरजीनं, तुकोबारायानं....

**किर्तनकारी**:शिंच्या त्यांचे नाव घेऊन भाकर मागतोस. धर्म बुडवतोस. अरे हाकलून लावा रे याला. किर्तनात व्यतय आणून पाप करतो आहे. वरून ज्ञान पाजळतो आहे इथे. अन् आमच्या पोथ्या निकालात काढतो. भडविचा... (रागावतो-किर्तनकारी फणफणतो. राग अनावर होतो. बॅक ग्राऊंडला कबीरचा दोहा ऐकू येतो. गाडगेबाबा जातात.)

'पोथी पढी पढी जग मुआ, पंडित भया ना कोय
ढाई आखर पिरम का, पढे सो पंडित होय.'

## दृश्य : चवथे

(पिंडदानाचे दृश्य. नदीकाठी एक ब्राम्हण यजमानास पिंडदान विधी करवित आहे. गाडगेबाबा ते दुरून बघत आहेत.)

**भटजी:** यजमान, आता पितरास आवाहन करा. पिंडदान सिद्ध झाले आहे. (मंत्र पुटपुटतो. यजमान हात जोडून आकाशाकडे बघत विनंती करतो.)

**भटजी:** आकाशात, आपल्या पुण्याईनं विराजमान झालेल्या हे पितरांनो, माझे यजमान तुम्हास आग्रहाची भक्तीभावे आळवणी करीत आहेत. यावे आणि पिंडदान स्विकारावे. (पुन्हा मंत्र म्हणतो.) बघा, बघा, तुमचे पितर कसे आनंदी, सुखी झाले आहेत. यजमान पितरांनी तुमचे पिंडदान स्विकारले आहे. बघा. (यजमानाला आकाशाकडे बघायला लावतो.)

**यजमान:** पन भटजी बोवा, कावळे नाही ना आले अजून. पिंडाला शिवलेही नाही अजून.

**भटजी:** यजमान, कावळे हे निमित्त मात्र ! प्रत्यक्षात आकाशातून तुमच्या पितरांनी पिंडदान ग्रहण केले आहे. चला आता, त्यांना अर्ध्य द्या. पाण्यानं आचमन करा. (आकाशाकडे पाणी उडवत.) असे हा... असे करा बघू ! (यजमानही आकाशाकडे पाणी उडवतो, नमस्कार करतो. पाण्याबाहेर येतो. गाडगेबाबा नदीत उतरतात. त्यांच्या अंगावर पाणी उडवतात.)

**भटजी:** अरे अरे शिंच्या, अंगावर पाणी काय उडवतोस?

**डेबू:** आंगावर नाई उडवत जी, माया वावराले पानी देतो ना जी!

**भटजी:** वावराला पाणी देतो? बरं कुठे आहे रे तुझं वावर....

**डेबू:** थे कायजी तथी, ईस कोसावर हाये ना !

**भटजी:** विस कोसांवर? वेडा आहेस का तू ? विस कोसांवर हे पानी कसे जाईल बघू?

**डेबू:** बाप्पा, तुमचा ह्या पिंड अभायात पोचते पितरावरी. पानीई धाडलं तुमी अभायात त्यायच्यासाठी, कोट.... कोट.... मैलावर अभायात. मंग ईस मैलावरच्या माया वावरात नाई जाईन का या नदच पानी?

**भटजी:** मुर्खच आहेस, अरे शिंच्या हे क्रियाकर्म आहे. त्याने पितराच्या आत्म्यास शांती मिळते. मुक्ती मिळते. तुला माहित नाही? पितर स्वर्गात जातात. दर्शक्रिया केली नाही तर नरकात जाव लागतं. समजलास?

**डेबू:** नाई बा! कबीरजी त् म्हनतत-

'ना हम नरक लोक जाते, ना हम सरग सिधारते
सब ही करम हमारा किया, हम करमन से ही पून्न कमाते'

हे माहित हाये का तुमाले? नसीनच माहित तुम्हाले! धंदा होय ना तुमचा ह्या. अन तुमीजी पिंडवाले. जित्यापनी खाऊ घातलं का पितराले? का मेल्यावरच करून राह्यले तिरथ- तिरथ.
तुकोबाराया काय म्हनतत्- ते तरी माईत हाये का?
'भुके नाई अन्न, मेल्यावरी पिंडदान, जाऊनिया तिरथा काय तुवां केले'
आता भटालेच नाई माईत त् तुमाले काय ठाव असन म्हना ! वाले व्हा अरे वाले व्हा. देऊ द्या पानी माया वावराले.... (पुन्हा पानी फेकतात. पार्श्वभागातून गाणे सुरू होते. आखर ये तन खाक मिलेगा क्यो जिता मगरुरी मं. मन लागो यार फकीरीमें)

**अंधार**

## दृश्य : पाचवे

(गोपाला, गोपाला देवकी नंदन गोपालाचा गजर होतो. एक एक भजनकरी, श्रोते... गोळा होतात. गाडगेबाबा येतात. किर्तनास प्रारंभ होतो. गोपाला... गोपाला... )

**डेबू:** माय बाप हो, हात वर करून टाया वाजवा. किरतन कसं सिस्तीत झालं पाह्यजे. नाई त् जिभा झडते तुमच्या आन हात गयून पडते. अशा टाया वाजवता, जसे भाकरी थापून राह्यले बाप्पा. हात वर करा, रप...रप.... असा आवाज आला पाहिजे. करा वरतं हात...! मंग बोला गोपाला.... गोपाला.. (गजर वाढत जातो. एक निजाम पोलीस अधिकारी येतो. दरडाऊन विचारतो.)

**अधिकारी:** ए, किधर कू है तुमारा खापरे बाबा, चिंधेबाबा, वो गाडगेबाबा?

**डेबू:** सायब, मैच हू खापरे बाबा, मेरेकुच चिंधेबाबा, गाडगेबाबा म्हणतेत बा लोक. काय काम हायजी मायाशी तुमाले?

**अधिकारी:** देखू बाबा. तहेसिलदार साहेब का हुकम बजाना है. आज इधर कू कोई किर्तन बिर्तन नही होगा।

**डेबू:** मंजूर हाये सायब, नई करुनाजी किर्तन इधर कू. पर एक सवाल इचारू का जनाब तुमाले?

**अधिकारी:** पुछो... पुछो, मगर जल्दी. टैम नही है जादा!

**डेबू:** आप इसलाम धरम के है ना? कुरान वाचत असान, नमाज ही पढत असान?

**अधिकारी:** हॉ. जी हम तू अल्ला तालाह के बन्दे है । यह तो हमारे मजहब का कानून है।

**डेबू:** आयका लोकहो, जनाब इतले मोठे सायब हायेत. पर थेई देवाचे कुरान वाचतत. देवाले नमाज पढतत.

**अधिकारी**: बाबा तूम सही फरमा रहे हो.

**डेबू:** सायब, ये जो आसमान है, जिमिन है, समुंदर हाये, पहाड हाये, नदी हाये, ये सब किसने बनाये?

**अधिकारी**: सारी दुनियाही अल्लाह का करम है। सब अल्लाहने बनाये है।

**डेबू:** एकल्या अल्लानच बनवले का अजूनबी कोई अल्ला हायेत?

**अधिकारी**: अल्ला तो एकही है। सबका मालिक एकही है।

**डेबू:** मंग सायब, अल्लाने सिरफ मुसलमानच बनवले का जी?

**अधिकारी:** नही बाबा, अल्लाने सभी धरम के लोग बनाये !

**डेबू:** लय मिठी बात सांगितली सायब तुमी. आयका माय बापहो, सायब म्हणतात का देव, अल्ला एकच हाईत. हिन्दु, जैन, बुद्ध, सिख, मुसलमान, खिरीस्ताव सारे एकाच बापानं, एकाच देवानं, अल्लानं बनवले हाईत. बोला, मग अल्लाच्या नावानं, गोपाला... गोपाला ऽऽऽ अल्ला आमचा गोपाला (गजर)

**डेबू:** सायब, मै हिंदू नई, मुसलमान नई, मै मानुस हू. पयले मानूस मंग धरम. सारे देव धरम एकच सांगते का नाई?आमी त्यायचे पोर हावोत, औलादी हावोत. सांगते का नाई?

**अधिकारी**: जी हॉ बाबा, बताते है। सबका मालिक एक है ।

**डेबू**: मंग सायब कोनत्यां अल्लानं बा आमाले मनाई केली हाय अथिसा किरतन कराले? आमी त् सायब अथिसा अल्लाचच किरतन करून राह्यलोजी. तरी मनाई करता बाप्पा. सायब, कबीरजीचं एक वचन हाये.

‘न जाने तेरा सायब कैसा है, मस्जिद भितर मुल्ला पुकारे
क्या अपना सायब बहिरा है। चिऊटी के पर नेवर बाजे
वो भी अपना अल्ला सुनता है।’

खरं हाय का सायेब?म्या अडानी मानूस धरमसास्तर मले काई समजत नाई बाप्पा!

**अधिकारी**: पर अपने बहुत दुरुस्त फरमाया बाबा. हमारी समज मे आ गया. अल्ला, भगवान एकही है ।आप अपना किर्तन जारी रख्खो. मै जनाब तहसिलदार साहाब को समझा दुंगा।

**डेबू:** सायब किर्तन त् झालजी आमचं !

**अधिकारी**: क्या कहा ? किर्तन हो गया? कैसे? कहों?

**डेबू:** अथिसाच, बाप्पा ! आत्ताशिकच. तुमीच केलं ना बाप्पा अल्लाचं किरतन. तुमीच सांगतलं ना आमाले का अल्ला- भगवान एकच हाईत. हिन्दु-मुसलमान सारेच त्याईची लेकरं हाईत म्हून. नाई का लोक हो? कसं वाटलं तुमाले सायबाचं किर्तन? बोला मंग गोपाला.... गोपाला... अल्ला नंदन गोपाला(अधिकारी गाडगेबाबाला सलाम, कुर्निसात करतो. तो ही टाळ्या वाजवत उभा राहतो. गजर वाढत जातो. अंधार. कबीराचे दोहा निनादत जातो.)

‘जब हम जग मे पग धरो, सब हसे हम रोय
कबीरा अब ऐसी करनी कर चलो, पाछी हसी ना होये
साहिब मेरा एक है, दुजा कहा ना जाए ।।’

**अंक दुसरा: समाप्त**

# अंक तिसरा: प्रवेश पहिला

**कुंता:** मामीजी, तब्येत नाई का जी बरी? बाप्पा, आंगई कितलं तापून राह्यलं!

**सखुबाई:** काई नाई वं माय. दग दग जरा जादा झाली. डेबूनं किती डाव पाल हलंवला बाप्पा. कोल्हापूर पासून हैद्राबाद पावतर, चांद्या पासून त् बांद्या पावतर.

**कुंता:** मामीजी, मले इस्वासच बसत नाईजी, माया धनी इतला मोठा साधुबाबा झाला म्हून. कितले लोक येतात, त्यायचं किर्तन आयकाले. बोलतत कसं ते फाड-फाडं. लोकायलेई कसे डटावते. पर लोक त्यायलेच पुजते. त्याईचच आईकते!

**सखुबाई:** माय पह्यले त्याच्या मांग फिराले कसूसच वाटे. कोनी देल्लं काई आपल्याले त् तेई हिसकावून घे. डटावेच बाप्पा. म्हने माय फुक्कटच काऊन खातं? काम कराची लाज वाटते काय? पर आता वाटते, म्याच लय नसिबवान हाये, अस्या संताची माय हाये म्या.

**कुंता:** मामीजी, पह्यले त् म्या लय केली जिद. मंग वाटे, जातेत् हे तर जाऊ द्या त्यायले त्यायच्या वाटीनं. पर आता सवय झाली. रोज डोयानं दिसते तरी माया. बरं वाटते. आलोकीची जिम्मेदारी सरली. तिचं लगीन झालं. गोईदाले यायनं मम्मईले पाठवल सिकाले. आता मले काई फिकर नाई राह्यली. जिथं साधूबाबा जातीन तथिसा जाले भेटते. कस्ट कराचं अन् भाकर खाची. पर मामीजी तुमाले झेपत नाईजी आता. तब्येत साथ देत नाई तुमची. तुमी दापुऱ्याले काऊन नाई जात? बळी भौचं लग्न झालं. नई सुनवायरी आली. लहान मामीजीले संगत होईन तुमची !

**सखुबाई**: कायले बाप्पा कोनावर बोझा. अन् तथिसा काय राह्यलं आपलं. मराचं असन त् कुठई मरन येईन. अथिसा डेबू त् दिसते माया डोयानं.

**कुंता:** पर किती दगदग करान. उमर झाली आता तुमची. लय कष्ट केले, दु:ख भोगलं. आता आराम करा. म्या धाडलं हाये बळी भौले बलावनं. येतीन ते. लहान मामीजी लय याद करते मने साऱ्यांयची.

**सखुबाई:** पर डेबू-

**कुंता:** सांगू नोका त्यायले. पर त्यायनच सांगलं मले. मायचा तरास पहावत



नाई त्यायले. मायची फरफट थांबवाची हाये म्हने. आन् खरं सांगू का मामीजी? बळी भौ ले त्यायनच निरोप धाडला हाये.

**सखुबाई:** बरं, बाप्पा! डेबू म्हनत असीन त् जातो म्या. त्याले कोन नाई म्हनन. पर कुंते माया जीवाचं आता काई खरं नाई बाप्पा. कुडीतला जीव कई उडून जाईन त्!

**कुंता:** मामीजी साऱ्यालेच जा लागते. दुख कायले करता? पर तुमच्या जलमाचं सारथक झालं. इतल्या मोठ्या साधुबाबाच्या तुमी माय झाल्या. आता कायचीच कायजी करू नोका. सुखानं जाजा दापुऱ्याले!

**सखुबाई:** आन तुय मायबाई, कसं हुईन?

**कुंता:** जलमाची दोरी हाय बांधलेली. कसी तुटनजी? जथी ते तथी मी. आता मलेतं सवय झाली जी या फिरत्या पालाची. माई काई कायजी करू नोका. (तिडके सावकार येतात.)

**सावकार:** सखुबाई, रामराम करतो जी !

**सखुबाई:** कोन होय बाप्पा.

**सावकार:** वयखलं नाई मले?

**सखुबाई:** नाई बाप्पा, म्हतारी झाली नाजी.

**सावकार:** मी होय, दापुऱ्याचा बनाजी तिडके सावकार!

**कुंता:** सावकार ? अथिसा?

**सखुबाई:** बनाजी सावकार. काहून येनं केले बाप्पा अथिसा? अता त् काई नाई केलं डेब्यानं.

**कुंता:** बळी भौ न? ..... मंग.

**सावकार:** मले.... मले माफी मांगाची हाये.

**सखुबाई:** काऊन बाप्पा? आम्हाले काऊन?

**कुंता:** माफीचं मांगाची असन त् त्यायलेच मांगा. जुलूम त् त्यायचेवरच केला होता ना?

**सावकार:** मले पश्चात्ताप हाये. इतल्या मोठ्या साधुबोवाले आपन तरास देल्ला. म्या लई किरत आयकली डेबूजीची. कितले घाट बांधले. धरमशाया बांधल्या, शाळा, गोरक्सन, वसतिगृह, अनाथालय बांधले, कितलं पुन्याचं काम केलं डेबुजीनं. ते सद्गुरु झाले हायेत जगाचे. मायं पाप मले धुवून

काढाचं हाये.

**कुंता:** अजी पर थे तं नाई अथिसा. त्यायचा काई ठाव ठिकाना असते का?

**सावकार:** मंग कुठीसा भेटन?

**कुंता:** सांजच्याले गावाच्या पारावर किर्तन हाये त्यायचं. तथिसाच भेटतीन थे.

**सावकार:** ठिक हाये ही लहानसूक भेट ठिवा मायाकडून.

**कुंता:** काय होये जी?

**सावकार:** पैसे हायेत थोडेसेक.

**सखुबाई:** अरे बाप्पा! सावकार, कायले पाप वाढवता बाप्पा.

**कुंता:** आमी कोनाकून काई घेत नसतो. हुकूम हाये यायचा. कष्ट करतो अन् मंगच खातो. काई नुपूर नाई आमाले.

**सावकार:** तुमचेच हाये हे पैसे, हेच्यावर तुमचाच हक हाये. बळीनई नाई घेतले. म्हनला, ज्याच्या मेहनतीचे हाये त्यालेच द्या सावकार. म्हून आलो बाप्पा.

**सखुबाई:** सावकार, त्यालेच भेटा बाप्पा तुमी. त्यालेच माफी मांगा, अन् पैसेही त्यालेच द्या. आमाले या फसकटात पाडू नोका.

**कुंता:** मामीजीचं आयका, त्यायले भेटजा!

**सावकार:** बरं ! (अस म्हनत सखुबाई, कुंताच्या पाया पडायला लागतात...)

**सखुबाई:** काय करता बाप्पा, नरकात धाडता काजी आम्हाले?

**कुंता:** अजी, ते साधू असूनई कोनाले पाया पडू देत नाई. आमालेई सांगुन ठिवलं हाये, कोनाले पाया पडू द्याचं नाई म्हून. त्यायले कयलं त् नराज होतीलनाजी ते !

**सावकार:** डेबूजी, माफ करा मले, माफ करा. म्या पापी हाये पापी, तुमी माफी देल्ल्या बगैर मले मुक्ती नाई भेटनार.... (पश्चाताप करत जातात)

## अंधार

(किर्तनाचे सूर कानावर पडतात. प्रकाश येतो. गाडगेबाबा किर्तन करीत आहेत. गजर वाढतो आहे.)

**डेबू:** मायबापहो... अग्यान, असिक्सन, अंधईस्वास, जातीभेद, मानसाचे दुस्मन हायेत. मुक्या जनावराले तरास देनं, कोंबडे-बकरे कापनं, देव देवस्की करनं, तिरथाले जानं, आत्म्या परपंचाच्या जंजायात पडनं, म्हनजी जिनगानीची धुयधानी करनं होये. मातामाय, मरिमाय, जाखाई, जोखाई,



भैरोबा, मसोबा, कोनाचंच भलं करत नाई. गंडे, धागेदोरे, अंगारा, धुपारा, भगत, तांत्रिक, मांत्रिक यायच्या फंदात पडू नोका. गोट्याचा देव कोनाचा होत नाई. देव हाये आंधया, पांगयात, लंगड्या लुल्यात, रंजल्या गांजल्यात, त्यायची भक्ती करा. बोला मंग गोपाला.... गोपाला.... देवकी नंदन गोपाला(गजर वाढत जातो.)

**डेबू:** माय बापहो महामारी लय मोठी रोगराई हाये. मंग तिले घरात आनान का?

**सर्वजन:** नाईऽ ऽ ऽ

**डेबू:** महामारी कायच्यानं येते?

**सर्वजन:** असोच्छतेनं, पुंजान्यानं, डबक्यायनं !

**डेबू:** मंग पुंजाने ठेवान काय? डबके तसेच ठिवानं काय?

**सर्वजन:** नाई ऽ ऽ

**डेबू:** मंग काय करान बापहो?

**सर्वजन:** कचऱ्याचे पुंजाने सफा करू, गांव झाडून काढू, गटारं, मोऱ्या सफा करू, डबके उपसून सोच्छ करू, घरातला गिधाडा साफ करू, घरातला धुल्डा साफ करू, हागोडा, मुतोडा, शेनोडा सफा करू.

**डेबू:** वारे पठ्ठे व्वा. बोला मंग गोपाला... गोपाला... ऽ ऽ ऽ (गजर)

**डेबू:** लोक हो, अग्यानं म्हणजे मोठं पाप हाये. तुम्हाले हे पाप कराच हाये का? करानं त् नरकात जासान, मंग हे पाप करान का?

**सर्वजन:** नाई ऽ ऽ ऽ

**डेबू:** मंग का करान?

**सर्वजन:** सिक्सन घेऊ. पोराबारायले साळेत घालू.

**डेबू:** इद्या मोठं धन हाये. सिका, सिकवा, अन् शायने व्हा. लोक गरीबीत काहून रायते? त्यायले इद्या येत नाई. बगैर ईद्या मानूस म्हनजी खटाऱ्याचा बैलच हाये राजेहो. मंग खटारे बैल व्हान का? (तिकडे सावकार येतात. लोकात मिसळून बसतात.)

**सर्वजन:** नाई ऽ ऽ

**डेबू:** रिन काढून तिरथाले जाऊ नोका, पोरा बारायले सिकवल्या बगैर राहू नोका. देवाले नवस बोलून कोंबड्या बकऱ्यायले कापू नोका, हुंडा घेऊ

नोका, अन् देऊई नोका. सिवासिव करू नोका. दारू पिऊन गटारात लोळू नोका, तरच तुमची जिनगानी तरुन जाईन. नाईत बुडून मरान, सडून मरान, मंग बुडून, सडून मराच हाये का?

**सर्वजन:** नाईऽ ऽ

**डेबू:** बह्यताडे वा... फकस्त नाई ऽ ऽ ऽ नाई ....च म्हनान का?

**सर्वजन:** नाई ऽ ऽ ऽ

**डेबू:** मंग बोला गोपाला... गोपाला..... म्हना लय जोरानं ऽऽऽ

**सर्वजन:** गोपालाऽ ऽ ऽ गोपाला, देवकीनंदन गोपाला (गजर)

**डेबू:** माय बाप हो, आंब्याची कोय लावली त् काय उगवते?

**सर्वजन:** आंबा.

**डेबू:** बाभईच्या बिया लावल्या त् काय ऽ ऽ ऽ

**सर्वजन:** बाभूय ऽ ऽ

**डेबू:** बह्यताडे हो, बाभईच्या बिया पेरता अन् आंब्याची वाट पाह्यता, अरे जसं पेरानं, तसं उगवनं, जसं करानं तसं भरानं.... कबीरजीचा दाखला हाये. बोया बीज बभूल का आम कहासे आये, खरं हाय का नाई?

**सर्वजन:** खरं हाये ऽ ऽ ऽ बोया बीज बभूल का, तो आम कहा से आये. खर हाये

**डेबू:** बाप्पा, बाप्पा.... तुमी तं लय संतासारखे बोलून राह्यले. मंग साधू संतासारखे वागा. मानूसकीले मोठं करा. तुमीई सुधरा. अन् लोकाईलेई सुधारा. बोला मंग गोपाला... गोपाला... देवकी नंदन गोपाला... (गजर सुरू होतो, वाढत जातो. अचानक लोकातून तिडके सावकार उठतात. धावत जाऊन गाडगे बाबांचे पाय धरतात.)

**सावकार:** डेबूजी, मले माफ करा, डेबूजी मले माफ करा.

**डेबू:** अरे वाले वा, वाले वा. पाया पडून काहून मायावर पाप चढवता जी? चाला वाले वा ! आता पाय सोडता का दिऊ रट्टा?

**सावकार:** डेबूजी रट्टा द्या नाई तं फासावर चढवा. पर मले माफ करा. नाई त् मले मुक्ती नाई भेटनार !

**डेबू:** अजी तुमी कहाले माफी मांगता बाप्पा?

**सावकार:** डेबूजी, तुमी मले वयखलं नाई?

**डेबू:** (शांतता... निरखून पाहतात स्मित करतात) बाप्पा... बाप्पा....! आकरीतच घडलं बा ! तिडके सावकार होय ना ! अजी तुम्हाले कोन वयखनार नाई? इतला मोठा मानूस, वाघासारखा अथि येऊन माया पाया पडता?

**सावकार:** डेबूजी....

**डेबू:** आता म्या कोनती भूल केली बा तुमची तुमचं रिन घेतलं नाई. का पावत्या मांगतल्या नाई? का हिसाबई मांगतला नाई. आन हौ, तुमच्या वावरात नांगरई धरला नाई? मंग काहून आले बा अथिसा?

**सावकार:** मले परायश्चित कराचं हाये? मायं पाप धुवाचं हाये. मनावरचा बोझा कमी कराचा हाये.

**डेबू:** बाप्पा, असं कोनतं पाप केलं जी तुमी?

**सावकार:** डेबूजी, लोकाईले लालचीन रिन देल्लं. त्यायचा जमिन जुमला हडपला. खोटा हिसाब करून वावरायसाठी अंगुठे घेतले. लोकायले घोड्याच्या पायाखाली देल्लं. लोकायले लुटलं... पर आता उपरती झाली. हे पाप हाय... ह्या नरकाचा रास्ता हाय.

**डेबू:** पाहा, लोकहो इतला मोठा सावकार माफी मांगते. परायश्चित करते. त्यायले पश्चात्ताप होऊन राह्यला. याले मनते मानूस. असा बदलते मानूस. कबीरजी म्हनतत-

> 'दया धरम का मूल है, पाप भूल संताप
> जहाँ क्षमा तहाँ धर्म है। जहॉ दया तहाँ आप है।'

तवा यायले समा कराची का? (शांतता) आरं बोला ना? (सर्व एकमेकांकडे पाहतात होय म्हणून संमती देतात) मंग बोलाना.

**सर्वजन:** हाव ऽऽऽ

**डेबू:** बोला मंग, गोपाला... गोपाला... (गजर)

**सावकार:** डेबूजी माया जनम सारथकी लागला, माई एक इंनंती हाये. तुमी इतलं मोठं काम करता. त्यासाठी मले तुम्हाले मदत कराची हाये. (पैशाची थैली पुढे करतो)

**डेबू:** काय होय बा हे?

**सावकार:** दान समजा, भेट समजा. पर हे ठेवा. अन मले असिरवाद द्या.

**डेबू:** मले कायले देता बाप्पा? तुमचं तुमीच ठेवा, गरिबाले वाटा... त्यायले मदत करा... त्यायचं रिन माफ करा. घाट बांधा, गोरक्षण बांधा !

**सावकार:** कबुल डेबूजी कबूल ! माई एक ईनंती हाये तुमी एकदा रिनमोचनले या... तुम्हाले आवतन हाये.

**डेबू:** तुमचं आवतन हाये सावकार, नाई कसं म्हनू. पर पह्यले असं करा.... आंधी रिनमोचीनचा घाट बांधा... मंगच येईन मी तथिसा, बांधान का?

**सावकार:** डेबूजीचा हुकूम! लगेच कामाला लागतो. तुमी याच्या पह्यलेच घाट बनून तयार ठेवीन. पर तुमी येजा डेबूजी !

**डेबू:** लई उपकार होतीन सावकार तुमचे. पर काम लोकायवर सोडू नोका. तुमी सोता पाह्यजा. पैस्याचा हिसाब चोख ठिवजा. माल चांगला लावजा. लोकायचं काम हाये, जनता जनार्दनाचं काम हाये. बेस झालं पाह्यजे. बोला मंग तिडके सावकार की.....

**सर्वजन**: जय ऽ ऽ ऽ

**डेबू:** गोपाला... गोपाला... (गजर वाढत जातो.)

**अंधार**



# अंक तिसरा: प्रवेश दुसरा

(गांगण, अच्युतराव बोलत बसले आहेत. कुंताबाई आत झोपडीत आहे.)

**अच्युतराव**: काहून गुमसूम बसले गांगणबुवा, काय विचार करून राह्यले?

**गांगण**: अच्युतराव, अख्या महाराष्ट्रात बाबांनी किती मोठं काम उभारलं. धर्मशाळा, गोशाळा, वसतीगृह, किती घाट बांधून घेतले. शाळा बांधल्या, अन्नछत्रे, पानपोया, पुल बांधले. पन कुठच गाजावाजा नाही केला त्यांनी.

**अच्युतराव**:खरं हाये, गांगन बुवा. लोकाले जागवण्यासाठी त्यायचे किर्तन सुरू आहे. लोकांना सुधरावयाची त्यांची धडपड जारीच आहे. त्यांच्यामुळं कोंबडे-बकरे कापन्याची, नवस बोलायची प्रथा संपू लागली आहे. माय माऊल्या पोराबाळांना शिकवासाठी पुढं येऊन राह्यल्या. पन अजूनही पाह्यजे तसी सफलता येऊन नाई राह्यली. लोक किर्तनात ऐकतत.... अन् घरी जाऊन विसरून जातत. बरं बाबा हारले नाही का थांबले नाई.

**गांगण**: अच्युतराव, बांबाच्या कामाचा व्याप वाढतो आहे. त्यांचा गैरफायदा घेणारेही वाढत आहे. यशवंत बुवाचं प्रकरण माहितच आहे तुम्हाला. तरी बाबा ओरडून सांगतात- 'माझा कोणी शिष्य नाही अन् मी कोणाचा गुरु नाही' तरी यशवंत बुवानं आपलीच मर्जी केली. आपण एकटेच गाडगेबाबांचे शिष्य असल्याची घोषणा केली. स्वार्थ, लालूच, मोह आणि सत्ता यांची हाव दुसरं काय? मठपती बनले होते. आयुष्यभर बाबांनी जे झिडकारलं, तेच त्यांच्या पुढ्यात यशवंतबुवांनी वाढून ठेवलं. वाईट वाटतं ते याचं.

**अच्युतराव**:अलिकडे बाबाचं गणगोतही हेच करून राह्यलं. जवळचेच लोक आहेत. बाबाची मुलगी आलोकाबाई, जावई फकीरजी आले होते. मुर्तिजापूरात हक्क सांगाले. बाबांना कळताच बाबांनी काढलं त्यांना बाहेर, बाबा इतका निर्लेप, निर्मोही मानूस साऱ्या जगात सापडणार नाही. पण बाबांना मनापासून कोनी समजून घेत नाही.

**गांगण**: तोच विचार मी करतो आहे. लोकांच्या आग्रहाखातर गाडगेबाबा मिशन स्थापन करायला बाबांनी परवानगी दिली. इतका मोठा व्याप सांभाळायला लोकही निर्मोही, निर्लेप असले पाहिजे. बाबांच्या विचारांना मानणारे.

त्यांचे विचार कृतीत आणणारे लोक मिळतील का अशी मला चिंता सतावते आहे.

**अच्युतराव:** गांगणबोवा, बाबांचा धर्म रोकडा आहे. कर्म ही रोकडे आहे. बाबांची तऱ्हाच न्यारी आहे. पर स्वार्थी, आत्मकेंद्री, कर्मठ, परंपरावादी लोक बाबांच्या विचारांना भेतात. एवढंच नाई बाबांनाही भितात. पर गरीबांना, दीन-दुबळ्यांना बाबांची हिंमत आहे.

**गांगण:** आता बाबाचं वय होत चाललं आहे. त्यांची चिंता वाटते. अजून त्यांना खूप काम करायची आहेत. पण पुन्हा तेच.... आपलीच माणसं अडथळे आणतात. हे सारं बघूनच माझी काळजी वाढली आहे अच्युतराव.

**अच्युतराव**:गांगण बुवा, हे चालणारच. आपन आपलं काम चोख करत राहाच. पन नाई म्हणायले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, तुकडोजी महाराज, केशवराव ठाकरे, अत्रे अन् हौ भाऊराव पाटील. आपले मुख्यमंत्री खेर साहेब बाबांच्या कार्याच्या पाठीशी आहे ना !

**गांगण:** अरे हो अच्युतराव, आजच डॉ. आंबेडकरांचा निरोप आला आहे बाबांसाठी, ते भेटीला येणार आहेत. बाबांना लवकर कळवायला पाहिजे.

**अच्युतराव**: गांगणबुवा, बाबासाहेबाना खूप मानतात बाबा. साऱ्या किर्तनात त्यांचा विषय राहतेच. सिक्सनाचा बाबांचा खरा विचार तर साऱ्या दलित समाजात बाबासाहेबांनीच नेला आहे.

**गांगण:** अगदी खरं आहे. शिक्षणाचा प्रश्न बाबांनी फारच मनावर घेतला आहे. मागे नाही का भाऊराव पाटलांच्या शाळेचे अनुदान सरकारने रोखले होतं. तेव्हा बाबांना कळताच त्यांनी मुख्यमंत्री खेर साहेबांशी भेटून अनुदान सुरू करून दिलं. बाबांना शिक्षणाविषयी फारच कळवळा आहे. पण त्यांच्या मुलाला गोविंदरावांना ते खूप नाही शिकवू शकले. शिकायला मुंबईत असतांना कुत्रा चावल्याने त्याचा मृत्यू झाला. (कुंता बाई येतात.)

**कुंता:** गांगणबुवा, साऱ्या समाजानं सिक्सन घ्यावं असं त्यायले वाटते. गोईंदा मुम्मईले सिकाले गेला, तवा लय बेस वाटलं होतं यायले. पर त्याची जिनगानी तितलीच होती. गोईंदा गेल्याचा परसंग मले अजूनई आठवते.



यायचं किर्तन सुरू होतं. सांगावा आला, तवा मायावरतं अभायचं कोसयलं. पर बाबानं किरतन नाई थांबवलं. लोकाईले इतलच म्हनले, 'राम गेले, किरीश्न गेले, असे गेले कोट्यानुकोटी,काय रडू एकल्यासाठी' आन पुन्ना गोपालाचा गजर सुरू ठेवला. दुखावर ईजय मियवता येते त्यायले. सखु मामीजी गेल्या, तवाई असच झालं, त्यायचे डोये वाट पाहून थकून गेले, पर आपले साधुबोवा मामीजीले भेटाले नाई गेले. तिले निरुप धाडला. 'माय तुया सारख्या लय माय माऊल्यायले डेब्याची गरज हाये. त्यायचा आसिरवाद तुले मियन. आता तू राजीखुसीनं जीव सोड.'तवा मामीजीनं आखरचा सास घेतला. गांगनबुवा लय मोठी कायनी हाये आमची.(गाडगेबाबा येतात)

**गाडगेबाबा:** कायच्या एवढ्या गोठी सुरू हाये बापहो, अन् कुंते तू कायची कायनी सांगत बसली माय मायले. कामाचे लोक हायेत हे. गांगनबुवा, अच्युतराव, कामधंदे सोडून कायले बसले बापा अथिसा. अच्यूतराव आनला का सारा हिसाब गोरक्षनाचा. गांगनबोवा, मिसनचाय हिसाब दाखवा मले. लोकायचं धन हाये बाप्पा थे.

**गांगण:** सारा हिशोब जातीनं चोख ठेवला आहे मी.

**अच्युतराव**:बाबा मी ई सारा हिसाब कसून लिहिला आहे.

**गाडगेबाबा**: बेस हाये मंग. लोकायचा ईस्वास कायम राहयला पाह्यजे.

**गांगण:** बाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निरोप आला आहे. तुम्हाला सांगायला निघणारच होतो मी.

**बाबा:** डाक्तर सायबाचा?

**गांगण**: तुमच्या भेटीला निंघाले आहेत ते महत्वाचं काम आहे, म्हणे त्यांना.

**बाबा:** डाक्तर सायबाले काय काम पडलं असीन बा? थेच येऊन राह्यले अथिसा. इतल्या कामाचा माणूस....(कुंताबाई आत जातात)

**गांगण:** ते तर नाही माहित बाबा.

**बाबा:** अरे पन त्यायनं निरोप धाडला असता तू म्याच गेलो असतो ना बाप्पा भेटाले. गांगन बोवा, लय काम हाये त्यायच्या मांग, मी काय रिकाम टेकडा मानूस बाप्पा, बरं कवा येनार हाईत?

**गांगण:** बस पोचतीलच ते आता एवढ्यात आणि दुसरं म्हणजे बान्दा पोलिस

चौकीचे ठाणेदार येऊन गेले. पोलीस लाईन मध्ये तुमचं कीर्तन ठेवलं आहे त्यांनी.

**बाबा:** गांगणबुवा, आमची तब्येत नाई राहत सुधी, कसं होईन?

**गांगण:** मी खूप सांगितलं त्यांना बाबा. ते ऐकतच नव्हते. ते म्हणाले कीर्तन नाही केलं तरी चालेल पण बाबांचे पाय एकदा आमच्या पोलीसलाईनीला लागू द्या.

**बाबा:** बरं, बरं, मंग जाऊ बाप्पा. पोलीस आमचे मायबाप हायेत. जाऊ आपन. जा तुमी निंघा. आता कामाले. येळ कमी हाय बापहो.

**दोघेही:** बरं बाबा, जातो आम्ही (जातात. बाबा सुई दोरा घेऊन ठिगळ लावत बसतात. थोड्या वेळाने डॉ. आंबेडकर येतात.)

**डॉ.आंबेडकर:** काय करता बाबा?

**बाबा:** डाक्तर सायब, याना बाप्पा याना...कसी फुरसत भेटलीजी तुम्हाले?

**डॉ.आंबेडकर:**बाबा, कामचं तसं होत. तुम्हाला भेटल्याशिवाय चैन पडत नव्हता.

**बाबा:** डाक्तर सायब, हुकम कराचा होता बाप्पा, म्याच हजर झालो असतो.

**डॉ.आंबेडक**र:मन नाही मानलं बाबा. म्हणून मीच तुम्हाला भेटायला आलो?

**बाबा:** बोलाना जी काय म्हनता बाप्पा?

**आंबेडकर**:खूप दिवसांचा मनात गोंधळ सुरू आहे, पण निर्णय घेता येत नाही.

**बाबा:** कायचा निरनय जी? मले काई समजलं नाई बाप्पा?

**आंबेडकर**:बाबा, मी शपथ घेतली होती, मी हिन्दु म्हणून जन्मलो, पण हिन्दु म्हणून मरणार नाही, आता वेळ आली आहे. माझ्या दलित बांधवासह धर्मातंर करण्याची. निर्णय मी घेतला आहे. पण कोणता धर्म स्विकारायचा तोच निर्णय होत नाही.

**बाबा:** डाक्तर सायब, परसंग त् मोठा बाका हाय, पर म्या अडानी, अग्यानी मानुस, मी काय सांगूजी?

**आंबेडकर**:बाबा, समाजाला तुम्ही कबीरजी सांगता, तुकाराम सांगता. लोकांना पटते ते. कारण तुम्ही सत्य सांगता, रोखठोक सांगता, पर खरं सांगता. मलाही सांगा.

**बाबा:** डाक्तर सायब, तुमी सिकली सवरली मानसं. कितले बुक वाचता, कितले बुक लिहिता. समाजाले तुमी दिसा दाखवता. खालच्या समाजाले तुमी वधरं आनलं, गुलामीतून मोकयं केलं. आता असा धरम निवडा जो या समाजाले समोर नेईन.

**आंबेडकर**:बाबा, मला असा एक धर्म दिसतो. तो म्हणजे महामानव गौतम बुद्धाचा बुद्ध धर्म.

**बाबा:** डाक्तर सायब, बेस हाये. निर्णय झाला, आता येळ दवडू नोका, बुद्ध धरमच तुमाले, समाजाले दिसा दाखवन, पुढं नेईन. नावं न घेता बाप्पा, आमी बुद्धाचेच वारकरी हावोत. कबीरजीच्या पंथाचे आहोत, डाक्तर सायब, तुमचा निरनय एकदम बेस हाये. आता पिछाडीवर येऊ नोका. सारा समाज तुमचा जयजयकार करन बाप्पा !

**आंबेडकर**:बाबा, तुम्ही माझ्या मनातलं ओळखल. मला मार्ग दाखवला. बाबा मी व्यथित होतो. दलित समाजाला हिन्दू धर्मानं कधी आपलं मानलचं नाही. शुद्र बनवून परिघाबाहेरच ठेवलं. अन्याय, अत्याचार, शोषण, छळ, कपट, जातीभेद, अस्पृश्यता, शिवाशिव सारं भोगलं माझ्या समाजानं. आता मला त्यांना या साखळदंडातून मुक्त करायचे आहे. बाबा, या समाजासाठी तुम्ही केलेलं काम, कष्ट मी विसरलो नाही. तुमचे ऋण मी आन् माझा समाज कधीच विसरणार नाही. येतो बाबा मी.

**बाबा:** डाक्तर सायब, तुमच्या रुपात एक नवा सूर्य पाह्यला म्या. या साऱ्या जगाले उजाडून टाका.

(बुद्धम् सरणम् गच्छामी च्या पार्श्वसंगीताचे स्वर...)

**अंधार**

# अंक तिसरा: प्रवेश तिसरा

(स्थळ : वांद्रे पोलिस स्टेशन. दि. ८ नोव्हेंबर १९५६, गाडगेबाबांचे अखेरचे कीर्तन सुरू आहे. गोपाला .... गोपाला.... चा गजर सुरू होतो.)

**बाबा:** तुकाराम महाराज सत्पुरुष. जगाले उपदेस करतत. चार वेद केले म्हणे बरहम्म देवानं. अन् पाचव्या वेदाची वानी केली तुकोबारायानं. मानसाईचा वेद, मानुस धरमाचा वेद, मानसायलेच ते वेद म्हनतत, अन् मानसायलेच देव. तुकोबारायांचा सोताचा पुरावा हाये.

देव पहावयासी गेलो ऽ ऽऽ ऽ
अन- तेथे देव होवोनी ठेलो ।।

लोकहो, देव कसा असन....? देव कधी भेटील, देव कधी पाहू? अशा ज्या मानसाच्या मनात कल्पना असतीन, तो मानूस भर्मिष्ट! पुर्थई पैदा झाली, तव्हा पासून देव कोनी पाह्यला नाई, देवयात देव, नदीवर देव, इकडे देव, तिकडे देव, रामेस्वर देव, बद्रीनारायण देव, ह्या देवाचा बाजार हाये. देव कोनी पाह्यला नाई.

अन् थो कोनाले दिसनार नाई, बोला...
गोपाला .... गोपाला... देवकी नंदन गोपाला....

देव कसा हाये? जसं वारं, ग्यानेस्वरीत पुरावा हाये-
वायुवसे संकळ ठाऽ ऽयी, परी त्याचे बिऱ्हाडची ना ऽ ऽ ई ।।

वारं हाये ना वारं, तसा हाये देव, कुठी एका ठिकानी त्येचा मुक्काम नाई. ते लाल नाई. पिवया नाई का हिरवा नाई. तो कोनत्याच ठेसनावर मुक्काम करत नाई. अन् तुमी त्याले तिरथात बसवता, तिरथात. हे पोट भरनाऱ्याईचे देव हाईत ! हे देवच नाईत, तरी लोक देव-देव करतात अन् तिरथाले जातत. तुकोबा म्हणतत देव देव करता शिनले माझे मनऽ! मंग तुकोबा रायाले काय दिसलं असीन. दगडाचा देव अन् गंगेचे पानी. पानी अन् पाषान तेथे ऽ ऽ ऽ ! कबीरजी ही पुरावा देतत-

दुनिया भई दिवानी, पैसेकी धुलधानी ऽ ऽ ऽ!

मग लोक हो, जासान तिरथाले? करसान का धुयधानी पैशाची? जत्रेत देव नाईऽ ऽ तिरथात देव नाई ऽ ऽ! दगडात देव नाई ऽ ऽ तुकोबा



म्हनतत-

दगडाचा देव बोलील तो कैसा, कवन काली वाचा फुटिल- त्याऽ ऽ ऽसी बोला मंग गोपालाऽ ऽ ऽ गोपाला ऽ ऽ देवकीनंदन गोपाला. अज काय आहे अथिसा. पुलिस लायनीत?

**सर्वजन:** पू ऽ ऽ ऽ जा !

**बाबा:** सत्यानारायीन हाये काय?

**सर्वजन:** सत्यनारायीन !

**बाबा:** सत्यनारायीन देवाची भक्ती नाई. सत्यनारायी पोथीत असं लिवलं हाय. एका वान्यानं सत्य नारायणाचा परसाद नाई घेतला, सत्यनारायीन नाई केला. त्याची करोडो रुपयाची नौका पान्यात बुडाली ऽ ऽ ऽ ! तवा त्यानं अडीच रुपयाचा सत्यनारायण केला अन् परसाद वाटला त् त्याची करोडो रुपयाची नौका वर आली.

**बाबा:** खरं हाय का?

**सर्वजन:** नाई!

**बाबा:** खरं हाय का?

**सर्वजन:** नाई !

**बाबा:** लढाईच्या साली पन्नास पन्नास कोट रुपयाच्या आगबोटी, नौका बुडाल्या हाय. सत्यनारायीन करणाऱ्या महाराजाले म्हनावं. अडीच रुपये काय? अडीच लाख रुपये घ्या. अडीच कोट रुपये घ्या. समुन्दराच्या किनाऱ्यावर एक सत्यनारायीन करा. अन् एक आगबोट वधर आना. जमन का?

**सर्वजन**: ना ऽ ऽ ई, गोपाला.... गोपाला... देवकीनंदन गोपाला...

**बाबा**: अरे वरतं हात करा बाप्पा. वर हात करून टाळ्यां वाजवा. वर हात कऱ्याची लाज वाटते का तुमाले? लय अभिमान हाय तुमाले. म्हून हात वधर करत नाई. काय ले हात कराचे बा वधरं, हा कोन होय सांगनारा, असं तुमचं मन म्हनता का नाई? अभिमान सोडा राजेहो, तुकोबा म्हनतत-

ज्याचा अभिमान -गेला ऽ ऽ ऽ
अन् तुका म्हने तो देव झाला ।।
हो ऽ ऽ ऽ अरे बन्दे करना मत अभिमान, नई तो कोई दिन उखड जाएगा, प्रा ऽ ऽऽन।।

मानूस कुठीई जाईल. तो आपल्या दिमाकातच त्याले वाटते का मले मरन येनार नाई. रोगही होनार नाई ऽ ऽ कोनाले पहिलवानीचा, कोनाले पैशाचा तर कोनाले अंमलदारीचा अभिमान असते. ज्याच्या अंगात हा अभिमान नसते, तोच देव होते. होते का नाई ?

**सर्वजन:** होते ऽ ऽ ऽ बोला मंग. गोपाला... गोपाला देवकीनंदन गोपाला (गजर)

**बाबा:** आपल्या हिन्दुस्थानाले मोठा एक डाग हाये. तो डाग धुवून काढाचा परयत्न करा. तो डाग कोनता हाये? शिवाशीव ऽ ऽ काय करशील.

**सर्वजन:** शिवशीव ऽ ऽऽ

**बाबा:** तू कोन? जात पुसतो. ज्याच्या अंगात जातीचा अभिमान हाये तो जात पुसतो. कोन आहा तुमी?

**सर्वजन:** मानू ऽ ऽ स.

**बाबा:** जात पुसनाऱ्याले सरम नाई वाटत मानसासारखा मानूस याले काय चार हात, चार पाय हाये?

**सर्वजन:** ना ऽ ऽ ई.

**बाबा:** ह्या जातपुस्या काय तोंडातून पडला, का बगलीतून निंघाला. तरी जात पुसते. अरे मानसाच्या जाती दोनच. बाई अन् पुरुस. तिसरी जात हाये का?

**सर्वजन:** ना ऽ ऽ ई.

**बाबा:** मानसाचं रगुत एक, दातई बत्तीस. याले का संभर दात हाये? का ह्याच्या रक्ताचा रंग हिरवा, पिवया, निया हाये? आईच्या पोटात मानूस किती दिस राह्यते.

**सर्वजन:** नऊ महिने, नऊ दिवस ऽ ऽ ऽ

**बाबा:** मंग हा जातपुसऱ्या वज्जर संभर दिवस राह्यला मनावं? हिन्दुस्थानले हा डाग हाये डाग ऽ ऽ सिवा सिव काढा, जाती सोडा, अभिमान सोडा, सहाने व्हा... मानूसपन पैदा करा. बोला ऽ ऽ
गोपाला.... गोपाला... देवकीनंदन गोपाला ।।
जोतीबा फुले सांगतत-
इद्ये इना मति गेली, मति इना ईत्त गेले
इत्ता इना सुद्र खचले, इतके अनर्थ एका अईद्येने केले ।।



इद्या नसन त्याले खटाऱ्याचा बैल म्हनतत. काय म्हनतत?

**सर्वजन:** खटाऱ्याचा बैल ऽ ऽ ऽ

**बाबा:** आता तरी सुधरा. मुला-मुलीले सिक्सन द्या. पैसा नाई म्हनानं तर जेवनाचं ताट मोडा. हातावर भाकरी खा. बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या. इव्हायाले पाहूनचार करू नोका. पर मुला-मुलीले सायत घातल्याबिगर सोडू नका ऽ ऽ ऽ ईद्या केवढं मोठं धन हाय, महाराज, डाक्तर आंबेडकर सायब, ह्यायच्या पिढ्या अन् पिढ्यानं झाडू माराचं काम केलं. त्याईच्या वडलाले सुबुद्धी झाली. अन् डाक्तर आंबेडकर सायबाले सायेत घातलं. आंबेडकर सायबानं काई लहान सहान कमाई नाई केली. हिन्दूस्थानाची घटना केली घटना. अन् थ्येच साळत जातेना, अन शिकिते ना, त् झाडूच मारनं त्याईच्या करमात होतं. म्हून म्हनतो राजे हो सोताई सिका, अन् दुसऱ्यायले सिकवा. इद्येची पुंजा करा ऽ ऽ ऽ, करान का नाई?

**सर्वजन:** करू ऽ ऽ

**बाबा:** मंग बोला.... गोपाला... गोपाला...

**बाबा:** लोकहो, सिका, सवरा पर पैशाची धुयधानी करू नोका. संसाराची काटकसर मारवाड्या, गुजराथ्या, बराम्हन भाट्यायकडून सिका. हे रोज तुपात सिरा भाजून खाते, का रोज कोंबडं, बकरं कापते? का सकाय सांच्याले दारू ढोसून राहयते. त्यायच्या घरी जमा-खर्च हाये. काय हाये?

**सर्वजन:** जमा-खर्च ऽ ऽ ऽ

**बाबा:** उत्पन्न किती आन् खर्च किती यायची लैन त्यायले मालूम हाये. अन् आमच्या मराठ्याले, कुनब्याले, तेल्या, माळ्या, न्हाव्या, वड्याले ह्याले जमा खर्च समजत नाई. पौनसे रुपये उत्पन्न आन संभर रुपये खर्च. काटकसर पाह्यजे, घरी जमा खर्च पाह्यजे. लई जन म्हनत राह्यते. पगार पुरत नाई, पगार पुरत ऽ ऽ ऽ

**सर्वजन:** नाई ऽ ऽ ऽ

**बाबा:** पगार सरतच नाई. असं म्हनलं पाह्यजे. ज्या घरात नवरा-बायको बुद्धिमान, अक्कलवान असतील तथीसा पगार संपत नाई. शिल्लक ठेवली पाहिजे. फालतूच खर्च बंद केला पाह्यजे ऽ ऽ ? काय केला पाह्यजे?

**सर्वजन:** फालतुचा खर्च बंद ऽ ऽ ऽ

**बाबा:** बोला गोपाला... गोपाला... देवकीनंदन गोपाला.

**बाबा:** आज अथिसा काय हाये? ह्या पोलीस लाईनीत?

**सर्वजन:** पूजा ऽ ऽ

**बाबा:** सत्यनारायीन हाय का?

**सर्वजन:** होऽ ऽ

**बाबा:** सत्यनारायन म्हनजे देवाची भक्ती नाई. लोभी लोक सत्यनारायनाची पूजा करतत. तूमी का लोभी मानस हाईत?

**सर्वजन:** नाई ऽ ऽ ऽ

**बाबा:** दगडाचा देव पुंजान का?

**सर्वजन:** नाई ऽऽऽ

**बाबा:** देव देवळात नाई, देव मसजिदीत नाई, कबीरजीचा पुरावा हाये.
'ना मै मेहजिदमे ना मै देवल, ना मै काबे. कैलासमें.
मौको कहा ढुंढेरे बंदे, मै तो तेरे पासमें.'
देव देवळात नाई, देव मशिदीत नाई. काब्यात नाई, अन् कैलासात नाई. तो आपल्या मनात हाये, रंजल्या गांजल्यात हायेत. गरिबात हाये. लुल्या, लंगड्यात, आंधयपांगयात हाये. पर लोक देऊळ बांधते, त्यात मूर्ती आनाव लागते का नाई ऽ ऽ?

**सर्वजन:** हो ऽ ऽ

**बाबा:** मूर्ती इकत मियते कां फुकट?

**सर्वजन:** इकत मियते.

**बाबा:** आता राजेहो मले सांगा. देव ईकत भेटत असते का? सूर्यनारायनाले, वरून देवाले, पाऊस देवाले ईकत घेता का?

**सर्वजन:** नाई

**बाबा:** मंग देव काय मेथीची भाजी होये का कांदे बटाटे होयेत? ईकत घेता त्याले, ज्या मानसाले हे समजत नाई, तो मानूस कसा बा? तुमच्या देवाले आंघोय करता येते का सोताहून?

**सर्वजन:** नाई ऽ ऽऽ

**बाबा:** ज्याले आंग धुवाचा सवाद नाई. त्याले देव म्हनता...? तुमच्या देवाले



धोतर नेसता येते काय?

**सर्वजन:** ना ऽ ऽ ई !

**बाबा:** ज्याले धोतर नेसता येत नाई. त्याले देव म्हणता, तुमच्या देवापुढं निवद ठिवला. कुत्र भिडलं तर हानता येते का तुमच्या देवाले?

**सर्वजन:** ना ऽ ऽऽ ई!

**बाबा:** इझला दिवा तर म्हनते बाबूराव दिवा लाव. दिवा मंग देव दाखवते, देव कोनं दाखवला?

**सर्वजन:** दिव्या ऽ ऽनं.

**बाबा:** दिवा मोठा का देव मोठा?

**सर्वजन:** दिवा ऽ ऽऽ

**बाबा:** देव देवळात, नाई मसिदीत नाई, दगडगोट्यात नाई मग देव कायच्यात अशीन बा?

**सर्वजन:** मानसा ऽ ऽ त.

**बाबा:** बोला मंग, गोपाला... गोपाला.... देवकीनंदन गोपाला।

**बाबा:** ब्रिटीश सरकारनं आपल्यावर मोठं एक अरिस्ट आनलं होतं. मंग सत्याग्रीह कोनी केला?

**सर्वजन:** लोकायन ऽ ऽ अन् गांधीजीनं.

**बाबा:** कोनी देव, ईस्वर-अल्ला आले होते काय ऽ ऽ?

**सर्वजन:** नाई.

**बाबा:** आन् चले जाव कोनी म्हतलं?

**सर्वजन:** गांधीजीनं.

**बाबा:** मग गांधीजीले देव म्हना... बोला गांधीजीकी जय ऽ ऽऽ

**सर्वजन:** जय ऽ ऽऽ

**बाबा:** जिन्होने लोकोंके वास्ते तुरुंग भोगा, पोलिसके धक्के खाये, अंधारी रात कोठडीमें वास किया, बिरटीसोके घोडे का दाना भरडा. ऐसे गांधीजी की जय बोला.

**सर्वजन:** जय ऽ ऽ ऽ!

**बाबा:** और दस मिनिटमें गांधीजीका खून हो गया। महात्माजी गये ऽ ऽ, दुनियामें अंधेरा हो गया ऽ ऽ कितली किरत होती त्यायची। किरत मानसाचं धन

हाये. कबीरजीचा दाखला हाये-

‘सुरत से किरत बडी, बिन पंख उड जाये,
सूरत तो जाती रही, किरती कवू ना जाये ।।’

लोकहो, जब तक सूरज, चांद, पुर्थईपर है तब तलक गांधी मरते नई। गांधीजी जिंदे है, गांधीजी को मरनच नई ऽ ऽ तुकोबाराया म्हनतत-
‘तुका म्हने एक मरनचि खरे, उत्तमचि उरे, किर्ती- मा ऽ ऽऽगे ।।’
बोला गोपाला... गोपाला देवकीनंदन गोपाला (गजर)

**बाबा:** मंग मायबापहो, पुर्थईवर देव कुठ हाये? जनता जनार्धनात हाये. कुठ हाये?

**सर्वजन:** जनता जनार्धनात हाये ऽ ऽ

**बाबा:** संत, महात्मे पुरावा देतत, जनताच जनार्धन हाये. गरीबासाठी, बायायसाठी इस्पितल बांधा. गोरगरिबाले औषधी द्या. वार दोन कपडा द्या. लुले-लंगडे, आंधया -पांगयाले आसरा द्या, मदत करा, मुक्या जनावराले अभय द्या. अशा जनता जनार्धनाले वधरं आना.
‘जनी जनार्धन. संत बोलती वचन’ बोला गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला... (गजर)

**बाबा:** मायबापहो, कोंबडे-बकरे कापू नोका मुक्या जीवाचे बळी देऊ नका. गर्वानं फुलू नका. बकऱ्या -कोंबड्याच्या साली काढता. तुमच्या साली कोन काढनं. कबीरजी म्हनतत-

‘बकरी पानी खात है, ताकी काढी खाल,
जो बकरी खात है, फिर ताको कौन हलाल?’

रिन कर्ज काढू नोका. भूत, भानामती, मरिमायच्या मांग लागू नोका, सिक्सन घ्या, पोराबारायले सिकवा, मानसहो दारू पेऊ नका. सिवासिव करू नोका. मानूस हाये त् मंग मानसासारखं वागा. राक्सस बनू नोका. तुमचा जलम सफल होईन. नाईत् नरकात जान, गुखाडीत जासान काय?

**सर्वजन:** नाई ऽऽ

**बाबा:** आज बाद्रांच्या मंडळीचं मले दर्शन झालं. ह्या गोधड्याची, चिंध्याची, खापरे बाबा, चापरे बाबा, गोधडे बुवाची तुमची भेट झाली. तुमी मले पाह्यलं, म्या तुम्हाले पायलं. आता ही मायी शेवटची भेट हाये. माह्य



मरण मायापुढं उभं हाये. मी बोलता बोलता चुकलो असिन त् माया चुकीची क्षमा करून जा. बोलनारा चुकते. पन त्याची चूक दुसऱ्याले कयते. माह्यं कीर्तन आटपलं हाये. माही तब्येत बरी नाई. पर पोलीसायनं बलावलं. या लागलं! नाई त हतकडी पडली असतीन बाप्पा. पर येळ आली का पोलिसायले यमराज व्हा लागते बाप्पा. पोलीस माह्ये गुरू हायेत. यमराज माह्ये गुरु आहेत. बोला मंग सर्वजन गोपाला..गोपाला... देवकीनंदन गोपाला.

(गजर सुरू होतो. वाढत जातो....)

**अंधार**

# अंक तिसरा: प्रवेश चौथा

(वेळ सायंकाळची. विजांचा कडकडाट मेघांचा गडगडाट वादळ वारा. सुन्न करणारे वातावरण. रंगमंचावर गाडगेबाबा झोपून आहेत. शेजारी कुंताबाई बसल्या आहेत. लुगड्याला ठिगळे लावत आहे. गाडगेबाबा आजारी आहेत.)

**कुंता:** या वादय वाऱ्यालेई काय झालं समजत नाई बाप्पा? इजा कडाडून राह्यल्या. ढगई गडगडून राह्यले. बरसातीचा त् मोसम नाई. मंग कायले जीवाले हा घोर. (पुन्हा वीज कडाडते. वादळवारा, मेघगर्जना) अकायचा पाऊस दिसते. थांबवान बाप्पा कायले भेवाडून राह्यले मले. (गाडगेबाबाही उठतात. आजूबाजूला बघतात. अचानक खापर, काठी हातात घेऊन जायला निघतात.)

**कुंता:** आंग तापानं फनफनून राह्यलं. जिवाले बेस नाई तुमच्या. आता कुठीसा निंघाले, इतल्या वादय वाऱ्यात?

**बाबा:** कुंते, मले नागरवाडीले जाचं हाये, आताचं!

**कुंता:** कितीक, दगदग करानं बाप्पा. गेला जीव मम्मईच्या डाक्तरानं वापिस आनला. आता आखिन तरास कायले करून घेता अन् माया जिवाले काहून घोर लावता?

**बाबा:** अवं काहाले इतला जीव लावत बाप्पा. अवं मी तुहा दादला नोहे अन् तू मायी लक्षुमी नोवे. जिनगानी भर तू माया मांग फिरत राह्यली वन-वन. आपल्या जिनगानीचा जोहार कायले केला व तुवा मायासाठी?

**कुंता:** काय करू जी? साता जलमाची गाठ बांधली हाये तुमच्या पदराशी. तवाच मायीई जिनगानीची जत्रा सुरू झाली. धांगयधिंगा, तमाशा, गोंधळ असूनशान त्यातई मी एकलीच राह्यली. सर्वात असूनई एकलीच. कलावती गेली, गोईंदा गेला, सुखमामी गेल्या. सारेच गेले. म्याच राह्यली तुमच्या संगत, पर माया इच्छेनं. मंग आता कोनाच्या नावानं बोटं मोडू बाप्पा? का साटीसराप करत बसू? तुमी तुमालेच मारून टाकलं. नया जलम घेतला. पर मले नाई मारता आलं सोताले. मंग जुन्याच जलमावर नये ठिगय सिवत राह्यली जिनगानीभर. तुमच्या ह्या ठिगयाले साजेसे.

**बाबा:** तुया हा एकेक ठिगय कोट मोलाचा हाय मायमाजे. माया ठिगयाहून मोठा हाये. त्याले संभायून ठेव. मी गेल्यावर हे ठिगय लोकायले दिसले पाह्यजे. मी मेल्यावर लोकायले कयन, याच ठिगयानं डेब्याले मोठा केला म्हून. माया परिस तुये हे ठिगयच मोठे हायेत, लयमोठे.

**कुंता:** मंग, मंग याच ठिगयाची आन हाय तुम्हाले. या बुढ्या आंगाले आराम घेऊ द्या. जलमभर लय दगदग, कष्ट केले तुमी. साऱ्या जगाचा बोझा हाये तुमच्यावर. नलड्यातून रगत येई पावतर किरतन, परवचन करत राह्यता. मम्मईच्या बांदरा पुलीस ठेसनाच्या किर्तनात कितले पाय सुजून गेल्ते बाप्पा. साकरेच्या बेमारीचा घोर होय ह्या. आता मंग हे नागरवाडीचं टिनमिनं कायले मंधीच लावता जी?

**बाबा:** नागरवाडीले जीव हाये माया. मराच्या आंधी एकडाव त्या जीवाले भेटाचं हाय मले. मानसाचा जीव काय, मानसाच्या हातात असते माय? जीव त् वाऱ्या परमानं हाये. तेच काई भरूसा नाई 'पल भर तोला, पल भर मासा' पुर्नामायनं मले हेच सिकवलं. कबीरजी- तुकोबारायनई मले हेच धडे देल्ले. मले आठवते. माया त्या चांदीच्या कलदाराची अन् पूर्नामायच्या डोहाची गोठ. अंधाराची गोठ. पर अजूनही गोठ सरली नाई माय. नाल्या-मोऱ्यात गो-मूत साचून राह्यते. तसा अंधारई साचून हाये लोकायच्या जिनगानीत. माय काम म्या करत राह्यतो. मरेस्तोवर करत राहीन. पर साऱ्याईचं लोकायले कयत नाई, बह्यताड बेलने हाये लेकाचे. त्यायच्या जिनगानीत उजेड आला पाह्यजे. माया जीव भूर्रकन उडून जाच्या पह्यले मले जनता जनार्धनाले, दरिद्री नारायनाले सांगाचं हाये. जागे व्हा बाप्पा, जागे व्हा. मानूसपना सोडू नका. देवा धरमाच्या बाजारात घुसू नका. धरमाचे बेपारी फसवतीन, अंगारा-धुपाऱ्यात भुलवतीन. धरमा-धरमात झगडे लावतीन.

(खोकला येतो. कुंता सावरते.)

**कुंता:** चाला आराम करा बरं. मंग करजा तुमचं हे किरतन !

(अच्युतराव येतात.)

**अच्युतराव**:बाबा, पुने, आळंदी, पंढरपूराहून लोक तुम्हाले भेटाले आले आहे. मी त्यायले सांगितलं, बाबाची तब्येत बरी नाही म्हून. पन ते माह्यं आयकत नाही. ठान मांडून बसले आहे.

**कुंता:** अच्युतराव त्याईले सांगा, डाक्तरानं भेटाले मनाई केली हाये म्हून.

**बाबा:** मायमाजे, मी आता मरतो का उद्या, याचा भरूसा देता का तुमी? मी दोन दिसाचा साथीदार हाये. इतल्या दुरून थे लोक आले भेटाले. त् भेटून घेतो. अच्युतराव जा आना त्यायले बलावून. (जातात.)

**कुंताबाई**: अजी हे बेस नाई. तुमी जवा-तवा मरनाच्याच गोठी करून राह्यले. मराचं असन त् पहिले मले मरू द्याना. माया काई उपेग हाय समाजाले? पर तुमी समाजाले पाह्यजे हाये. लोकायले गरज हाये तुमची. भेटाचच असिन तं भेटा बाप्पा लोकायले. किरतन, परवचन करा. पर मरना सरनाच्या गोठी करू नोका. (अच्युतराव त्या लोकांना घेऊन येतात.)

**अच्युतराव**: बाबा, हे लोक आले आहे.

**एक:** नमस्कार बाबा.

**दोन:** रामराम बाबा.

**बाबा**: बोला काय म्हनताजी? काय काम काहाडलं बाप्पा?

**एक:** बाबा, मी पंढरपुरात तुळशी यज्ञाची तयारी केली आहे. तुम्हाला यावंच लागेल.

**बाबा:** बरं, बरं ! मंग. पंढरपूरच्या कलेक्टराले सांगतो का शेतकऱ्यासाठी एक आड्डर काढा, का वावरात जवारी, कापूस, तूर लावन्या परिस तुयशीच लावा म्हून. म्हनजे हरसाल लोक तुयसीयज्ञ करतीन. अन् लोकायचं पोट भरीन. बोला देवा तुमचं काय हाये?

**दोन:** बाबा, आळंदीत संत-सज्जनांचा मेळावा घेतला आहे. चारही धामाचे संत जण महायज्ञ करणार आहोत. मी तेथे शब्द दिला आहे की, मी गाडगेबाबांना आणतोच म्हून.

**बाबा:** महायज्ञ? बाप्पा मले आंधी इचारलं होतं कां?

**दोन:** पण आपनच मला साक्षात्कार दिला होता.

**बाबा:** आरं पर कंधी देल्ला बा! म्या साक्षात्कार !

**दोन:** पहाटेच्या स्वप्नात! पहाटेची स्वप्न खरी असतान ना बाबा?

**बाबा:** हे त् बेज्जाचं झालं बा. म्या साक्षात्कार देल्ला म्हनते. आन मलेच ठाऊक न्हाई. काय राजेहो, जलमभर म्या तुमाले तिरथ, जत्रा, होम हवन, यज्ञ, महायज्ञ, साक्षात्कार, चिमत्कार, बोवाबाजी, यायच्या इरोधात नलडा फोडून सांगतलं. आन माया जित्यापनीच मले खोटं पाडता. मले नालाईक ठरवता. अरे तुमाले काई लाजा सरमा हायेत का नाई ! बह्यताडे हो! माया जित्यापनीच मायी मस्करी करता? (प्रेक्षकांकडे येतात) मेल्यावर मायं मंदीर बाधांन. मायावर पोथ्यापुरानं लिहानं, मी तुकोबावानी सदेह वैकुंठाले गेलो म्हणून मायी दवंडी पिटवान. मले शेंदरानं माखून मायी पुजा करान. नवस बोलान, उपास तापास करान, अंगारे धुपारे करान. इतल्यानं जीव नाई भरला तुमचा त् गाडगेबाबाले भुतासारखं आंगात नाचवान. तुमचं काई खरं नाई बाप्पा. खरं नाई ! मेल्यावर मायं मढं सजवू नोका, (महायज्ञ करणाऱ्यास उद्देशून) निंघा आता. जित्यापनीच असं मायं सराद्ध अन् तेरस करू नोका (स्वत:शीच) हूॅ ऽ ऽ सपनात आलो म्हने,साक्षात्कार देल्ला म्हने, तुयशी पेरतत, महायज्ञ करतत. माया शेंदरी गोटा करून कोंबडे-बकरे काऊन नाई कापत बाप्पा? अरे मलेच पेटवानं उभ्यानं जित्ता, तुमचा देव अन् तुमचा धरमई लय खुस होईन. कबीरजी, तुकोबाराया काय करू बाप्पा म्या. काय करू? (धाप लागते. थरथरतात. कुंता, अच्युतराव धावत येतात. सांभाळतात.) अरे निंघा म्हतला ना बाप्पा तुमाले. कायले हे तोंड दाखवता मले. जा ऽ ऽऽ

**अच्युतराव**:बाबा, बाबा, असा तरास करून घेऊ नका. त्यांचं मी बघून घेतो.

**कुंता:** अजी कायले तडफडता बाप्पा? काऊन घोर लावता जिवाले? दम धरा, ताप त् केवढा फनफनला हाये जी, अच्युतराव डाक्तर साहेबाले बलावा लवकर. (वासुदेव गाडगेबाबांचा नातू हातात कागदं घेऊन येतो.)

**बाबा:** नाई अच्युतराव, राठोड सायब, कैकाडी बुवा, शिंदे बुवाले बोलवा. मले आत्ताच्या आताच नागरवाडीले निंघाचं हाये. निघांच्या आंधी भेटा म्हना (अच्युतराव जातात. वासुदेव बाबा पुढं कागदं धरतो.)

**वासुदेव:** आबाजी !

**बाबा:** काय होय रे बाप्पा?

**वासुदेव:** आंगुठा पाह्यजे होता तुमचा !

**बाबा:** कायले? काय होये रे हे ?

**वासुदेव:** आबाजी हे कोर्टाचे कागुदपत्र होये.

**बाबा:** कोर्टाचे कागुदपत्तर?

**वासुदेव:** आबाजी, मायं अधिकार पत्तर.

**कुंता:** काय होय रे बाबू, अस्या टायमाले तुले काई लाज सरम?

**वासुदेव:** आवं आजे, मी आबाजीचा नातू नोये काय? मग हे इस्टेट माई नोये काय?. आबाजी मेले तं मंग? वकील सायब म्हने पह्यले अधिकार पत्तर करून घे, आबाजी मराच्या आंधी.

**बाबा:** अरे मेला तुमच्यासाठी तुमचा आबाजी, बाप्पा, बाप्पा, अधिकार पत्तर पाह्यजे तुले? काय केलं रे तुमी? अधिकार मांगाले! मोठा आला अधिकार पत्तर घेऊन. माया मढ्यावरच्या चिंध्या, हे खापरं, हे गोधडी, हेच हाये माई इस्टेट, तेच न्या अन् करा मले नागुडं... जा... जा.... घिऊन जा बाप्पा (धाप लागते. शांतता) सांगून ठिवतो तुमाले. मायं मरनपत्तर करून ठिवलं हाये म्या. माया कोनत्याई जवयच्या, दूरच्या नातलगाचा, गणगोताचा, सग्या सोयऱ्याचा मिसनाच्या इस्टेटीवर वारसा हक्क रायनार नाई. जाय बाप्पा. जाय आता जरासिक लाज असन, तर मायं नाव नोको घेजो. (थबकतो) अरे जायनं बाप्पा ! (जातो. शांतता, स्तब्धता.) पाह्यलं कुंते, मराच्या पह्यले हेच कीर्तन आयकाचं राह्यलं होतं. (उसासा भरत) थकलो माय, थकलो मी. मायाच लोकायनं हारवलं मले.

**कुंता:** अजी मन लहान नोका करू. साधु संतांच्या नसिबाले राह्यतेच असा भोग. तुमी तर लय मोठे साधू हायेत, संत हायेत, मंग कायले दुख करता? अन् तुमी नाई हारलेजी तुमी त् जितले, हारला हाये तो ह्या समाज, हये लोकं. दुख नोका करू बाप्पा, सांत व्हा.

**बाबा:** तुले नाई कयनार माय, आवं म्या भरलं घर सोडलं, तुमच्यावर अन्याव केला पोरा बायाले बेवारीस केलं, चिंध्या- मिंध्या पांघरल्या, शिया- पाता भाकर तुकडा खाल्ला, कधी उपासीच राह्यलो. खापराचा आसरा घेतला. लोकायन मले गाडगेबाबा केला. पर आखर मीई मनूस हाये माय. तुमाले असते तसा हाडाचा- मासाचा पिंजरा मलेई हाये. या पिंजऱ्याच्या कुडीत जीव हाये तुमच्या सरिखाच. पर आता मायं काय राह्यलं. पुनरर्जल्मावर माया ईस्वास नाई. देव मले काई पुस्पक ईमानान बसून नेनार नाई. मले सारं ठाव हाये. मंग आता कायले दुख करू मी?

**कुंता:** तुमीत तं निसंग झाले बाप्पा. पर मले तुमच्यातून जीव नाई काढता आला. साता जल्माचं वचन घेतलं हाये म्या.

**बाबा:** अवं माय, एकाच जलमात इतली फरफट झाली तुई, इतले वाखे झाले. तरी जीव नाई भरला. जिनगानी भर काट्याची, दगड धोंड्याची संगत केली. खान्याचे नेसाचे वाखे झाले. संसाराचा किरतोडा झाला. पोराबायाचे हाल झाले. अन् तू बाप्पा इतलं सहीन करून पुन्नांदा साता जलमाच्या गोठी करतं. (शांतता) कुंते, काय देल्लं वं म्या तुले? तूयावर अन्यावच केला म्या.

**कुंता:** नाई साधुबोवा नाई. तुमच्या सरीख्या देवमानसाची बायकू हाये म्या. ह्या परीस मोठं नसीब नाई. माया सोताच्या पोरायची माय नाई होता आलं मले, दुख हाये मले त्याचं. पर साऱ्या जगाची माय केलं तुमी मले. फाटक्या झोपडीतून साऱ्या जगाचा संसार केला. माया संसार नाई झाला. पर जगाचे संसार आपून उभे केले.

**बाबा:** लय मोठ्या मनाची हाये कुंते तू. लोकं म्हनतत ह्या गाडग्या , ह्या चिंध्या नालाईक हाये. हरामखोर हाये. मायची, बायकोची पोराबायाची जिनगानी नासवली. संसार कराची ताकद नव्हती. म्हून पयून गेला. साधूबोवा झाल्याचं नाटक करते. अन् घरवाल्यायचे हाल हाल करते. खरंच हाय माय खरंच हाये.

**कुंता:** नाई, साधुबोवा, नाई. लाखो- करोडोमंदी एखादाच गाडगेबाबा होते. सोतासाठी, सोताच्या भल्यासाठी त् सारेच खपतत्., जगतत, पर दुसऱ्यासाठी नाई. तुमी लोकायसाठी खपले, लोकायसाठी जगले, आमाले अभिमान हाय तुमचा. त्याचं दु:ख नाई हाय मले. तुमी मनाले आता गांजवू नोका काई फिकिर करू नोका. आज तुमच्याशी गोठी करून मायं मन अभायावानी मोठं झालं. मले लय मोकय मोकयं वाटून राह्यलं.,

**बाबा:** लय उपकार झाले माय तुहे, लय उपकार झाले. आता मराले मोकया झालो मी. (अच्युतराव येतात.)

**अच्युतराव:** बाबा, राठोड साहेब, कैकाडीबुवा, शिंदे बुवा आले आहेत. निघायची तयारी झाली आहे. भाऊराव काळे ड्रायव्हरनं गाडी काढली आहे. चाला....

**बाबा:** चाला बाप्पा. पर अथून जाच्या आधी अथिसा जमलेल्या लोकायशी,

मायमाऊल्यांशी काही बोलाचं हाये मले. काई सांगाचं हाये. (नाट्यगृहातील प्रेक्षकांपुढे येतात, गाडगेबाबावर टाईट स्पॉट)

**बाबा:** माय बापहो ! माई तुमाले कयकईची इनंती हाये. मी मेल्यावर माया मुर्ती, पुतळे बसवू नोका. माह्या नावानं उपास तापास करू नोका. माया नावानं नवस बोलू नका, बेलफूल, चिरंजीचे दाने, तिरथ परसादात मले अडकवू नोका. अंगारे, धुपारे, धागे दोरे करू नोका. मले हे काईई पटत नाई राजे हो, जिनगानी भर म्या हेच सांगतलं तुमाले. आन हो जो माया नावाले बट्टा लावन, माया नावानं दुकानदारी करन, त्यायले खेटरानं हाना. तुमी लोक साजरे हाय, पन माहे हे इबलीस, पापी चेले चपाटे तुमाले भक्तीच्या नावानं भुलवतीन. त्यायले भुलू नका. माया रोकडा धरम पाळा, एवढी किरपा करा बाप्पा मायावर. चाला. निघांची येळ झाली.

**बाबा:** (कुंताला) बरं, माय जातो मी. हे आपली आखरचीच भेट असन. जिवाले घोर लावाचा नाई, धिरानं माया मरनाले समोर जाजो. काई चुकलं असनं त् माफी द्या अन् मायी आठवन म्हून हे माई इस्टेट ठिवा. खरी इस्टेट. बरं निंघतो आम्ही आता. (खापर कुंताबाईला देतात. भावनांचा कल्लोळ. कुंताबाई विव्हळ, गाडगेबाबा जातात. कुंताबाई निरोप देते. वादळ वारा घोंघावतो. विजा कडकडतात. निळ्या प्रकाशाच्या झोतात गाडगेबाबा उभे दिसतात. बाकी इतरत्र अंधार. फक्त गाडगेबाबांवर निळा प्रकाश. पार्श्वध्वनितून कबीरवाणी ऐकू येते.)

**उड जाएगा हंस अकेला, जग दर्शन का है मेला ।।**
**जैसे पात गिरे तरुवर के, मिलना बहुत सुहेला**
**ना जाने किधर गिरेगा, लग जा पवन का रेला... ।।**
**जब होवे उमर पुरी... जब छुटेगा हुकूम हूजूरी**
**उड जाएगा हंस अकेला....**
**(अंधार. पडदा पडतो.)**

**।। समाप्त ।।**